### पद २४ वें.

रघुराज! मां परिपालय। [1]श्रीकमलाविमलालय! ॥ ध्रुवपद. ॥
[2]रघुकुलशंकर राम रमावर राजीवायतलोचन! ।
[3]जलधरसुंदर कौस्तुभकंधर [4]वृंदारकवृंदमोचन! ॥ रघुराज० ॥ १ ॥
[5]तरणिकुलार्णव करुणार्णव [6]भवबाणासुरभंजन! ।
गुणरत्नाकर [7]शंकरशंकर [8]कंजजनक [9]निरंजन! ॥ रघुराज० ॥ २ ॥
[10]जनकसुतावर [11]जनअभयंकर जय [12]करुणावरुणालय! ।
निजचरणा शरणागत वासन भक्तजना परिपालय. ॥ रघुराज० ॥ ३ ॥

### आरती.

आरती श्रीगुरुची सुखकल्पतरूची ।
सच्चिदानंदनामें गातां अतर्क्य रूची. ॥ ध्रुवपद. ॥
सत्पदें तोचि आहे कांहीं अणू न साहे ।
ते खुण काय सांगों विश्व गिळूनि आहे. ॥ आरती० ॥ १ ॥
चिच्छक्ति चित्त झालें ज्ञान प्रत्यया आलें ।
सत्पदें तेंचि ब्रह्म नाम चित्पदें केलें. ॥ आरती० ॥ २ ॥
शर्करा शुभ्र साची गोडी चाखतां तेची ।
वस्तूसी भेद नाहीं रीती अनुभवाची. ॥ आरती० ॥ ३ ॥
सत्पदें अधिष्ठान तेंचि चित्पदें ज्ञान ।
उठतां ज्ञानशक्ती [13]वस्तुत्वें नसे अन्य. ॥ आरती० ॥ ४ ॥
सत्पदें विश्वधाम जेथें भासे रज तम ।
चित्पदें सत्त्वयोगें माया भेद भिन्न नाम. ॥ आरती० ॥ ५ ॥
इंद्रियें विश्व गमे रज तमही [14]रमे ।
चित्पदीं भासती हे दोरीं [15]भुजंगोपमे. ॥ आरती० ॥ ६ ॥
सुषुप्तीमाजी उरे नित्य सुख तें स्फुरे ।
तो लाभ बोलवेना जेथ मन हें मुरे. ॥ आरती० ॥ ७ ॥

---

१. श्रीलक्ष्मीचें निर्मल गृह, वासस्थान. २. रघुकुलाचें कल्याण करणारा. ३. मेघश्याम. ४. देवसमुदायाचें संकट हरण करणारा. ५. सूर्यकुलावतंस. ६. संसाररूप राक्षस (काम क्रोध इ०) यांस मारणारा. ७. शिवाचें कल्याण करणारा. ८. कमलोद्भवाचा पिता. ९. अव्यय. १०. जानकीपति. ११. लोकभयहर्ता. १२. करुणासागर. १३. खरोखर, वास्तविकपणें. १४. रमतात. १५. सर्पासारखें.

सुषुप्तिमाजी कांहीं भोग भोगणें नाहीं ।
दे बुडी भोगणार सुखस्वानंदडोहीं. ॥ आरती० ॥ ८ ॥
पडतां गाढ नीज उरे आनंद निज ।
भोगितां तेंचि सुख सर्व सुखाचें बीज. ॥ आरती० ॥ ९ ॥
सच्चिदानंद योगी स्फुरे योग आणि भोगी ।
श्रीगुरु सर्वांठायीं दिसे वामनालागीं. ॥ आरती० ॥ १० ॥

---

## २. भाषांतरें.

### १. चतुःश्लोकी भागवत.

(श्लोक.)

होतों मीच [1]उगाच, विश्व नव्हतें कांहीं अरे! [2]धातया!
केचें हें सदसत्प्रधानपर जें सद्भाव नाहीं तया? ।
आतां त्यावरि विश्व मीच, [4]गुज हें अद्वैत पाहें बरें,
आहे तेंच विरेहि विश्व सकळीं, [5]अद्वैत पाहें खरें. ॥ १
साची वस्तु नसे, नसोनि [7]गंवसे, हे ज्यांत माया असे,
तैसाची न दिसे, दिसोनिहि असे, जीवात्ममाया असे, ।
मिथ्या सर्व शरीर, ज्या [8]चरित तो रज्जू कळोनी, कळे,
आधारी स्वतनु प्रतीति असतां दृष्टीस जी नाकळे. ॥ २
भूतें याच निघोनियां [10]प्रतितनू आहेतशीं भासतीं,
भूतांवांचुनि अन्य देह नसतां, भूतींच [11]भूतस्थिती, ।
भूतें तीं मजमाजि ये रिति, तयांमध्यें निघालों दिसे,
[13]अन्योन्यें म्हणुनी तयांत न निघे, आहें तसा मी असें. ॥ ३
जो [14]जाणोनि म्हणूनि यत्न करितो जिज्ञासु सत्यात्मता,
जाणावें इतुकेंचि त्या सुपुरुषें रे! ब्रह्म या [15]तत्वता, ।

---

१. कांहीएक न करितां, स्थिर असा. २. ब्रह्मदेवा! ३. माया ज्यांत मुख्य आहे असें, मायामय. ४. गुप्त गोष्ट, रहस्य. ५. माझ्यांतच विश्व लीन होणार म्हणून अद्वैत, आतां मीच विश्व झालों आहे, म्हणून अद्वैत होय. व मागेंही माझ्याशिवाय कांही नव्हतें म्हणून ही अद्वैतच! सारांश सर्वदा सर्वत्र अद्वैत आहे. ६. खरी. ७. दिसते. ८. चलनवलनव्यापार. ९. प्रत्यक्ष असतां. १०. प्रत्येक पदार्थांत. ११. भूतांचें राहणें स्वस्वरूपीं आहे, पदार्थांमध्यें नाहीं. १२. उत्पन्न झालों असा, त्या भूतामध्यें मी प्रवेश केला आहे असा. १३. भूतें मजमध्यें आहेत, व मी भूतांमध्यें दृग्गोचर होतों म्हणून. १४. जाणावें म्हणून. १५. खरोखर

सर्वत्र व्यतिरेकअन्वयपणें जें नित्य तें जाणणें,
जाणोनि त्रिगुणीं जडीं जडपटीं चित्तंतुतें पाहणें. ॥ ४

---

## २. अपरोक्षानुभूति.

(अनुष्टुप्वृत्त.)

वंदूनि श्रीमुकुंदातें, अपरोक्षानुभूतिची ।
समश्लोकी करितसें टीका मूळाचि सारिखी. ॥ १
श्रीराम परमानंद श्रीगुरु श्रीश जो तया ।
वंदितों सर्व लोकांच्या कारणा, व्यापकास मी. ॥ २
अपरोक्षानुभूतीतें मोक्षसिद्धयर्थ बोलतों ।
वारंवार पहावी जे संतीं यत्नें अशीच हे. ॥ ३
स्ववर्णाश्रमधर्मातें अर्पितां हरि तोषतो ।
त्या तपें साधतीं चारी वैराग्यादिक साधनें. ॥ ४
ब्रह्मादिक पदें तुच्छें दुःखदोषानुदर्शनें ।
वाटती काकविष्ठाशी, तेंचि वैराग्य निर्मळ. ॥ ५

---

१. अन्वय म्हणजे कार्य असेल तेथें कारण असणें. जेथें धूर असतो, तेथें अग्नि असलाच पाहिजे. जग असलें म्हणजे त्याचें कारण जें ब्रह्म तें तेथें असलेंच पाहिजे--हा अन्वय. व्यतिरेक म्हणजे (हा विशेष अर्थ आहे. न्यायांत हा नको असतो.) कारणानें कार्याहून निराळें असणें (स्वतंत्र असणें), जसें धुराहून विस्तवास निराळेपणा असणें, जगाहून ब्रह्म निराळें असणें. हा व्यतिरेक होय. २. सत्वरजस्तमोगुणीं. ३. ज्ञानरूप तंतूतें, पटांमध्यें पहावें. ४. हा मूळग्रंथ श्रीशंकराचार्यांनीं केलेला आहे. ५. साक्षादनुभव. ६. 'वंदितों सर्व लोकांच्या व्यापका, कारणास मी' असा पाठ युक्त दिसतो. मूळांत 'व्यापकं सर्वलोकानां कारणं तं नमाम्यहम्' असें आहे. ७. मूळ असें आहे:--'स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा हरितोषणात् । साधनं प्रभवेत्पुंसां वैराग्यादिचतुष्टयम् ॥' म्हणजे स्ववर्णाश्रमधर्म पाळिला असतां, तपानें, ईश्वरीप्रसाद झाल्यास वैराग्यादि साधनचतुष्टय मनुष्यास साध्य होतें असें दिसतें. पंडितांचा येथें दिलेला पाठ खरा असेल तर त्यांचा अभिप्राय भिन्न होता असें दिसेल. ८. ताप व पापरूपी सर्व विश्व आहे असा विचार झाल्यामुळें. अनुदर्शन=विचार. ९. काकविष्टेप्रमाणें.

आत्मस्वरूपची नित्य, दृश्य सर्व अनित्य हें ।
जो निश्चय बरा ऐसा नित्यानित्य **विवेक** तो. ॥ ६
यत्नें जो वासनात्याग सदा, तो **शम** बोलिजे. ।
बाह्यवृत्ती इंद्रियांच्या कोंडणें, **दम** बोलिजे. ॥ ७
विषयापासूनि मन परतावें, **निवृत्ति** ते. ।
सोसणें सर्व दुःखांचें, **तितिक्षा** बोलिजे तसें. ॥ ८
**श्रद्धा** ते कीं मनीं भक्ति श्रुतीची गुरुउक्तिनी. ।
एकाग्र चित्त लक्षावें, तें **समाधान** बोलिलें. ॥ ९
संसारबंधापासूनी सुटें देवा कसा कधीं? ।
दृढ बुद्धि अशी तीव्र, **मुमुक्षा** तेचि बोलिली. ॥ १०
या उक्त साधनीं युक्त होउनीयां, विचार हा ।
करावा ज्ञानसिद्ध्यर्थ, ज्यास कल्याण पाहिजे. ॥ ११
विचारावांचुनि ज्ञान घडेना अन्य साधनीं. ।
पदार्थांचें भान जैसें, प्रकाशावांचुनी नव्हे. ॥ १२
मी कोण? हें कसें झालें? कर्ता कवण या जगा? ।
याचें उपादान काय? हें जाणावें **विचार** हा. ॥ १३
न मी देह, न मी भूतें, नव्हें मी सर्व इंद्रियें, ।
एतद्विलक्षण असें, कोणी एक, विचार हा. ॥ १४
अज्ञानें रचलें सर्व, ज्ञानें हें लय पावलें; ।
कर्ता विविध संकल्प, मिथ्या दोन्ही. विचार हा; ॥ १५
या दोंचें हें उपादान, एक सूक्ष्म सदव्यय, ।
तें वटीं मृत्तिका जेंवी, शास्त्रदृष्टी विचार हा. ॥ १६
स्वयें सन्मात्रही शुद्ध, ज्ञाता साक्षी सदव्यय ।
तोही मीच न संदेह, कीं मी सर्व, विचार हा. ॥ १७

---

१. सिद्धांत. २. नित्यानित्य हें निश्चयाचें विशेषण. नित्यानित्याविषयींचा निश्चय. ३. मोक्षेच्छा. ४. **उपमा** अलंकार. ५. कारण; जसें घटाचें मृत्तिका व पटाचें तंतु. ६. पंचमहाभूतें. जडदेह किंवा पंचमहाभूतें किंवा इंद्रियें मी नव्हे. ७. याहून भिन्न. ८. दृश्य जग. ९. संकल्पाच्या योगानें जग निर्माण झालें आहे; म्हणून संकल्प व दृश्य विश्व हीं खोटीं आहेत. १०. दोघांचें. ११. सत्य व अविनाशी ब्रह्म.

आत्मा निष्कळ हा एक बेहुतीं देह उद्भवे, ।
मानिती ऐक्य त्या दोंतें, कोण अज्ञान याहुनी ? ॥ १८
आत्मा देहीं देह चाळी, त्यानें बाह्य चळे तनू, ।
त्या दोंस पाहती ऐक्यें, काय अज्ञान याहुनी ? ॥ १९
आत्मा ज्ञान स्वयें शुद्ध, अशुची मांस देह हा, ।
पहाती ऐक्य त्या दोंतें, काय अज्ञान याहुनी ? ॥ २०
निर्मळ स्वप्रकाशात्मा, देह तामस बोलिला, ।
त्या दोंतें पाहती ऐक्यें, काय अज्ञान याहुनी ? ॥ २१
आत्मत्व नित्य सद्रूप, असदेह अनित्य हा ।
त्या दोंतें पाहती ऐक्यें, कोण अज्ञान याहुनी ? ॥ २२
सर्वत्र स्वप्रकाशात्मा, भासणें सर्व ज्यास्तव ।
दीपादिभा एकदेशीं, तदन्यत्र निशांधता. ॥ २३
देह हा मी म्हणवुनी असतो मूढ मानुनी, ।
घट माझा तसा माझा देह ऐसें कळोनिही. ॥ २४
आत्माच मी शांत सम सच्चिदानंदलक्षण ।
मी नव्हें हा मृषा देह, ज्ञानी हें ज्ञान बोलती. ॥ २५
निर्विकार निराकार, मी निर्दोष सदव्यय, ।
नव्हें मी हा मृषा देह, ज्ञानी हें ज्ञान जाणती. ॥ २६
मी निर्मळ निराभास, कल्पनाभास व्यापक ।
नव्हें मी देह हा मिथ्या, ज्ञानी हें ज्ञान पाहती. ॥ २७
नव्हें अनित्य मी नित्य, अगुणाच्युत अक्रिय ।
नव्हें हा मी मृषा देह, ज्ञानी हें तत्त्व जाणती. ॥ २८
अनंत शुद्ध अचल, अजरामर निर्मळ ।
नव्हें मी हा मृषा देह, ज्ञानी हें तत्त्व जाणती. ॥ २९

---

१. ज्यांत कळा म्हणजे भाग नाहींत असा. २. पंचमहाभूतांपासून झालेला व सत्व, रज व तम यांनीं गुरफटलेला. ३. देहास गति देणारा. नियामक. ४. मळकट व मांसमय. ५. स्वयंप्रकाश आत्मा आहे. स्वप्रकाश व आत्मा हे निरनिराळे शब्द आहेत. ६. दीप+आदि+भा=म्हणजे दीप वगैरे प्रकाश एकदेशी असतात. ते जेथें असतात, तेथेंच प्रकाश असतो. इतरत्र अंधेर असतो. ७. 'माझा घट' यांत मी घटापासून निराळा आहे असा बोध होतो. तसाच देहाविषयीं बोध होत असूनही मूढ जन देह हाच मी असें म्हणतात. ८. 'निर्विकल्प' असें मुळांत आहे. ९. अगुण व अच्युत.

म्हणे देहात्मवादी कीं, 'चांगला देह टाकुनी ।
कैंचा आत्मा शून्य तो मी, मूर्खा ! तूं काय मानिसी ?' ॥ ३०
म्हणावें त्यास कीं मूर्खा! श्रुतियुक्तिकरूनियां[1] ।
एक देहातीत[2] आत्मा, जो अतर्क्य तुम्हां अशा. ॥ ३१
मी द्रष्टा[3] देह हा दृश्य[4], देह माझा म्हणूनियां ।
जो[5] प्रसिद्ध असे सिद्ध, देह आत्मा घडे कसा ? ॥ ३२
विकारहीन मी आत्मा, विकारी देह हा सदा, ।
साक्षात्प्रत्यय हा आर्ता[6], देह आत्मा घडे कसा ? ॥ ३३
'यस्मात्परं'[7] हें श्रुतिनें बोलिलें आत्मलक्षण, ।
वाखाणिलें सुजाणीं तो आत्मा देह घडे कसा ? ॥ ३४
म्हणे 'पुरुष एवेदं सर्वं' पुरुषसूक्तही, ।
श्रुति ऐसें च वदतां, देह आत्मा घडे कसा ? ॥ ३५
म्हणे 'असंगः पुरुषः' बृहदारण्यकी श्रुती, ।
अनंत मळ ज्याला तो देह आत्मा घडे कसा ? ॥ ३६
तेथेंचि बोलिला आत्मा, 'स्वयंज्योतिः' म्हणोनियां ।
परप्रकाश जड तो देह आत्मा घडे कसा ? ॥ ३७
बोलिला कर्मकांडींही, आत्मा देहविलक्षण[8] ।
नित्य कर्मफळें भोगी देह नश्वर[9] मेलिया. ॥ ३८
लिंगदेहहि[10] ऐसाची विकारी दृश्य चंचल ।
अव्यापक असद्रूप, तोहि आत्मा घडे कसा ? ॥ ३९
देहद्वयातीत[11] ऐसा, आत्मा पुरुष ईश्वर, ।
सर्वात्मा सर्व जो तो मी, सर्वातीत सदव्यय. ॥ ४०
'परि देहात्मभागें या प्रपंचाचीच सत्यता.' ।
हें तों तार्किकही[12] बोले, पुरुषार्थ न यांतही. ॥ ४१

---

१. वेदावरून व युक्तीच्या साहाय्यानें कळतें कीं आत्मा देहातीत आहे. २. देहरहित. ३. पाहणारा. ४. पाहाण्याचा विषय. ५. आत्मा. ६. 'भिन्न' असा पाठ सुगम झाला असता. ७. 'यस्मात्परं नापरमस्ति किंचन' हा सबंद चरण आहे. ८. देहाहून भिन्न. ९. नाशवंत. १०. सूक्ष्मदेह. ११. जड व लिंगदेह यांच्या पलीकडचा. १२. तर्कशास्त्रज्ञ.

रैज्जूसर्पैक्य छटिर्कें, मिथ्या भेदहि वास्तवें ।
वारूनि देहात्मऐक्य, आतां भेदहि वारितों. ॥ ४२
चैतन्य एक, नानात्वीं, त्याचा भेद घडेचि ना, ।
जीवित्वहि तसें मिथ्या, दोरीं सर्प भ्रमें जसा. ॥ ४३
नेर्णतां तत्क्षणीं रज्जू, वसे सर्पीं यथास्थित ।
विश्वाकारीं वसे तैसें, चैतन्य न कळे तैया. ॥ ४४
प्रपंचाचें उंपादान, विना ब्रह्म दिसेच ना ।
कार्य ब्रह्मचि कीं तेव्हां, दुजें कांहीं न बोलवे. ॥ ४५
व्याप्य व्यापक हें मिथ्या, सर्व आत्मा अशा श्रुती ।
तत्त्व ऐसें समजतां, जडभेदा नुरे उरी. ॥ ४६
'नेह नानास्ति' म्हणुनी, स्वमुखें श्रुति बोलतां ।
अद्वैत कारणीं कार्य, त्याशीं भाग घडे कसा ? ॥ ४७
दोषहि श्रुति बोले कीं, मृत्युपासूनि तो मरे ।
जडीं नानात्व जो पाहे, मायेनें वंचिला नर. ॥ ४८
परमात्मा परब्रह्म, त्यापासोनि जडोद्भव ।
ब्रह्मचि यालागिं भूतें, जाणावें युक्तिनें असें. ॥ ४९
सर्व नामें सर्व रूपें, विविधें, त्रिविधा क्रिया ।
ब्रह्म तें धरितें तैंची, सर्व ब्रह्म वदे श्रुती. ॥ ५०
हेमांपासूनि जे होती, नग ते हेम शाश्वत ।
ब्रह्मापासूनि होतें तें, ब्रह्म जें ब्रह्म शाश्वत. ॥ ५१

---

१. दोरी. २. मूळांतील पद्य असें आहे:–'इत्यात्मदेहभेदेन देहात्मैक्यं निराकृतम् । इदानीं देहभेदस्य ह्यसत्वं स्फुटमुच्यते ॥'. यावर श्रीशिवरामस्वामींचें भाष्य आहे तें हें:– 'आत्म्या देहा भेदबोधेंचि येणें देहात्मत्वा वारिलें स्पष्ट जाणें । आतां भ्रांतीं कल्पिला देह-भेदु, तोही मिथ्या हेंचि आतां निवेदूं ॥'. या टीकेवरून मूळांतील अर्थ स्पष्टतर होतो. ३. नाना (अनेक) उपाधींनीं. ४. 'रज्ज्वज्ञानक्षणे चैव यद्वद् रज्जुर्हि सर्पिणी' असें आचार्य म्हणतात. म्हणून नेणतां म्हणजे अज्ञान असतां, तत्क्षणीं (अज्ञान स्थितींत) रज्जु ही सर्पी यथास्थित (खरोखर) सर्पी (सर्परूपानें) वसे असा अन्वयार्थ केला पाहिजे. ५. ज्ञाता कळत नाहीं त्यास. ६. हाच श्लोक 'चरमगुरुमंजरी'त आढळतो. ७. ह्या श्लोकाचा मूळ संस्कृत श्लोक असा आहे:–'उपादानं प्रपंचस्य ब्रह्मणोऽन्यन्न विद्यते । तस्मात्सर्वः प्रपंचोऽयं ब्रह्मैवास्ति न चेतरत् ॥'. ८. बाकी. ९. 'कथं भागो भवेदन्यः स्थितेनाद्वितकारणे' यावरून अर्थ स्पष्ट होतो. १०. सोनें. ११. दागिने.

स्वल्पही भेद धरितां जीव ईश्वर यांमधें ।
भय तो पावतो मूढ, ऐसेंहि श्रुति बोलते. ॥ ५२
रज्जू न कळतां सर्प, आत्मा नेणे तया जड[1] ।
दिसे तो[2], पाहतां[3] आत्मा, अणुही न दिसे दुजें. ॥ ५३
जाणतो सर्व भूतांतें जो आत्मत्वेंकरूनियां ।
त्याला नसे शोक मोह, सर्व एक म्हणूनियां. ॥ ५४
आत्माच आपला ब्रह्म, तो सर्वात्मपणें असे ।
निर्धारिलें हें श्रुतिनें, बृहदारण्यकामधें. ॥ ५५
विश्व आलें अनुभवा व्यवहारें जरी खरें ।
तरी मिथ्या जसें स्वप्न, न दिसे उत्तर[4] क्षणीं. ॥ ५६
स्वप्नांत जागृति[5] नसे, नसे स्वप्नहि जागरीं[6] ।
सुषुप्तींत[7] न हे[8] दोन्ही, न त्या दोंत सुषुप्तिही. ॥ ५७
तिन्ही मिथ्या अशीं होती, जीं गुणत्रयनिर्मितें ।
यांचा द्रष्टा[9] गुणातीत, चिदात्मा त्रिगुणीं सम. ॥ ५८
मातीमधें घटभ्रांती, शुक्तींत[10] रजत[11]भ्रम ।
ब्रह्मीं जीवित्वही ऐसें, पाहों जातांच नाशतें. ॥ ५९
मातींत नामचि घट, हेमीं नामचि कुंडल ।
शब्दचि शुक्तींत रुपें, ब्रह्मीं जीवित्व ये रिती. ॥ ६०
आकाशीं नीलिमा जैशी, किरणीं[12] जळ[13] जे रिती ।
स्थाणुत्वीं[14] पुरुषाकार, चित्स्वरूपीं तसें जग. ॥ ६१
बागूल[15] लटिका जैसा, [16]गंधर्वाचें मृषा पुर, ।
द्विचंद्रत्व नभीं जैसें, सद्गुणीं[17] जग हें तसें. ॥ ६२
[18]तरंगाच्या आकृतिनें[19] पाणीच स्फुरतें जसें, ।
पात्ररूपें स्फुरे तांबें, ब्रह्मांडीं आत्मता तैशी[20]. ॥ ६३

---

१. ज्यास आत्मज्ञान नाहीं तो जड (भेदबुद्धि) मानतो त्याला जड दिसतें. २. आत्मा. ३. समजला म्हणजे. ४. पुढील. ५. जागें असणें. ६. झोप. ७. स्वप्न व जागर. ८. दोहोंत. ९. पाहणारा जो आत्मा तो. १०. शिंप. ११. रुपें. १२. किरणांच्या तापानें हवा पातळ झाली म्हणजे. १३. मृगजळ. १४. खुंटा. १५. बागुलबावा. १६. क्षणांत दिसून अदृश्य होणारें मांत्रिक नगर. १७. सत्यत्व, सत्त्व या स्थितीमध्यें. १८ लाट. हाच श्लोक 'चरमगुरुमंजरी'त आढळतो. १९. ह्या श्लोकाचा मूळश्लोक असा आहे:—'यथा तरंगकल्लोलैर्जलमेव स्फुरत्यलम् । पात्ररूपेण ताम्रं हि ब्रह्मांडादौ तथात्मता ॥' २०. 'अशी' अन्य पाठ.

घट[1]नामें जशी पृथ्वी, पटनामेंचि तंतुही, ।
जगनामें तसा आत्मा, असे आत्मा, नसे जग. ॥ ६४
ब्रह्म[2] प्रकाशेंचि ज्ञानें, वर्तती सर्वही जरी ।
अज्ञानें न कळे माती, देखोनी घट मानिती. ॥ ६५
कार्यकारणता ऐक्य, घटमातीस जे रिती ।
प्रपंच ब्रह्म दोहींस, श्रुतिनें, युक्तिनें[3] तसें. ॥ ६६
पाहतां घट दृष्टीनें बळें[4] मातीच दीसते, ।
प्रपंच पाहतां ब्रह्म, चित्प्रकाश दिसे बळें. ॥ ६७
सदा शुद्ध निराकार, सदा साकारही दिसे, ।
सुज्ञातें सर्वदा दोर, अज्ञातें सर्प सर्वदा. ॥ ६८
मृन्मात्रचि जसा कुंभ, तैसा चिन्मात्र देहही, ।
आत्मा अनात्मा हा भेद, व्यर्थंची करिती बुध. ॥ ६९
सर्परूपें जसा रज्जू, रूपें म्हणुनि शुक्तिका ।
मानिजे यां[6] रुपीं मूढीं, आत्माही देह मानिला. ॥ ७०
घटत्वें मानिजे पृथ्वी, पटत्वें तंतु मानिजे, ।
मानिली ये रिती मूढीं, देहरूपें चिदात्मता. ॥ ७१
कुंडलत्वें जसें सोनें, तरंगत्वें जसें जळ ।
मानिजे ये रिती मूढीं, आत्मा देहचि मानिला. ॥ ७२
मानिजे स्थाणु पुरुष, उष्णातें मानिजे जल, ।
शरीराकृति हे मूढीं, चिदात्मत्वेंचि मानिलीं. ॥ ७३
गृहत्वें मानिलीं काष्ठें, खड्गत्वें लोह मानिलें, ।
नेणोनि आत्मा मूढांनीं, देहकारेंचि मानिला. ॥ ७४
वृक्षाचें[7] विपरीतत्व, कोणा एका, जळें जसें ।
अज्ञानें आत्मयामध्यें, देह मूढा दिसे असा. ॥ ७५
नावेंत नावचांचल्यें सर्व चंचल दीसतें ।
आत्मा अकर्ता तो कर्ता अज्ञानें देहसा दिसे. ॥ ७६

---

१. ह्या श्लोकाचें मूळ असें:—'घटनाम्ना यथा पृथ्वी पटनाम्ना हि तंतवः। जगन्नाम्ना चिदाभाति ज्ञेयं तत्तदभावतः ॥'. २. मूळ 'सर्वोऽपि व्यवहारस्तु ब्रह्मणा क्रियते जनैः' स्पष्ट आहे. जरी सर्व लोक ब्रह्माशीं व्यवहार करितात तरी. ३. विचार. Reason. ४. विचाराच्या बळानें. ५. अज्ञानी मनुष्याला. ६. याप्रमाणें. ७. तळ्याच्या कांठावर वृक्ष असून ते उदकांत आहेत असा भास होणें.

पीवळेंसें दिसें शुभ्र नेत्ररोगेंकरूनियां ।
मूढदृष्टी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ७७
भोंवडी असतां नेत्रीं सर्वही भ्रमतें दिसें, ।
मूढबुद्धी तसा आत्मा, कर्ता देहचि भासतो. ॥ ७८
भोंवंडीतां कोलितातें वाटोळा सूर्यसा दिसे, ।
मूढदृष्टी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ७९
तें दिसे स्थूळ जें सूक्ष्म उपनेत्रेंकरूनियां, ।
मूढदृष्टी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ८०
पदार्थ मोठमोठेही दुरूनी सूक्ष्म दीसती, ।
मूढदृष्टी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ८१
काचभूमी दिसे पाणी, कांचासम दिसे जळ, ।
मूढबुद्धी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ८२
रत्नासम दिसे अग्नि, रत्नही अग्निसें दिसे, ।
मूढबुद्धी तसा आत्मा, देहरूपेंचि भासतो. ॥ ८३
न जाणतां पूर्व दिशा, वाटे पश्चिम ज्या रिती, ।
मूढबुद्धी तसा आत्मा, नेणतां देह भासतो. ॥ ८४
पूर्वेस धांवतां मेघ, चंद्र ही धांवतो तसा, ।
वाटे तैसा मूढदृष्टी, देह आत्माच वाटतो. ॥ ८५
जळीं चळे जसा चंद्र चंचळत्वें जळाचिया, ।
मूढदृष्टी तसा आत्मा, देह चंचळ वाटतो. ॥ ८६
ऐसा आत्मा न कळतां, शरीराध्यास होतसे ।
आत्मयांतचि तो लीन, होतो आत्मा कळे जयीं. ॥ ८७

---

१. कांवीळ झाली असतां. २. मूर्ख आहे दृष्टि ज्याची अशाला. ३. 'कोलीत' नपुंसकलिंगी आहे. येथें दुसरा शब्द अध्याहृत घेतला नाहीं तर कोलीतास पंडितांनीं पुंलिंगत्व दिलें असें मानावें लागेल. ४. लहानास मोठें करणारीं उपनेत्रें आचार्यांच्या व पंडितांच्या वेळेस होतीं काय? घे० शा० सं० वामनशास्त्री यांच्या १८८९ तील 'अपरोक्षानुभूती'च्या आवृत्तीमध्यें 'स्थूलत्वं चापि नेत्रतः' असा पाठ आहे तो पंडितांच्या पुढें नसावा. 'स्थूलत्वं चोपनेत्रतः' असा पाठ असावा. आचार्यांचाच हा पाठ असेल तर अनेक कल्पनातरंग उद्भवतात ते विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत. ५. 'काच' पुल्लिंगीही आहे. ६. मिथ्या आरोप (अध्यास). ७. देह. ८. नष्ट.

आत्मत्वें सर्व जाणावें विश्व स्थावर जंगम, ।
नसतां सर्व ही भाव, देहातें आत्मता कशी? ॥ ८८
जाणोनि आत्मा, कंठावा काळ आत्मानुभूतिनें ।
भोगें प्रारब्ध सारावें, चिंता कांहीं करूं नये. ॥ ८९
जाला जरी आत्मबोध, न प्रारब्ध तरी सुटे ।
श्रुति ऐसें बोलताहे, तेंही आतां निषेधितों. ॥ ९०
ब्रह्मात्मतत्त्व कळतां, भोग त्या आत्मया नसे ।
तेथें देहादि मिथ्यत्व, जागरीं स्वप्न जे रिती. ॥ ९१
जें जन्मांतरिंचें कर्म, तेंचि प्रारब्ध बोलिजे. ।
जन्मांतर अभावें तें, ब्रिंबात्म पुरुषा नसे. ॥ ९२
स्वप्नदेह जसा मिथ्या, तसा हा देह जो सुखी ।
तेथें कैंचें जन्म कर्म, ब्रह्मत्वीं भोगही नसे. ॥ ९३
उपादान प्रपंचाचें, पाहे माती घटीं जशी, ।
अज्ञान जातां वेदांतिं, विश्व नाहीं न कर्म ही. ॥ ९४
सोडूनि ज्ञान रज्जूचें सर्प घेतो[2] जसा भ्रमें, ।
तैसें असत्यांत सत्य नेणतां, जग पाहणें. ॥ ९५
जाणतां रज्जुरूपातें, सर्प नाहींच जे रिती ।
अधिष्टान कळे तेव्हां, प्रपंच न असे मग. ॥ ९६
देह प्रपंचची तेव्हां, कोठें प्रारब्ध राहिलें? ।
अज्ञदृष्टि दिसे देह, तें प्रारब्ध म्हणे श्रुती. ॥ ९७
**'क्षीयंते चास्य कर्माणि'**, साक्षात्कारीं म्हणे श्रुती ।
बहुत्वें बोलतां कर्म, प्रारब्ध हि, निषेधिलें. ॥ ९८
हें नेणतां वदे अज्ञ अनर्थद्वय तेधवां ।
हानि वेदांतशास्त्राची, त्याणें अज्ञान बोलिलें. ॥ ९९
पूर्वोक्तज्ञानसिद्ध्यर्थ आंगें सांगेन पंधरा ।
त्या प्रकारें सदा कीजे, निदिध्यासन उत्तम. ॥ १००
नित्याभ्यासाविणें शुद्धि न पावे सच्चिदात्मता ।
निदिध्यासेंच जिज्ञासु आत्मत्वीं स्थैर्य पावतो. ॥ १०१

---

१. पदार्थ. २. समजतो. ३. आधार, ब्रह्म. ४. ब्रह्मसाक्षात्कार झाला असतां. ५. पुष्कळ प्रकारांनीं. ६. हे दोन्ही अनर्थ दुसऱ्या पंक्तींत सांगितळे आहेत.

यम, नेम, तिजा त्याग, मौन ही, देश, काळ ही, ।
आसनें, मुळिचा बंध, देहसाम्यस्वदृक्स्थिति. ॥ १०२
प्राणायामांग दशम, प्रत्याहारण धारणा, ।
आत्मज्ञान समाधी हीं, क्रमें आंगें निरूपिलीं. ॥ १०३
सर्व ही ब्रह्म या ज्ञानें, इंद्रियें ब्रह्म दीसती ।
पुनः पुन्हा हा अभ्यास, तोचि इंद्रियसंयम. ॥ १०४
चैतन्यहेम पाहावें, जडत्वनग टाकुनी ।
पाहाती नियमें ज्ञानी, स्वानंदप्रद नेम हा. ॥ १०५
प्रपंचजडता त्याग, आत्मा सर्वत्र पाहतां ।
पूज्य हा त्याग थोराचा, या त्यागें मोक्ष रोकडा. ॥ १०६
जेथूनि वाचा परते, न पावोन मनासह ।
जें मौन जाणती योगी, ज्ञानी, मौन चि होय तें. ॥ १०७
जेथूनि वाचा परते, तें तों वाचे अगोचर ।
प्रपंच ही तें चि तेव्हां, वाचा ही ते चि निश्चित. ॥ १०८
सतांतें मौन सहज, बोलण्यांत हि होय तें ।
वैखरीमौन मूढांतें, पोटीं शब्द अनावर. ॥ १०९
देशें निर्जन तो जेथें, आदि अंतीं नसे जन ।
ब्रह्म चि मध्यें जन हें, कीं मध्यें जन हेम ची. ॥ ११०
ब्रह्मादि भूतें चळती, निमिषादि हि ज्यास्तव ।
ब्रह्म चि काळशब्दें तें, अखंडानंद अद्वय. ॥ १११
असतां ज्या प्रकारांत सुखें ब्रह्म स्फुरे सदा, ।
तेंचि आसन जाणावें, अन्य तें सुखनाशन. ॥ ११२
जें भूतादि स्वतःसिद्ध, विश्वाधिष्ठान अव्यय ।
त्याच सिद्धासनीं सिद्धी, सिद्ध ज्ञाते प्रवेशले. ॥ ११३
माया विश्वाश्वत्थमूळ, तिचें ही ब्रह्म मूळ जें ।
तेथेंचि तें मूळबंध, सर्वदा राजयोगियां. ॥ ११४
लय अंगा तरंगाचा, समीं चित्सागरीं स्फुरे ।
तें अंग सांग इतर, व्यर्थ जें शुष्ककाष्ठवत्. ॥ ११५

---

१. वाचा. २. 'आदावंते च मध्ये च जनो यस्मिन्न विद्यते । येनेदं सततं व्याप्तं स देशो विजनः स्मृतः ॥' असें मुळांत आहे. ३. अविनाशी. ४. विश्वरूपी पिंपळाचें मूळ.

कारणीं ठेवुनी दृष्टी, कार्य ब्रह्मचि पाहणें; ।
तें स्थैर्य दिव्य दृष्टीचें, तुच्छ नासाग्रलक्षणें. ॥ ११६
द्रष्टा, दर्शन, ही दृष्टी मुरे, चिद्रूप या स्फुरे ।
तेथेंचि दृष्टि योजावी, काय नासाग्र पाहणें ? ॥ ११७
चित्तादि सर्व वृत्तींतें ब्रह्मात्मत्वेंचि पाहणें, ।
निरोधें सर्ववृत्तींचा, तो प्राणायाम बोलिजे. ॥ ११८
प्रैत्यग्वृत्ति चिदात्मत्वीं, तो अंतर्मुख पूरक. ।
सुटे प्रपंचजडता, तो रेचक हळू हळू. ॥ ११९
वृत्तिस्थैर्य सदा द्वैतीं, तो प्राणस्थैर्य कुंभक, ।
प्राणायाम प्रबुद्धां हा, अज्ञ ते घ्राण चोळिती. ॥ १२०
विषयांत स्फुरे स्वात्मा, चित्स्वरूपीं बुडे मन ।
प्रत्याहार मुमुक्षूनें, शिकावा हा पुनः पुन्हा. ॥ १२१
जेथें जेथें जाय मन, स्फुरे ब्रह्मचि त्यास तें ।
मनाचें धरणें ऐसें, धारणा हेचि उत्तम. ॥ १२२
ब्रह्मात्मभावें सद्वृत्ति निरालंबपणें स्थिर ।
ध्यानशब्दें बोलिली ते परमानंददायिनी. ॥ १२३
वृत्ति टाकोनि आकार, ब्रह्माकारपणें मुरे ।
ते समाधि, दुजावृत्तिविस्मृति ब्रह्म लक्षितां. ॥ १२४
आनंद आवृत्ति तों हा, अभ्यासावा पुनः पुन्हा, ।
योजितां तत्क्षणीं चित्त, जों समाधिसुखीं बुडे. ॥ १२५
साधनें मग कां सिद्धा योगिराजा, तयास हें ।
न वियोग स्वस्वरूपाचा, मना वाचेस ही जयीं. ॥ १२६
समाधि साधितां, विघ्नें बळें येताति साधकां, ।
अनुसंधान तुटणें, भोगेच्छा आणि आळस, ॥ १२७
भय, निद्रा, कल्पना ही, तेज, चांचल्य, शून्यता, ।
ब्रह्मत्वें विघ्नबाहुल्य, त्यजावें हें हळूहळू. ॥ १२८
कल्पितां कल्पना होते, निजतां शून्य होतसे; ।
ब्रह्मीं तें वृत्ति ही ब्रह्म, साधावी पूर्णता तिनें. ॥ १२९

---

१. 'द्रष्टृदर्शनदृष्टीनां विरामो यत्र वै भवेत' असें मूळ आहे. २. कोंडणें; संयमन. ३. 'ब्रह्मैवास्मीति या वृत्तिः' हें मूळ. ४. नाक. ५. मोक्षेच्छूनें. ६. निराधारपणें. ७. मूळ पद्य:–'इमां चावृत्तिमानंदं तावत्साधुः समभ्यसेत.' ८. खालीं हीं विघ्नें दिलीं आहेत.

ब्रह्मात्मवृत्ति ऐशी जे सोडिती अतिपावनी, ।
जाणोनि, ते जिंती व्यर्थ, ते मानव पशूसम. ॥ १३०
जे जाणती ते वृत्तीतें, वाढवीते(तीः) कळोनि ही, ।
ते सत्पुरुष, ते धन्य, ते वंद्य भुवनत्रयीं. ॥ १३१
ब्रह्मात्मस्फूर्ति हे वृत्ति, वाढली पाक पावली, ।
ज्यांची ते पावले ब्रह्म, शब्दज्ञानीच अन्य ते. ॥ १३२
ब्रह्म बोलोनि कुशल, कामी सद्वृत्तिवर्जित ।
[3]आत्मज्ञ तेहि अज्ञान, येति जाति पुनः पुन्हा. ॥ १३३
ब्रह्मस्फूर्तिविना चित्त निमिषार्ध न ठेविती ।
ज्ञानी जैसे विरिंचादि[4], सनकादि शुकादिक. ॥ १३४
कार्यकारणता गेली नसतां कार्य कारणीं ।
कार्य मिथ्या, नसे तेव्हां न कारणहि त्याविणें. ॥ १३५
एवं [5]अनिर्वाच्य शुद्ध, जड वाच्यहि तें स्वयें ।
पहावें मृद्धटन्यायें, कीं कारणचि कार्यही. ॥ १३६
अभ्यासितां हा प्रकार, वृत्ति ब्रह्मत्व पावते ।
[6]वृत्ति ही ज्ञान ही बाणे, शुद्धचित्तास त्यावरी. ॥ १३७
जें कार्य वेगळें तेंची, आधीं कारण पाहणें; ।
अन्वयें व्यतिरेकें तें, कार्यांत मग पाहणें. ॥ १३८
पाहे कारण कार्यांत, अभावें कार्य तें त्यजी, ।
कारणत्वहि तें जातां, शुद्ध जें शेष तें मुनी. ॥ १३९
जें जें निश्चयबुद्धीनें तीव्र भावील होय तें ।
[7]भृंगीकीटकदृष्टांतें, होतो ज्ञानी स्वयेंचि कीं. ॥ १४०
चित्तादि न दिसे, आणी दिसे तें ही चिदात्मक, ।
निजात्मयातें सर्वस्वें ध्यावें राहोनि सावध. ॥ १४१
पहावें दृश्य ही ब्रह्म चिद्रसान्वित बुद्धिनें; ।
दृष्टी कठिण ही नीर, रसने जळ तें मृदु ! ॥ १४२

---

१. जगती. २. पकता. ३. जरी आत्मज्ञानी आहेत, तरी अज्ञानामुळें संसारचक्रांत पडतात. ४. ब्रह्मदेवादि. ५. वर्णन करण्यास अशक्य. ६. 'उदेति शुद्धचित्तानां वृत्तिज्ञानं ततः परम्' हें मूळ. ७. भृंगी (कुंभारीण नामक किडा) याचा ध्यास कीटकास अतिशय लागला म्हणजे तो कीटक भृंगी होऊन आकाशांत उडूं लागतो. या भृंगीकीटकदृष्टांताप्रमाणें. ८. पाण्याची धार. ९. जीभेला.

आंगें हीं पंधरा ज्यांत, बोलिलों राजयोग हा ।
हठयुक्ततया, ज्यांचे जळाले न बरे मळ. ॥ १४३
मन पक्क तयां हाच, राजयोगचि सिद्धि दे. ।
गुरुभक्तां ईशभक्तां, सर्वां सुलभ शीघ्र हा. ॥ १४४

### उपसंहार.

**समश्लोकी टिका ऐशी, अपरोक्षानुभूतिची ।**
**वामनें अर्पिली पायीं, शेषशायी गुरूचिया. ॥** १

---

## ३. भर्तृहरिकृत शतकें.

### नीतिशतक.

मी जीस चिंतित असें न रुचें तिला मी,
मानी तिला अपर, तो पैर अन्यगामी, ।
संतुष्ट मद्विषयिं अन्य वधूच पां ही,
धिक् तीस, त्यास, मदनास, मला, हिलाही. ॥ १

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें, ।
न जाणे न नेणे अशा पामराला, बुझावूं शकेना विधाता तयाला. ॥ २

बळानें काढूं ये मणि मकरदाढेंत दडला,
महा-सिंधू-लाटा-तरण करुं येई भुजबळा, ।
महासर्पातेंही सुमसम धरूं ये निजशिरीं,
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ ३

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि धंडे,
तृषार्ताची तृष्णा मृगजळजळें जाण विधडे, ।
सशाचेंही लाधे विपिनिं फिरतां श्रृंगहि जरी,
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ ४

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो,
किंवा वज्रमणी शिरीष[12]कुसुमें भेदावया धांवतो, ।

---

१. 'तिला अपर मानी' म्हणजे तिला दुसराच आवडतो. २. परंतु तो अन्यगामी आहे. ३. समजूत देऊं, शिकवूं. ४. काढावयास येतो. ५. बाहुबलानें. ६. फुलाप्रमाणें. ७. 'गळे' असा अन्य पाठ आहे. ८. 'मृगजळ पिऊनीहि वितळे' असें पाठांतर आहे. ९. नाहींशी होते. १०. अरण्य. ११. कमलतंतूनें. १२. शिरीषांच्या फुलानें.

किंवा तो मधुबिंदुनें मधुरता [1]क्षाराब्धिला आणितो,
जो 'मूर्खास सुभाषितें वश करूं' ऐसें [2]क्षणी बोलतो. ॥ ५
विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें, [3]स्वाधीन हें [4]पद्मभवें फुकाचें, ।
मूर्खासि जें मौनचि फार साजे, सभेसि त्यांच्या बहु जाणते जे. ॥ ६
[6]जधीं कांहीं कांहीं 'हरि,' 'कवि,' असे शब्द शिकलों,
तधीं 'मी सर्वज्ञ.' [7]द्विपसम मदें याच भरलों; ।
जधीं 'कांहीं नेणें' म्हणुनि वदले पंडित मला,
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला. ॥ ७
चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा,
पद्मावीण जलें, निरक्षर मुखीं जो सांजिरा गोजिरा, ।
[11]दौल्याला धनलोभ, नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं,
दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं, हीं सात शल्यें मनीं. ॥ ८
[12]शोणोल्लेख जया असा [13]मणि, रणीं जो वीर घायाळला,
संभोगें शिणली अशी नववधू, हस्ती न मस्तावला, ।
ज्यांचीं स्वच्छ शरदतूंत [14]पुलिनें त्या [15]निम्नगा, चंद्रही
[16]बीजेचा, प्रभु [17]पात्रदत्तधन जो, हे शोभती सर्वही. ॥ ९
[18]दुर्बळिकेंत पसा [19]येव इच्छितो, प्रभुपणीं धरणी तृण मानितो ! ।
[20]म्हणुनियां कृपणत्व उदारता, घडतसे समयोचित तत्त्वता. ॥ १०

---

१. खाऱ्या समुद्राला. २. एकदम, विचार केल्याशिवाय. ३. आपल्या ताब्यांत असणारें झांकण. तें कोणतें ? मौन (तोंड न उघडणें) हें होय. ४. ब्रह्मदेवानें. ५. विद्वानांच्या सभेंत. ६. जेव्हां. 'जधीं' हा 'यदा'पासून झाला. ७. हत्तीप्रमाणें. ८. भूयान् कामः अस्ति यस्याः सा कामिनी. ९. वृद्धपण. १०. दिसण्यांत सुंदर पण बोलण्यांत हेंद्रें. ११. 'प्रभुर्धनपरायणः' असें मूळ आहे. 'भर्त्याला' हा पाठ असेल काय ? राजा, सत्ताधीश, द्रव्यवंत, अशा अर्थाचा शब्द असणें इष्ट आहे. 'दाता' याचा अर्थ 'देण्यास समर्थ' म्हणजे श्रीमंत असा केल्यास आहे हा पाठ ही चालेल. १२. साहाणेवर घासलेला अशी खूण. १३. रत्न. १४. वाळवंटें. १५. नद्या. १६. द्वितीयेचा. १७. योग्य ठिकाणीं दिलें आहे धन ज्यानें असा प्रभु. मुळांत 'देऊन वेंचलें आहे धन ज्यानें असा प्रभु' असा भाव आहे व तो मनोहरही आहे. १८. दारिद्र्यदशेंत, दुबळी अवस्था प्राप्त झाली असतां. 'दुर्बळ'पासून 'दुबळा.' १९. तांदूळ. पसाभर तांदूळ. 'प्रसृत' (पसरलेला) पासून 'पसा' झाला. २०. म्हणून गरीबी व श्रीमंती हीं प्रसंगानुसार ठरविली जातात. संपत्ति ही वस्तुतः कांहीं नाहीं. आपल्यास गरज असेल

विपत्काळीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य भिरवे, ।
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जे,
तयांचे हे स्वाभाविक गुण सदा सत्पुरुष जे. ॥ ११
वानोत निंदोत सुनीतिमंत, चलो असो वा कमळा गृहांत, ।
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं, सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥ १२
न चोराला लाभे, प्रगट न दिसे, दे सुख सदा,
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेशहि कदा, ।
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असे,
असे त्याचें त्याशीं प्रतिभडति जे पामर पिसे. ॥ १३
जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा, संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा? ।
पद्माचा जो तंतु तो वारणाला, वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला. ॥ १४
झाला क्षीण बहु क्षुधेस्तव, जरी कीं व्यापिला वार्धकें,
आली कष्टदशा, घडो मरणही, कीं तेज गेलें निकें, ।
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा?
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तककुंभग्रासींच ज्याला स्पृहा. ॥ १५
सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेच ना,
घडो मरण, नावडे खलजनांप्रति प्रार्थना, ।
विपत्तिसमयीं पर प्रकटवीच ना दीनता,
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता? ॥ १६
ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं[13],
कीं जेंहीं[14] स्वकृतोपकारविभवें[15] सर्वत्र विस्तारिलीं, ।

---

त्या मानानें पदार्थांची किमत कमी जास्त होते. सबब संपत्तीसाठींच जन्म घालविणें हें समंजसपणाचें लक्षण नव्हे असा भावार्थ आहे.

१. विद्येचें ठायीं मात्र व्यसन (विशेष आसक्ति?). २. सत्पुरुषांचे हे सदा स्वाभाविक गुण आहेत. ३. लक्ष्मी जावो किंवा येवो. ४. 'विद्या' नांवाचें धन. ५. स्पर्धा करितात. अशांशीं जे स्पर्धा करितात ते मूर्ख होत. ६. परमार्थप्राप्तीच्या विचाराला. ७. हत्तीला. ८. निवारण करण्याला. ९. हत्तीचें डोकें हाच उत्तम घास त्याविषयी. १०. आपलें दैन्य. ११. तरवारीच्या धारेवर निजण्याचें व्रत. १२. देह आणि मन. १३. पूर्ण झालीं, तोंडातोंड भरलीं. १४. ज्यांनीं. १५. आपण केलेल्या उपकारांची संपत्ति.

लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी मानिती,
चित्तीं तोषहि पावती, सुजन ते नेणों किती नांदती ? ॥ १७

ऐकत्र केशव, वसे अपरत्र वैरी, अन्यत्र पर्वत शैतक्रतुभीत भारी, ।
कीं वाडवाग्नि इतरत्र असे उदार, पाहे कसें पण सैरित्पतिचें शरीर ! ॥ १८

महीपृष्ठीं केव्हां, अवचट पलंगीं पहुडतो,
क्षुधेतें शाकान्नें, अवचट सदन्नें निवटितो, ।
कधीं कंथाधारी, अवचट सुवस्त्रीं मिरवतो,
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो. ॥ १९

अंकित जे विधिचे सुर सर्वहि, त्यांस उगा प्रणिपात करावा,
प्राक्तनकर्म तसें फल दे, तरि तो विधि थोर किमर्थ म्हणावा ? ।
कर्मबलें कळतील फलें, तरि कर्मिंच भाव कसा न धरावा ?
दुर्बल ते सुर, दुर्बल तो विधि, काय तयांस्तव अर्थ घडावा ? ॥ २०

दुर्मंत्रें नृप, संगतिस्तव यती, कीं पुत्रही लालनें,
वेदानध्ययनें द्विजाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें ।
नासे शील, न पाहतां कृषि, मदें श्री, लाज मद्यें फुका,
शैठ्यें मित्रपण, प्रवासगमनें स्नेह, प्रमादें रुका. ॥ २१

लज्जेनें जड, दांभिक व्रतिपणें, कापट्य शौचें गणी,
शौर्ये निर्दय, आर्जवें लडबड्या, कीं दीन सद्भाषणीं, ।
मानेच्छा तरि मूर्ख, कीं बडबड्या, वक्ता निकामी भला,
ऐसा तो गुण कोणता खैलजनीं नाहींच जो निंदिला ? ॥ २२

---

१. असे संत कितीकसे आहेत ? २. एकीकडे. ३. दुसरीकडे विष्णूचे शत्रु. ४. इंद्रास भ्यालेले. ५. समुद्राचें. ६. एकादे वेळी, अवचित. ७. शक्=शकणें यापासून 'शाक' म्हणजे 'बलवंत' असा मूळचा अर्थ. भाजी हें पहिलें खाणें म्हणून किंवा भाजीनें शक्ति येते म्हणून तिला 'शाक' हें नांव मिळालें. ८. निवारितो. ९. मोठ्या मनाचा. १०. इष्ट हेतु साध्य करण्याविषयीं यत्न करणारा. ११. नशीबाचे. १२. पूर्वींचें. १३. त्यांच्या मदतीपासून काय फायदा आहे ? कर्म ठीक तर सर्व ठीक. यांतील अर्थ सर्वांसच मान्य व्हावा. १४. वेदाध्ययन न केल्यामुळें. १५. ब्राह्मण. दोनदां जन्म पावलेला. ब्राह्मणाचा मुलगा मुंजीच्यावेळीं पुनः जन्म पावतो असा शास्त्रोक्त निश्चय आहे. १६. शेतकाम. १७. लक्ष्मी. १८. दारू लावेला उडवून देते ! १९. लुच्चेगिरीनें. २०. पैसा. २१. व्रतें पाळल्यानें. २२. सद्वर्तन असलें तर. २३. काम नाहीं असा, आळशी. २४. दुष्ट लोकांनीं; पैशून्य पाहणारांनीं.

राहो[1] जाति रसातळीं, सुगुण हे राहोत कीं खालतें,
शैलाग्राहुनि[2] शील सत्वर पडो, सौजन्य अग्नींत तें, ।
शूरत्वावरि आदळो अशनि[3], कीं हें सर्वही नावडे,
अर्थप्राप्ति[4] असो निरंतर मला त्यावीण हे बापुडे. ॥ २३

पेटीमाजि निरोधिला[6] न सुटका ज्याला, भुकेला फणी,
तों केलें बिल मूषकें अवचितां तो आंत गेला क्षणी ! ।
त्यातें[7] भक्षुनि सर्प तत्कृतपथें निश्चित गेला पहा !
ऐसें कर्म अतर्क्य, यास्तव तुम्ही कीं स्वस्थ चित्तें रहा. ॥ २४

आस्फालितांहि[8] स्वकरें न राहे चेंडू, जसा तो उसळेचि पाहें; ।
विपत्तियोगें पडले जरी कां, तें स्थैर्य[9] नोहे तरि साधुलोकां. ॥ २५

चेंडू पडे आणि उठे तसाची(च), दृष्टांत हा सत्पुरुषांस साची(च); ।
मृत्पिंड[10] जो त्या उठणेंच नाहीं, दृष्टांत हा केवळ दुर्जनां ही ! ॥ २६

जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच,
जें दे पतीस सुख फार कलत्र[11] तेंच, ।
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी[12] तो,
हा लाभ पूर्वसुकृताविण केंवि होतो ? ॥ २७

संपत्कालीं कोंवळें सज्जनाचें होतें चित्त जाति पंकेरुहाचें[13], ।
आपत्कालीं शैलही आदळो[14] कां, धाकेना[15] जें[16], गाजवी धैर्यडंका[17]. ॥ २८

विद्यासमन्वितहि[18] दुष्ट परित्यजावा,
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा; ।
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं[19],
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं ? ॥ २९

---

१. जाऊं दे. २. पर्वताच्या शिखरावरून सत्स्वभाव खालीं हपटून त्याचे तुकडे होवोत. ३. वीज, वज्र. ४. कारण. ५. द्रव्यलाभ. पैशावांचून वरील सर्व गुण व्यर्थ आहेत. ६. कोंडून ठेवलेला व ज्याला सुटका नाहीं असा साप क्षुधाक्रांत झाला. ७. त्या उंदराला. ८. आफळतां, आपटला तर. ९. पडण्यामध्यें स्थीरपणा नाहीं म्हणजे पडले तसेच राहावयाचे नाहींत; वर उठतील. १०. मातीचा गोळा. ११. पत्नी, बायको. १२. स्नेही, मित्र. १३. कमळाचें. चिखलांत वाढणारें. पंक=चिखल त्यांत रुह (वाढणारें). येथें वृत्तभंग आहे. 'जाति' याचाही अर्थ चांगलासा होत नाहीं. १४. जरी आदळला तरी. १५. खचेना. १६. जें चित्त. १७. 'धैर्य-डंका' हा शास्त्रोक्त संयोग झाला असता. १८. विद्येनें विभूषित असला तरी. १९. मस्तकावर.

[1]क्षीरानें दिधले स्वकीय गुणही [2]नीरास आत्माश्रयें,
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ! ।
झाला [3]ताप विशिष्ट, अग्निवदनीं तें दुग्ध जेव्हां पडे,
तेव्हां धांवुनि तोय शीतल करी, मित्रत्व हें [4]चोखडें ! ॥ ३०

स्थापी दुर्जनता भल्यास, बुध जे स्थापी तयां मूर्खता,
आप्तांमाजि अनाप्तता कुवचनें स्थापी बळें तत्त्वता, ।
पीयूषासहि कालकूट करिते, सेवी तये चंडिके,
तीणें पावसि सौख्य, साधुपण हें लावील तूतें भिके. ॥ ३१

मलिन रुधिरमांसाविगळें हाड दैवें,
अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे; ।
क्षुधितहि [5]गजहंता जंबुकातें न मारी,
[6]अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी. ॥ ३२

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे, वर्णी [7]बरेच गुण झांकुनियां कुकर्में, ।
[8]दे आपणास असतां, व्यसनीं [9]त्यजीना, सन्मित्रलक्षण असें वदताति जाणा.॥ ३३

तृणें मृगाला, सलिलें [10]झषाला, संतोष [11]हे [12]वृत्ति महाजनाला, ।
तयांस निष्कारण तीन वैरी, [13]किरात [14]कैवर्तक दुष्ट भारी. ॥ ३४

तोयाचें परि नांवही न उरतें [15]संतप्त लोहांतरीं,
[16]तें भासे [17]नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी, ।
तें [18]स्वातिस्तव [19]अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें,
जाणा उत्तममध्यमाधम दशा [20]संसर्गयोगें टिके. ॥ ३५

---

१. दुधानें. २. पाण्यास. ३. पाण्यास अत्यंत ताप झाला तेव्हां. ४. निर्मळ, शुद्ध म्हणून चांगलें. ५. हत्तीला मारणारा सिंह. ६. प्रसंग पडला असतां. ७. चांगले गुण तेवढे. ८. वेळेस मदत करितो. ९. संकटकाळीं. १०. माशाला. ११. ही. तृण ही मृगांची, जल ही माशांची आणि संतोष ही सज्जनांची वृत्ति असतांही त्यांस शत्रू आहेतच ! दुष्ट मनुष्य कोणाशीं वैर करील याचा नेम नाहीं ! १२. जीवन. १३. पारधी. १४. धीवर. १५. तापलेल्या लोखंडावर. १६. तें पाणी, जलबिंदु. १७. कमलपत्रावर. १८. स्वाति नक्षत्र असतें तेव्हां. १९. समुद्रांतील शिंपल्याच्या उदरांत. २०. संगतीनें. मुळांत 'जायते' (उत्पन्न होतें) असें आहे. पंडितांनीं 'टिके' (टिकते) असें भाषांतर केलें आहे.

कुलाल व्यापारी कमलभव जेणें करविला,
दहा घेरे घे रे! म्हणुनि हरि धाकें (धोकीं?) भरविला, ।
भिकारी ज्या कैमें करुनि हर लोकीं फिरविला,
नमावें त्या जेणें रवि परि रिकामा नुरविला. ॥ ३६

पुष्पापरी दोंपरिंचाच साची हे वृत्ति संभावित जे तयांची; ।
लोकांचिये एक शिरीं सजावें, वनींच कीं एक सुकोनि जावें. ॥ ३७

मौनें मूक दिसे, वदे तरि महावाचा, स्वपार्श्वी फिरे
तेव्हां धीट, तसा विवेकच नसे जैं चालतां [११]अंतरें, ।
[१२]क्षांतीनें तरि म्याड, शांति न धरी तैं गांवढा, यापरी
सेवाधर्म असा [१३]अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं! ॥ ३८

नम्रपणेंच महोन्नत, जे गुण वर्णुनियां परकीय जनाचे
सांगितल्याविण दाविति कौशल सर्वजनांप्रति जें स्वगुणांचें, ।
स्वार्थ परार्थहि साधिति, जिंकिति शांतिबळें [१६]मुखरत्व खलांचें,
संत महाद्भुतभाजन यापरि सेवन कोण करी न तयांचें? ॥ ३९

[१८]तैं कां दुर्गुण, लोभ जैं? पिशुनता जैं, कां महापातकें?
काशाला तप, सत्य जैं? मन सुरे जैं, कां सुतीर्थादिकें? ।
काशाला जन(गुण?), जैं भलेपण असे? कां भूषणें, कीर्ति जैं?
सद्विद्या जरि, कां धनें? मरण कां, दुष्कीर्ति लोकींच जैं? ॥ ४०

अदृष्ट झालें प्रतिकूळ जेव्हां, वारील तैं पद्मविहार तेव्हां; ।
जे [२३]क्षीररनीरादिविवेक, नों, ना, त्यों हंसकीर्तीस हरूं शकेना. ॥ ४१

खल्वाट चंडकिरणें अतितप्त झाला, छायार्थ तालतरुमूलसमीप गेला; ।

---

१. कुंभाराचें काम करणारा. २. ब्रह्मदेव. ३. फेरे, अवतार. ४. विष्णु. ५. आक्तनानें. ६. शंकर. ७. राहूं दिला नाहीं. ८. शोभावें. संभावितांचें वागणें फुलासारखें असतें. ९. मोठा बोलभांड. १०. आपल्या पाठीमागें. ११. लांब राहिला तर मूर्ख. १२. क्षमा करणारा असला तर. १३. अंत न लागणारा, अगम्य, अशक्य. १४. आपल्या नम्रपणानेंच महत्पदास पावणारे. १५. लोककल्याणासाठींच जे स्वार्थ साधतात. १६. बडबड. १७. अद्भुतरसाचें (आश्चर्याचें) पात्र. १८. तेव्हां. जैं (जेव्हां) आपल्या अंगांत लोभ आहे तेव्हां इतर दुर्गुणांची मातब्बरी नाहीं. लोभाच्या पाथीं सर्व दुर्गुण येतातच. १९. खलत्व. २०. नशीब, विधि. २१. नाहींसा करील. २२. कमलविहार. २३. पाणी आणि दूध यांचें पृथक्करण करण्याचे गुण. २४. नाहीं, नाहीं! २५. त्याविषयींच्या. २६. टकल्या. २७. तालवृक्षाच्या बुंधाजवळ.

तत्काल थोर पडलें फळ, तो निमाला! ये जेथ दैवहत, येइल तेथ घाला.॥ ४२
विद्या सुरूप कुळ सेवन शील पाहीं, यांचे [2]गुणीं किमपि कांचनलब्धि नाहीं; ।
तें [3]पूर्वपुण्य समयींच फळे नराला, कालीं जसें फळ वडे [4]धरणीरुहाला. ॥ ४३
भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें,
ज्ञानाला शम, त्या [5]श्रमास विनय, द्रव्यास दातृत्व तें, ।
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता,
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वता. ॥ ४४
हे तों सत्पुरुष स्वकार्य त्यजिती, अन्यार्थही साधिती,
हे तों मध्यम जे निजार्थ करुनी अन्यार्थ संपादिती, ।
हे तों राक्षस जे स्वकार्यविषयीं अन्यार्थ विध्वंसिती,
जे कां व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण कीं [6]दुर्मती? ॥ ४५
खरें वचन बोलवी, जडपणास कीं [7]मौलवी,
महोन्नतिस डोलवी, [8]दुरित मारुनी चालवी, ।
मनीं सुख अमोल [9]वी, यश जगत्रयीं [10]कौलवी,
अनेक गुण [11]पौलवी, सुजनसंग तो [12]भूलवी. ॥ ४६
वांछा सज्जनसंगमीं, गुरुकुलीं [13]वंदारुता नम्रता,
निंदेचें भय, तुष्टता परगुणीं, स्वस्त्रीसुखीं लुब्धता, ।
विद्याभ्यास, महेशभक्ति, खलसंसर्गी अनासक्तता,
चित्ताचा जय, यां [14]गुणांस निधि जे, त्यां वंदिजे तत्त्वता. ॥ ४७
तृष्णेतें [15]निवटीं, क्षमेस [16]जवटीं, गर्वादिकांतें पिटीं,
सत्यातें उमटीं [17]हृदंबुजपुटीं, सेवीं दया [18]गोमटी, ।
विद्वत्स्नेहतुटी नको करुं, भले [19]त्यांच्या गुणांतें लुटीं,
वंशीं [20]कीर्तिवटी उभारिं, अरिषड्वर्गासि तूं आपटीं. ॥ ४८

---

१. फुटक्या नशीबाचा. २. हे सर्व गुण असले तरी धनप्राप्ति होतेच असा नेम नाहीं. ३. पैसे मिळणें ही पूर्वपुण्याईची गोष्ट आहे. ४. झाडाला. ५. मुळांत 'श्रुतस्य' (विद्येला) असें आहे. ६. ते दुर्मती (दुष्टबुद्धीचे लोक) कोण (कोणत्या वर्गांत घालावयाचे?) ७. घोलवून टाकितो. ८. पाप. ९. उत्पन्न करितो. १०. पसरितो. कालवणें (एकत्र करणें). ११. पहाव फोडितो. १२. त्याच्याविषयीं काय म्हणावें, हें समजत नाहीं! म्हणून भुलवी. १३. पूज्यभाव. १४. गुणांचे आश्रयस्थान. १५. नाहींशी कर. 'निवर्तन' हा मूळ शब्द. १६. जवळ करीं. १७. हृदयकमलाच्या पुटामध्यें, अंतःकरणांत. १८. सुंदर. १९. जे भले त्यांच्या. २०. कीर्तीचें उद्यान (बाग).

खोटें बरें कार्य असो, तयाचा विचारिजे कीं परिणाम साचा; ।
कर्तव्य कीं जें विबुधें विवेकें, तें अन्यथा शल्य घडे विपाकें. ॥ ४९

श्रीखंडाच्याच काष्टेंकरुनि शिजवितो पेंड वैडूर्यपात्रीं,
किंवा तो अर्कमूलास्तव कैनकहलें नांगरीतो धरित्री, ।
केळी तोडूनि टाकी त्वरित चहुंकडे पेरितो कोद्रवातें,
जो या येऊनि लोकीं सुकृत न करितां आचरे दुष्कृतातें. ॥ ५०

वनीं, रणीं, शत्रुजलाग्निसंकटीं, महार्णवीं, पर्वतवासदुर्घटीं ।
निजो, बसो, आणि फिरो अरण्यें, त्या त्या स्थलीं रक्षिति पूर्वपुण्यें. ॥ ५१

होती अरण्येंच पुरें तयाला, समस्तही होतिल आप्त त्याला ।
मही तया होइल पूर्ण रत्न, ज्याला जसें संचित पूर्वपुण्य. ॥ ५२

अब्धीमाजि बुडो, प्रयत्न करुनी हेमाद्रिशृंगीं चढो,
शत्रूतें रगडो रणीं, क्रयकृषिव्यापारकर्मीं भिडो, ।
विद्या सर्व पढो [11]कँडोविकडिच्या, [12]व्योमास लंघो, उडो,
जें होणार चुकेचि ना विधिबळें कोणी रडो ना रडो. ॥ ५३

मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा,
प्रहारें वज्राच्या करुनि धरणीं [13]इंगळसडा, ।
पित्यातें(चे?) संग्रामीं, त्यजुनि भय निःशंक भिडणें,
नव्हे त्या मैनाका उचित जलधीमाजि दडणें. ॥ ५४

ज्याला नीति वदे बृहस्पति, [16]करीं वज्राअशीं आयुधें,
विष्णूचें बल, शुभ्र वारण, तशीं स्वर्गादि नानाविधें; ।
दुर्गे, सैनिक देव, यद्यपि तरी युद्धीं पळे [20]वृत्रहा,
धिक् धिक् पौरुषयत्न, यास्तव खरें प्रारब्ध मोठें पहा. ॥ ५५

---

१. विपरीत परिणामानें. २. चंदनाच्या. ३. रत्नाच्या भांड्यामध्यें. ४. रुईचीं मुळें मिळ-विण्यासाठीं. ५. सोन्याच्या नांगरानें. ६. हरीक. (एक (निःसत्व धान्य.) ७. डोंगरावर राहण्याचें अवघड संकट आलें असतां. ८. हित करणारे सुजन. ९. मेरूच्या शिखरावर. १०. झोडपून काढो. 'रक्त काढणें' यापासून 'रगडणें' झाला काय? ११. नाना प्रकारच्या कोश्या करितां येतील अशा विद्या. १२. आकाशाला. १३. विस्तवाचा सडा (पाऊस) धर-णीवर पाडून. हा सडा व वज्र मैनाकाच्या द्वंद्वयुद्धांत पडावयास पाहिजे होता—असा क-वीचा आशय. १४. बापावर, हिमालयावर युद्धप्रसंग आला तेव्हां. इंद्रवज्रास भिऊन मैनाक पळाला त्याला अनुलक्षून ही उक्ति आहे. १५. हिमालयाचा पुत्र. १६. हातांमध्यें. १७. ऐरावत. १८. बहुतप्रकारचीं. १९. इतकी सामुग्री होती तरी. २०. इंद्र.

कर्मानुसार घडते मति सर्व लोकां, कर्माअधीन फल येथ, नसेच शंका. ।
हें सत्य यद्यपि, तरी असतां विवेकें[1] होणार हो मग सुखें निजकर्मपाकें.[2] ॥ ५६
आलस्य जें कार्यविघातकारी,[3] असूं नये तो रिपु या शरीरीं. ।
उद्योग सद्बंधु तया न टाकीं, त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं. ॥ ५७
वनचरांसह शैलवनांतरें[4] निजसुखें फिरणें, तरि तें बरें; ।
जरि घडे सहवासचि पामरीं, तरि जळो असणें सुरमंदिरीं.[5] ॥ ५८
द्रव्यास हे गमनमार्ग[6] यथावकाश, कीं दान भोग अथवा तिसरा विनाश ।
जो घे न भोग, जरि पात्रकरीं[7] न दे ही, त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं. ॥
असे जयाला धन तोचि पंडित, कुलीन तो, तोचि गुणी, बहुश्रुत, ।
तो मान्य, तो सुंदर, तो विचक्षण; धनाश्रयें[8] राहति सर्वही गुण. ॥ ६०
अमूल्य रत्नीं[9] सुर ते न धाले, हालाहला देखुनियां न भ्याले, ।
सुधेविणें,[10] वास्तव जे समर्थ, न निश्चितार्थाविण ते कृतार्थ. ॥ ६१
शनिबुधकुजदेवाचार्यशुक्रादिकांतें,[11]
असमबल म्हणोनी राहु टाकी तयांतें; ।
धडहि[12] जरि झाला ग्रासितो सूर्यचंद्रां,
म्हणउनि पुरुषार्थी तो[13] न सोडी स्वमुद्रा.[14] ॥ ६२
श्रुतेंचि[15] कीं श्रोत्र न कुंडलानें, दानेंचि कीं पाणि न कंकणानें; ।
साजे तसा देहहि हा, न अन्यें,[16] परोपकारेंचि,[17] न चंदनानें. ॥ ६३
जयांचें असे पुण्य कीं सावकाश,[18] विशेषें जनीं शोभती ते कवीश; ।
जयांचा यशोदेह[19] आकल्प राहे, जरामृत्युवार्ता जयाला[20] न साहे. ॥ ६४

---

१. सद्बुद्धि धारण करावी. २. आपल्या कर्माच्या परिणामाप्रमाणें काय व्हावयाचें तें सुखें होऊं द्यावें. विषाद मानूं नये. ३. कामाचा नाश करणारे. ४. पर्वतांवर अगर वनांत. ५. स्वर्गलोकीं सुद्धां वास करणें नको. ६. जाण्याचे मार्ग, खर्च करण्याचे मार्ग. ७. सत्पात्रीं. ८. धनाच्या आश्रयानें. ९. रत्नें मिळाली तरीं. १०. सुधेविणें (अमृतावांचून) ते कृतार्थ झाले नाहींत. वास्तव समर्थ ते निश्चितार्थाविण (ठरविलेला अर्थ मिळविल्याखेरीज) कृतार्थ होत नाहींत. ११. शनि, बुध, मंगळ, गुरु आणि शुक्र. १२. शिरापासून धड वेगळें झालें तरी. नुसतें शिरच राहिलें तरी. १३. जो आहे तो. १४. आपणास योग्य असें कुल करावयाचें तें. १५. वेदवाक्यें ऐकल्यानेंच. १६. दुसऱ्यानें. १७. परोपकारानेंच देहास शोभा येते, चंदनानें अगर दुसऱ्या कशानें येत नाहीं. १८. पुष्कळ. १९. कीर्तिरूपी देह विश्वप्रलयापर्यंत राहतो. २०. ज्या यशोदेहाला.

ब्रह्म्यानें लिहिलें ललाटफलकीं[1] जें द्रव्य ज्याला असे,
तें लाधे मरुमंडलीं[2], अधिकता मेरूस गेल्या नसे. ।
सेवीं धैर्य, धनांध[3] त्यांप्रति वृथा दावूं नको दीनता;
कूपीं कीं जलधीत कुंभ जल घे, जें मापिलें[4] तत्त्वता. ॥ ६५
तें श्वान एक तुकड्यास्तव चार[5] नाना दावी धन्यास जठरार्थ, कसें पहाना? ।
दे आळवूनि जरि हस्तिप[6] 'बापभाई!' घे तोचि घांस गजराज, कशी बढाई?॥ ६६
प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा[7], नृपा! तूं करीं फार सांभाळ याचा; ।
स्ववत्साग्रिया जाण वात्सल्ययोगें अभीष्टार्थ[8] देईल हे भूमि वेगें. ॥ ६७
केव्हां सत्य वदे, वदे अनृत ही, केव्हां वदे गोड ही,
केव्हां अप्रिय ही, दयालु हि असे, केव्हां करी घात ही, ।
जोडी अर्थहि जे यथेष्ट समयीं[9], कीं वेंच ही आदरी,
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी. ॥ ६८
क्षणी विसंबाल[10] महीपतीला, स्वकीय कोणीच नसे तयाला, ।
अध्वर्यु हो कीं यजमान त्यातें, हुताश[11] जाळी धरितांच हातें! ॥ ६९
हे तों नव्हेत कुलपर्वत[12] कीं ढळाया, कीं क्षुद्र सागर नव्हेत उचंबळाया, ।
ज्यांचें महाप्रलयिं धैर्य पहा चळेना, त्यांशीं दुराग्रह नको, तुज हें कळेना. ॥ ७०
फुका कोरडें वैर कीं निर्दयत्व, परस्त्री परद्रव्य हें मुख्य तत्त्व, ।
अनिष्टत्व[13] चिंती सुहृद्बांधवांचें, स्वतःसिद्ध हें रूप पैं दुर्जनांचें. ॥ ७१
कांताकटाक्षशर हे रुतती न ज्याला,
तावी[14] न कोपज[15] हुताशनही जयाला, ।
ज्याच्या मनीं न जडती विषयादि पाश,
तो धीर जिंकित[16] जगत्त्रय सावकाश. ॥ ७२
आरंभीं जे फार, शेखी[17] न कांहीं; आधीं थोडी, जे क्रमें फार पाहीं; ।

---

१. कपाळपट्टीवर. २. मारवाड्यांत, निर्जल प्रदेशांत. ३. धनोन्मत्त जे त्यांप्रत. ४. त्या कुंभांत राहील इतकेंच. ५. चाळे. ६. महात. ७. दुभती गाय. पृथ्वीरूपी गाईला. ८. जें तुला इष्ट असेल तें, ही भूमि कामधेनूच होईल. ९. वेळेनुसार. 'जोडी' व 'वेंच' (खर्चं आदरी) या दोहींकडे अन्वय घ्यावा. १०. विश्वास ठेवाल. 'विश्रंभणें'पासून 'विसंबणें.' ११. हुत (अर्पण केलेलें, अग्नीत टाकलेलें)+आश (खाणारा) म्हणून अग्नि. १२. 'महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमान् गंधमादनः। विंध्यश्च परियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः॥.' १३. अकल्याण. १४. तापवी. १५. कोपापासून उत्पन्न झालेला अग्नि. १६. जिंकितो. १७. शेवटीं.

छाया पूर्वार्धापरार्धा[1] दिनाची, तैशी मैत्री दुर्जनाची, भल्याची. ॥ ७३

दे दान गुप्त; उपकार करी, न बोले; मानी प्रमोद[2] जरि मान्य घरास आले; ।
दावी न गर्व विभवें[3]; गुण घे पराचे[4], खड्गाग्रतुल्यविषमव्रत[5] हें भल्याचें. ॥ ७४

कीं तोडिला तरु फुटे क्षणखी भरानें,
तो क्षीणही विधु[6] महोन्नति[7] घे क्रमानें; ।
जाणोनि हे, सुजन, ज्या दुर्बळीक[8] आली,
त्याशीं कदा न करिती सहसा टेवाळी. ॥ ७५

आली जरी कष्टदशा अपार, न टाकिती धैर्य तथापि थोर; ।
केला जरी पोतें[9][10] बळेंचि खालें, ज्वाला तरी ते वरती उफाळे[11]. ॥ ७६

दारिद्य ज्यांजवळि अप्रिय[12] बोलण्याचें, भांडार ज्यांजवळि वाग्रसमाधुरीचें[13]; ।
स्वस्त्रीपरायण, अनिंदक जेच तेहीं[14], भूभाग हे विलसती[15] अतिरम्य पाहीं. ॥ ७७

पद्में[16] प्रफुल्ल करितो सविता स्वयें हा;
रात्रीं विकास कुमुदांप्रति चंद्र दे हा; ।
अप्रार्थितां जलद दे जल या जनाला;
मुक्ता(क्ष्या ?)र्थ कीं परहितोत्सव सज्जनाला. ॥ ७८

बरें तें या देहीं(हा ?) महिवरि कडेलोट करणें,
महासर्पाच्या कीं वदनिं तरिही हात धरणें, ।
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें,
जळो तें तें[17] लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें. ॥ ७९

त्याला वन्हि जळापरी, जलधि हा कीं ओहळाचे परी;
मेरु स्वल्प शिळेपरी, मृगपती[18] तो ही कुरंगापरी; ।
कीं[19] तो सर्प फुलापरी, विषजळें पीयूषवृष्टीपरी[20];
होतें सर्वहि यापरी, वसतसे सच्छील ज्याचे शिरीं. ॥ ८०

---

१. सूर्योदयापासून मध्यान्हकालापर्यंत पूर्वार्ध. मध्यान्हकालापासून सायंकालापर्यंत अपरार्ध (दुसरें अर्ध). २. आनंद. ३. संपत्ति प्राप्त झाली असतां. ४. दुसऱ्याचे. ५. तरवारीच्या अग्रावर उभे राहण्याप्रमाणें कठिण व्रत. ६. चंद्र. ७. मोठी उन्नति, पूर्णावस्था. ८. दुर्बळपणा, गरीबी. ज्याला दैन्यावस्था प्राप्त झाली त्याची. ९. खोडी. १०. मशाल. ११. वर येते, वर चढते. १२. कटु बोलण्यामध्यें जे दरिद्री. १३. गोड वाणीचें. १४. त्यांनीं. संस्कृत 'तैः'चा 'तेहीं' झाला. १५. शोभा पावतात. १६. कमळें. १७. निज सच्छील त्यजुनि लोकीं फिरणें तें तें जळो!—हा अन्वय. १८. सिंह. १९. किंवा. २०. अमृताचे वृष्टीप्रमाणें.

क्रोधें जळे मणि अचेतन सूर्यकांत, ज्या लागतांच दिननायकपादवात; ।
संभावितांत गणना पैहिली जयाची, साहेल तो पण कशी शठता दुजाची ?॥ ८१

ज्या आवडेचि खल, आपणही तसाच, दुर्वृत्त फार, निरपत्रप, दुष्ट, नीच; ।
आलें तयास जरि वैभव दैवयोगें, नांदे तयास्तव सुखें मग कोण सांगें ? ॥ ८२

विद्या हे पुरुषास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्य ही,
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा, ते मान्य मान्यास ही, ।
विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता,
विद्या पूज्य नृपास, हा नरपशू तीविगळा तत्त्वता ! ॥ ८३

करीं साजे त्याग, श्रवणयुगलीं सच्छ्रवण जें,
मुखीं सत्य, स्वच्छाचरण, विलसे शौर्यहि भुजे, ।
स्वशीर्षे थोराला नमन, विभवावांचुनि पहा
भल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकारविधि हा. ॥ ८४

शूरेंचि अथवा शूरें हें भूमंडल सर्वथा ।
पादाक्रांत करावें कीं, इतरांची असो कथा ! ॥ ८५

वाहे महीतें स्वशिरीं फणी तो ! तयासि पाठीवरि कूर्म वाहतो ! ।
समुद्र घे त्यास हि मांडियेवरी ! थोराचि हे थोरवि जाण यापरी. ॥ ८६

उपजणें मरणें न चुके नरा, फिरत नित्य असे भवभोंवरा, ।
उपजला तरि तोच मळा गमे, कुल समुन्नति ज्यास्तव घे, रमे. ॥ ८७

वृक्ष फार लवती फलभारें, लोंबती जलद घेउनि नीरें, ।
थोर गर्व न धरी विभवाचा, हा स्वभाव उपकारपराचा. ॥ ८८

---

१. दिवसाचा पति सूर्य त्याचा पाय लागतांच. (अपमान होतांच!) २. प्रथम गणना (स्थान) ज्याचें. ३. दुष्टपणा. ४. दुष्टच. ५. त्याच्या संगतींत राहिलें म्हणून. ६. विद्या हें झांकलेलें धन आहे. ७. खरोखर. ८. शोभतो. ९. चांगलें, ऐकण्यासारखें ऐकणें. १०. शोभादायक अलंकार घालण्याची पद्धति. ११. सूर्यानें. 'सूरसूर्यार्यमादित्यद्वादशात्म-दिवाकराः' इत्यमरः. सूरः (शूरः) इति टीकायाम्. १२. किरण, पाय. १३. राहूं द्या, एकीकडे ठेवा. १४. शेष. १५. थोराला आणखी जास्त थोर आहेच. शेरास सव्वाशेर सर्वत्र आहे, असें जाणून घे. १६. संसाराचा चक्रासारखा फिरणारा भोंवरा. 'भ्रमण'पासून 'भोंवरा'. १७. कीर्ति, मोठेपणा. १८. जो जन्मला म्हणून. १९. पाणी घेऊन. २०. उपकाराचें व्रत ज्याचें अशाचा हा स्वभावच!

ताळीं भार कूर्मापरी जे न घेती, ध्रुवाचे परी ऊर्ध्व मेढा वहाती, ।
वृथा जन्मती पावती नाश तैसे, मधें उंबराच्या फळीं जंतु जैसे. ॥ ८९
जीं बंधनें गजभुजंगविहंगमाला, कीं राहुवेध[1] रजनीशदिवाकराला, ।
दारिद्र्य पंडितजनांवरि फार लोटे, हें पाहतां मग अदृष्ट[2] वलिष्ठ वाटे. ॥ ९०
जें पात्र[3] कां पुरुषरत्न महागुणांचें, तें निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें; ।
कीं त्यासही त्वरित मृत्युमुखांत लोटी, त्याची[4] गमे मज अपंडितता करंटी. ॥ ९१
सिंहाचा जो बाळ, तो ही चपेटा मारी त्याला जो करी मत्त मोठा. ।
तेजस्वी जे वृत्ति ऐसीच त्यांची, तेथें नाहीं चाड[5] कांहीं वयाची. ॥ ९२
सद्रत्न, हार, मणि, ताइत बाहुदंडीं,
कीं स्नान, चंदन, फुलें, तरि लांब शेंडी, ।
यांनीं खरी, घडतसे पुरुषा न शोभा;
वाणीच भूषण सुशिक्षितशब्दगर्भा[6]. ॥ ९३
वाणी खरी, दान बरें, अहिंसा, नसे परद्रव्यसतीपिपासा[7], ।
दया, अतृष्णा[8], नैतिभाव[9] जो कां; सन्मार्ग हा घोपट[10] सर्व लोकां. ॥ ९४

---

## शृंगारशतक.

विधिहरिहर जेणें दास केले स्त्रियांचे,
चरित अतुल ज्याचें वर्णवे हो न वाचे, ।
त्रिभुवनविजयी जो पुष्पधन्वा[11] तयाला,
सकलसुरवरिष्ठा म्यां नमस्कार केला. ॥ १
मंद हास, निजभाव दावणें, बोल, लाज, परतोनि पाहणें, ।
खेळणें, झडगणें, न हांसणें, स्त्रीस्वभाव अवघे च बंधनें. ॥ २
भ्रूभंगयोजितकटाक्ष[12] हि, गोड वाणी, दावूनि हास्य वरि, त्यांत हि लाज आणी, ।
कीं चालणें हळुच, थोपुनि राहणें हें, कांतास भूषणहि[13] शस्त्रहि हेंचि पाहें. ॥ ३

---

१. ग्रहणाचें भय, चिंता. २. दैव. ३. आश्रयस्थान. 'महागुणांचें' इकडे अन्वय. ४. विधीची नीच मूर्खता. ५. किंमत. ६. चांगले शिकविलेले (संस्कृत) शब्द आहेत जिच्या गर्भांत (पोटांत) अशी वाणी. ७. परक्याचें धन व परस्त्री यांची इच्छा. ८. निरिच्छपणा. ९. नम्रता. १०. सरळ. ११. मदन. १२. भोंवयांच्या वर ओढण्यानें योजना केलेले कटाक्ष (दृग्बाण). १३. हेच अलंकार व हींच शस्त्रें.

आतां कसें करूं? कोठें जाऊं? या[1] निर्मिल्या कशा? ।
यांच्या विचित्र नेत्राब्जीं[2] व्यापिल्या सर्व ही दिशा! ॥ ४
चंद्रतुल्य मुख, राजस[3] डोळे, स्वर्णवर्ण[4] वपु, कुंतल[5] काळे, ।
मांसल स्तन, नितंब हि, लेणें[6] हें स्त्रियांप्रति अकृत्रिम[7] बाणे. ॥ ५
डोळे विशाळ अति चंचळ, मंद हास, चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास, ।
शोभा हरी[8] चरण कोमलपल्लवांची, कीं चांगलीच तरुणत्वदशा स्त्रियांची. ॥ ६
प्रेमप्रसन्न वनितामुख पैं पहावें, कर्णीं तिचें वचन सादर आयकावें, ।
आस्वादिजे तदधरामृत, ते स्मरावी, ते स्पर्शिजे म्हणुनि तन्मय तीस भावी. ॥ ७
झणत्कार ज्यांच्या पदीं नूपुरांचा, रुणत्कार ज्यांच्या करीं कंकणांचा, ।
कुरंगेक्षणा ज्या स्वनेत्रांतपातें[9], हरीनात कोणाचिया या मनातें? ॥ ८
पीन जिचे कुच शोभति भारी, केशरचंदनचर्चित गौरी[10], ।
नूपुरशब्द पदाब्जविहारी, ते कवणा न करी वश नारी? ॥ ९
अबला[11] वदताति जे स्त्रियांला कवि, त्यांला विपरीत बोध झाला; ।
जितले सुर सर्व दृष्टिपातें, अबला नाम दिजे कसें तयांतें? ॥ १०
सत्य आज्ञाकार[12] तीचा मकरध्वज[13] भासतो, ।
तन्नेत्रसूचितस्थानीं वेगीं तत्काल धांवतो. ॥ ११
मोठे संयमशील[14] केश, नयन श्रुत्यंत[15] ही पावले,
अंतर्वक्त्र सुनिर्मळ द्विजगणीं[16] जें सर्वदा सेविलें, ।
मुक्तांचा[17] सतताधिवास हृदयीं, सद्वृत्तता[18] ही स्तनीं,
ऐसें शांत शरीर ताप करितें! कां सांग वो कामिनी!? ॥ १२

---

१. या स्त्रिया. २. नेत्रकमलांनीं. ३. सुंदर, मदनोद्दीपक. ४. सोन्याच्या रंगाची. ५. केश. ६. अलंकार. ७. सहज, केलेलें नव्हे. ८. हरण करितात. ९. स्वतःच्या डोळ्याच्या बाहेरील कोपरा, त्याचें पतन. १०. गौरवर्णाची नारी. हाच अर्थ येथें इष्ट आहे. वयपरत्वें बाला, गौरी, तरुणी, प्रौढा असे स्त्रीविभाग आहेत, त्यांतील गौरी विभाग येथें इष्ट नाहीं. ११. 'स्वल्पं बलं यासां ताः अबलाः.' १२. आज्ञेप्रमाणें काम करणारा सेवक. १३. मकराचें चिन्ह आहे ध्वजाचे ठायीं ज्याच्या असा मदन. १४. बांधलेले; (पक्षीं) निग्रह करून सन्मार्गानें वागणारे. १५. कानांपर्यंत; (पक्षीं) वेदाध्ययन पूर्ण केलेले, वेदांती. १६. दोनदा जन्म आहे ज्यांस अशा स्वच्छ दातांनीं; (पक्षीं) पुण्यवंत अशा ब्राह्मणांनीं. १७. मोतीं; (पक्षीं) मुक्त झालेले लोक. १८. गरगरीत वाटोळेपणा; (पक्षीं) सदाचारता.

मुग्धे! तुझी अपूर्वा हे धनुष्मत्ता दिसे निकी, ।
विंधिसी लोकचित्तातें गुणांहीं न च सायकीं! ॥ १३
असो दीप, असो अग्नि, असोत मणि सर्व रे! ।
अंधकार विना कांतामुखचंद्रें न संहरे. ॥ १४
स्वभावें उद्वृत्त स्तन, चपल हें लोचनयुग,
तसा रागी ओष्ठ, प्रकृतिकुटिल भ्रूभ्रमण गे! ।
करो पीडा मातें; तदपि तव सौभाग्यलिपिका,
करीं कष्टी मध्यें स्थित असुनियां रोमलतिका! ॥ १५
भास्वद्देहराशी वक्त्र, गुरु हि स्तनभार ते, ।
शनैश्चर पदद्वंद्व, ग्रहरूप विराजते. ॥ १६
मांड्या, नितंब, जघन, स्तन, पुष्ट तीचे, पूर्णेंदु साम्य न धरी सखिच्या मुखाचें. ।
हें आकुलत्व त्यजि टाकुनियां, मना! तूं साधीं महासुकृत सर्वसुखैकहेतु. ॥ १७
भल्यांस मी प्रार्थितसें स्वभावें, मात्सर्य टाकोनि निकें वदावें; ।
नितंब सेवूं धरणीधरांचे? किंवा मदोन्मत्तविलासिनींचे? ॥ १८
चंद्रकांत तिचें वक्त्र, महानील हि केश ते, ।
पद्मरागपदद्वंद्वीं, रत्नरूप विराजते. ॥ १९
थोपत थोपत जाते कोणी रमणी वनद्रुमच्छाये ।
वारी चंद्रकरांतें उचलुनि पदरा जयाचिया (कराचिया?) सोये. ॥ २०
न देखतां दर्शनलोभ दाटे, ते देखिल्या उत्सव केंवि भेटे? ।
आलिंगितां कांम असा उदेजे, देहद्वया भेद कदा न कीजे? ॥ २१

---

१. जखम करितेस. २. धनुष्याचे दोरीनें; (पक्षीं) आपल्या उत्तम गुणांनीं. ३. कांतेचा मुखरूपी चंद्र असल्याशिवाय अंधकार नाहींसा होत नाहीं. अंधकार=मनाची उद्विग्नता. ४. वाटोळे; (पक्षीं) उन्मत्त. ५. तांबडे, लाल; (पक्षीं) क्रोधी. ६. स्वभावतः वक्र; (पक्षीं) दुष्ट. ७. तुझें सौभाग्यवर्णन करणारी मदनाक्षररूपी रोमावली. ८. मध्यभागाचे ठायीं असून; (पक्षीं) तटस्थ, निःपक्षपाती, उदासीन असूनही. ९. प्रकाशमान आहे देह ज्याचा असा चंद्र हेंच जीचें मुख. १०. मोठा; (पक्षीं) गुरु हा ग्रह. ११. शनैश्चर=हळुहळू चालणारें; (पक्षीं) शनि नामक ग्रह. १२. स्त्री ही ग्रहांचें अधिष्ठानच असें वाटतें. १३. हा बावरेपणा. १४. पर्वतांचे. १५. कमलाप्रमाणें लाल आहे पदद्वंद्व (पायाचे तळवे). मुळांत 'हस्तद्वंद्व' आहे. पद्मराग=माणिक हा अर्थ येथें घ्यावा. १६. वनांतील वृक्षांच्या छायेमध्यें. १७. चंद्रकिरणांस. विरहिणी स्त्रीचें वर्णन आहे. १८. ती सुंदर स्त्री. १९. मिठी मारी. २०. इच्छा. शेवटच्या ओळीत ही इच्छा सांगितली आहे. कधीही दोघांमध्यें विरह होऊं नये अशी इच्छा.

बरा चंदनालेप देहासि साजे, शिरीं मालतीपुष्पमाला विराजे, ।
उरीं कामिनी जीस तारुण्य माजे, असें सौख्य ज्या, तेथ त्या स्वर्ग गाजे.॥ २२

पहा संभोगांतीं उपरि सुरतश्रांत ललना,
उरीं लोळे, डोळे उघडि, तशि झांकी सुनयना; ।
असे गंडद्वंद्वीं पुलकित, वरी मुक्तकबरी,
तिची गोडी घेतो कुशल जन चावूनि अधरीं. ॥ २३

हा थोर अक्रम, नव्हे उचित प्रसंग, वृद्धास ही पर विकार करी अनंग! ।
तों भोग जीवनहि जों स्तनपान(त?) नाहीं, केलें न पंकजभवें चतुरें असें ही.॥ २४

विनय प्रेम विराजे, गोडी ज्यांमाजि, काम ही माजे, ।
वनितालाप असे जे, ऐके सुकृती विविक्त पैं सेजे. ॥ २५

करावा वास गंगेच्या सलिलीं पापहारि जें; ।
अथवा तरुणीपीनस्तनाभ्यंतर सेविजे. ॥ २६

हा संसार असार, त्यांत हि गती या दोन अत्युत्तमा,
ब्रह्मानंदसुखेंचि काल हरणें टाकूनि मायाभ्रमा; ।
कांतेचे कुचकुंभ, पुष्ट भग, त्या मांड्या महासुंदरा,
त्यांतें कीं कुरवाळिती रतिभरें, हा काळ गेला बरा. ॥ २७

सुरतरसभरानें नेत्र झांकूनि राहे,
प्रिय रमण तयाशीं जे न बोले, न पाहे; ।
नवघड तरि तोही त्या दशेतेंच पावे,
नवसुरतरसाचे भाव कोणें वदावे? ॥ २८

आरंभींच नको नको सखि वदे, त्यानतरें सोडितां
नीविग्रंथि सलज्ज पैं हळुहळु ते ढोल दे, ओढितां ।
टाकी धैर्य, रत प्रियासह भरें. संभोग तो माजतां
अंगें उद्यम ही करी, सरि नसे ऐशा कुलस्त्रीरता. ॥ २९

---

१. तारुण्य माजे (बहर आहे तारुण्याचा). विषयी लोकांचें हें स्वर्गसुख पहा! २. रोमांचित. मुळांत घाम अशा अर्थाचा शब्द आहे. ३. सुटलेली वेणी आहे जीची. ४. विपरीत, उलटा क्रम. ५. मुळांत 'स्तनपात' आहे. स्तनपात नाहीं तोंपर्यंतच भोग किंवा आयुष्य असावें असें केलें नाहीं. ६. माजतो, जास्त होतो. ७. एकांतांत. स्त्रियांच्या मधुर आलापाचें वर्णन आहे. ८. आभ्यंतर=मधील प्रदेश. ९. दुसऱ्या ओळींत पहिली गति व तिसऱ्या व चवथ्या ओळींत दुसरी गति अशा दोन गति (पुरुषार्थ) सांगितले आहेत. १०. नव+घड.

(वसंतवर्णन.)

राहे तोंवरि कांतेच्या हृदयीं कोप दारुण, ।
संचार न करी जों हा चंदनाद्रिसमीरण[1]. ॥ ३०

परिमलान्वित वायु, नवांकुरीं तरु विराजित फार वनांतरीं, ।
शुक[2]पिकप्रमदाजन माजतो, बहु तयांस वसंत नवाजितो[3]. ॥ ३१

शोभा धरी स्त्रीविरहानलाची जे मंजरी आम्रमहीरुहाची, ।
पिकावली[4] सादर तीस पाहे, श्रीखंडशैलोद्भव[5] वायु वाहे. ॥ ३२

कोकिलध्वनि, सुशीतल वारे, काल उत्तम वसंत पहा रे! ।
कामिनीविरहवेध जयाला, दुःखदायक समस्त तयाला. ॥ ३३

द्वारीं लतामंडप, रम्य नारी, पुष्पें, पिकालाप परोपकारी, ।
गोष्टी कवींशीं, हिमरश्मिसेवा, ज्या सौख्य हें तोच गृही[6] वदावा. ॥ ३४

आम्रद्रुमीं बौर[7] उठे वसंतीं, सौरभ्य[8] संचार करी दिगंतीं, ।
करी द्विरेफावली[9] जैं तैनाना[10], कोणास तैं काम फांशीं[11] कशीना. ॥ ३५

(ग्रीष्मवर्णन.)

सत्पुष्पहार, घनसार विलेप जाणा, मंदानिल व्यंजनजन्य[12], वधू सुजाणा, ।
माडी मनोहर, सुशीतल चंद्रिका हो, घेतो निदाघ[13]समयीं सुकृतीच लाहो[14]. ॥ ३६

उद्दाम हार, घनसार विलेप, चंद्र, माडी, सुमद्य, पवन व्यजनीय सांद्र[15]; ।
कांता, मनोज्ञसख[16] रे (?) वसनें, उन्हाळा, हा सोहळा सुकृतपुंज जया तयाला. ॥ ३७

माडी शुभ्र, सुधांशुपूर्ण, रमणीवक्त्राब्ज, माला फुलें,
श्रीखंडद्रव जो बरा मगमगी[17], हें सर्व जें बोलिलें; ।

---

१. मलयानिल. मलयपर्वतावर चंदनद्रुम आहेत. चंदनाद्रि=मलयपर्वत. २. शुक व पिक यांच्या स्त्रिया. सादी हा योग्य शब्द. ३. नवाजणें=प्रसिद्ध करणें, स्तुति करणें. ४. पिका (शुकस्त्रिया) त्यांची आवली (समुदाय). ५. मलयपर्वतापासून उत्पन्न झालेला. ६. गृहस्थाश्रमी, गृहस्थ. हिमरश्मि=चंद्र. ७. बहर. ८. सुवास. ९. दोन रेफ आहेत ज्यांमध्यें तो भ्रमर. यांत दोन रकार आहेत. त्यांची आवली. १०. गाणें गाते. ११. आपल्या ताब्यामध्यें बांधून टाकीत नाहीं? कसा सर्वांस माहितच आहे. १२. पंख्यानें उत्पन्न झालेला. १३. ग्रीष्मऋतूमध्यें. १४. लाभ. १५. मऊ, मनोहर. १६. हा अपपाठ दिसतो. मुळांत कोमळ व सूक्ष्म वसन आहे. मनोज्ञ म्हणजे सुंदर असें कांतेचें विशेषण होईल पण पुढें 'सखरे' काय? मनोज्ञसख=रमणीय सखा असा अर्थ होईल पण तो इष्ट दिसत नाहीं. १७. हें घमघमीत (सुवासिक) याचें रूप.

येणें क्षोभ घडे तयास हृदयीं जो मन्मथें जिंकिला,
यातें पाहुनि ही कदापि न ढळे जो कां विरागी भेला. ॥ ३८

(वर्षावर्णन.)

बरतें पटल घनाचें, नर्तन करिती महीवरी मोरें, ।
भूतल हिरवें, पंथिकें सोडावी दृष्टि कोठें रे! ॥ ३९

कोणास न करी हर्ष वर्षा हे तरुणीपरी ।
पयोधरें पुष्पगंधें मदना माजवी बरी. ॥ ४०

नवमेघवृंद गगनीं, धरणी हे जलपूरजर्जरित होउनि राहे; ।
शिखिकूजनें मिरवतें वन जेव्हां, नर हृष्ट खिन्न हि, समुत्सुक तेव्हां. ॥ ४१

विद्युल्लता हे, वनकेतकी हे, हे मेघ, हें बर्हिणनृत्य पाहें, ।
चहूंकडे हे सुटली धुंमाळी, वियोगवत् स्त्री सखि कैंवि टाळी? ॥ ४२

न मार्गहि दिसे असें तम तमाम वेष्टी दिशा,
नभीं जलदवृंद; यास्तवहि माजलीसे निशा; ।
अशा समयीं ना कशी झळकतांचि विद्युल्लता,
प्रमोद भयही धरी स्वमानें जारिणी चालतां? ॥ ४३

वर्षतां घन, गृहीं निज नारी पोटिशीं धरुनि [९]घुंगट मारी, ।
दुर्दिन प्रियतमाकुचसंगें होतसे सुदिन हो! रतिभोगें. ॥ ४४

(शरद्वर्णन.)

करुनि निधुवनातें जो निजेला श्रमोनी,
तृषित मग निशीथीं तोय मागे उठोनी; ।
शिशिर जल सखी दे, गात्र [११]संक्रांत जीचें,
अतुल सुख असें हें मंदभाग्यासि कैंचें? ॥ ४५

(हेमंतवर्णन.)

मिष्टान्न, आज्य, दधिदुग्ध, यथेच्छ झोडी, तांबूल, कुंकुमविलेपन, भोगगोडी; ।

---

१. चांगला, पक्का. २. पांथस्थानें, प्रवाशानें पाहावें तरी काय? सर्वच मदनोत्पादी! ३. मेघ; (पक्षीं) स्तन. ४. फुलांच्या वासानें; (पक्षीं) सुगंधिवदनानें. ५. मोरांच्या शब्दांनीं, आरावानें. शिखा=शेंडी असते म्हणून शिखि. यालाच 'बर्ही' म्हणतात. कारण सुंदर शेंपूट असतें. ६. सुखी असो वा दुःखी असो, उत्कंठित होतो. ७. गर्दी. गाण्याची धुमाकूळ. ८. या दोन कारणांस्तव अंधकार द्विगुणित वाढला. ९. हा शब्द मुळांत नाहीं. 'सुदृशाम्' असा शब्द आहे. १०. या ग्राम्य शब्दाचा अर्थ प्रसिद्धच आहे. ११. थकून गेलें आहे.

स्त्री पोटिशीं धरुनियां सखलात ओढी, खोलींत शेज, हिमरात्रि तयासि थोडी. ॥ ४६

(शिशिरवर्णन)

ओष्ठीं करी व्रणहि चुंबुनि गंडदेशीं, निर्मी कसा पुलक पीनकुचद्वयाशीं ।
वस्त्रांतही घुसतसे, जघनासि क्षोंबे, जारापरी शिशिरवायु रते, न थांबे. ॥ ४७

केशां करी व्याकुल, नेत्र झांकवी, बळेंचि वस्त्रें उडवी थरारवी, ।
सीत्कार दंतांसि रची समीर हा, कांतांसवें(परी?) शैशिर पैं रते पहा. ॥ ४८

भल्यांच्या मनोमंदिरामाजि तोंच विवेकप्रदीप[1] स्फुरे स्पष्ट साच, ।
तयातें कटाक्षांचलें जों न वारी कुरंगेक्षणा यौवनोन्मत्त नारी. ॥ ४९

वाचाल रे! पंडित लोक जे जे, वैराग्य त्यांचें वचनींच साजे. ।
जो कामिनीच्या जघना भुलेना, असा असे कोण मला कळेना? ॥ ५०

आहेत शूर मदवारणकुंभभेत्ते[2] या भूतलीं, किति[क] सिंहविनाशकर्ते; ।
सर्वांपुढें करुनि मीच[3] वदें तथापि, शूरांत तो विरल, जो स्मरगर्व दापी. ॥ ५१

मी बोलतों सत्य न पक्षपातें, जें सत्य लोकांत हि मान्य होतें; ।
मनोहर स्त्रीसम आन नाहीं, तत्तुल्य दुःखप्रद ही न कांहीं. ॥ ५२

युक्तिशून्य बहु बोलुनि काय? सौख्यदायक तिजा न उपाय; ।
कामिनीकुचयुगा कवळावें, कीं[5] वनाप्रति उठोनि पळावें. ॥ ५३

अत्युत्कट प्रेमभरें स्त्रिया हो! ज्या ज्या क्रियेचा धरितील लाहो, ।
करूं शके विघ्न न तो विधाता, तेथें दुज्याची मग काय वार्ता? ॥ ५४

मोठा प्रतारक हि पंडितलोक पाहें, निंदी स्त्रियां तदभिलाष मनांत वाहे! ।
नानातपीं घडतसे सुरलोकवास, तेथें परंतु[6] सुखद प्रमदाविलास. ॥ ५५

महत्त्व, पांडित्य, कुलीनता जे, विवेक अत्युत्तम तोंचि साजे, ।
देहीं न जों तो मदनाग्नि पेटे, दे यां समस्तांसहि जो चपेटे. ॥ ५६

भोगांस वैराग्यभरें त्यजोनी, निंदोत 'दोषास्पद' हे म्हणोनी; ।
तरी वदों स्त्रीसम रम्य नाहीं, परोपकाराहुनि पुण्य कांहीं. ॥ ५७

न कोणीच तृष्णासमुद्रांत पावे[7], नृपा! जोडि कां व्यर्थ?[8] तारुण्य धांवे[9]; ।

---

१. विवेक (सारासाररूपी) प्रदीप (मोठा दिवा). २. मत्त झालेल्या हत्तींची गंडस्थलें भेदणारे. ३. अहंपणानें. ४. संसार किंवा वैराग्य यांपैकी एक धरावें, दोन्हीही सौख्यदायक आहेत, असें सांगण्याचा भाव आहे. मुळांत शब्दचमत्कार विशेष आहे. ५. किंवा. ६. 'ही' या अर्थी 'परंतु' आहे. पण तेथें ही. ७. तृष्णेच्या समुद्राचा अंत कोणी पावत नाहीं, तृष्णा संपत नाहीं. ८. व्यर्थ पैसे कशाला मिळवितोस? ९. तारुण्य फुकट पळून जात आहे.

जरेनें न जों जर्जरीभूत केली मृगाक्षी, गृहा जाइजे तोंचि हाली. ॥ ५८

सन्मार्गीं तोंचि राहे प्रभुपण, मिरवी तोंच त्या इंद्रियांचें,
लज्जेतें तोंचि वाहे, विनतपण निकें दावितो तोंचि साचें, ।
भ्रूचापा ओढुनीयां श्रवणपथवरी मारिला नेत्रबाणीं
नाहीं जों कामिनींहीं, पुरुष मिरवितो तोंचि हीं सर्व लेणीं. ॥ ५९

या निर्मिल्याच नसत्या जरि रम्य नारी, सौंदर्य यौवनविभूषण ज्यांस भारी; ।
सेवागुणें सकल टाकुनियां विवेक कां सेविते खलनृपांगण थोर लोक? ॥ ६०

तरे या संसारीं विरल जन आत्मज्ञ, सुकृती,
विवेकी वेदांतश्रवणविनयोपस्कृतमती, ।
स्त्रियेची [3]श्रृंकुंची नरकनगराचींच कुलुपें
बळें उद्घाटी त्या स्थलिं जन भरे टाकुनि तपें. ॥ ६१

स्त्रीजाति [4]मुद्रा मकरध्वजाची, सर्वार्थसिद्धिप्रद जाण साची ।
न मानिती जे स्मर त्यांस दंडी, लावी भिके नग्न जटाळ [5]मुंडी. ॥ ६२

संसारीं मोक्षपदवी [6]दुरी नाहीं वि[7]चक्षणा! ।
मध्यें या दुस्तरा नस्त्या जरि हो! मदिरेक्षणा. ॥ ६३

स्त्री हा महागळ पहा स्मरधीवराचा, विस्तारिला भवसमुद्रजळांत साचा. ।
जे झोंबताति नरमीन तया गळाशीं, काढूनि [8]रागदहनीं शिजवी तयांशीं. ॥ ६४

वाडा स्वच्छ, मनोहर प्रियतमा, छत्रें विराजे रमा,
ऐसें शाश्वत मानुनी अनुभवी, पावे महासंभ्रमा; ।
तें याला न कळे स्वपुण्य सरतां होईल हो! त्यापरी,
[9]दाणादाण सुतंतु मात्र तुटतां मुक्ताफळें ज्यापरी. ॥ ६५

विस्तीर्ण आणि अतिचंचल नेत्र ज्यांचे, कीं पुष्ट यौवनमदें स्तन ही जयांचे, ।
[10]मंदोदर त्रिवलियुक्त अशा स्त्रियांतें पाहोनि, जे न ढळती नर धन्य पैं ते.॥६६

योगाभ्यासें चित्तचैतन्यमैत्री केली ज्यांहीं, जे निजानंददात्री, ।
ज्या ज्या रंगें मूढ ती(?) वश्य केले, [11]बाजीगारी त्यांपुढें हे न चाले. ॥ ६७

विलासिनीची सहज क्रिया जे, मूढाचिया ते हृदयांत साजे! ।

---

१. आर्ता ? २. वेदांताच्या श्रवणानें ज्याची बुद्धि अत्यंत विनयशील झाली आहे. ३. भ्रूरूपी कुंची (आकर्षण यंत्र). ४. शिक्का. Seal. ५. केशांचें मुंडन केलेले. ६. लांब. ७. शहाण्या माणसा! ८. कामरूपी अग्नीमध्यें. ९. त्या सारखी दाणादाण. खालच्या ओळींतील उपमा पहा. १०. कृशोदर. ११. जादुगिरी.

स्वभावयोगें नलिनी विकासे, तेथें फिरे, गुंतुनि भृंग आसे. ॥ ६८

जेथें सिद्धजनीं बन्या दरकुत्र्या सानंद हो! सेविल्या,
खांबा बांधुनि जेथ शंकरवृषें वृक्षत्वचा काढिल्या, ।
जेथें या मदनास्त्र चंचलदृशा नाहींत उच्छृंखला,
ऐसा तो असतां हिमाचल, लवे कां हो! मनस्वी खला? ॥ ६९

'कांते! पंकजलोचने! विपुल हे श्रोणी तुझी नेटकी,
सुभ्रू तूं, जलजानने! तटतटी पीनस्तनीं कंचुकी,' ।
ऐसें आळवुनी प्रियेस भुलतो, संभोगितो, वानितो,
ज्ञाताही अपवित्र नश्वर असें जाणोनि ही मोहतो! ॥ ७०

नसे स्त्रीविना आन पीयूष जाण, नसे कालकूट स्त्रियेवीण आन; ।
सुधा तेचि कांतानुकूल स्वभावें, विषप्राय जे तेचि अन्यत्र धांवे. ॥ ७१

स्मरतां करिते ताप, पाहतांच करी पिसें; ।
स्पर्शतां भुलवी जे ते दयिता बोलिजे कसें? ॥ ७२

जें डोहो संशयाचा, अविनयगृह जे, ग्राम जे साहसाचा,
दोषाचें क्षेत्र जे कां, कपट अणि अविश्वास ठेवा तयांचा, ।
स्वर्गाचें विघ्न, नानानरकमुख, महामोह त्याचीच पेटी;
कोणें स्त्री निर्मिली हे? विष अमृत गमे, पाश हे सर्वसृष्टी. ॥ ७३

चंद्राची उपमिति दीधली मुखाला, कीं फुल्लांबुजतुलना विलोचनाला ।
त्वच्यांस प्रचुर जयांत मांस हाडें, स्त्रीदेहा कनक वदे कवीश वेडे. ॥ ७४

जें पूर्णचंद्रोपम कामिनीचें मुखाब्ज रे! पात्र सुधारसाचें; ।
तारुण्य जातां मग तोंड तेंच विषापरी होइल तूज साच. ॥ ७५

त्रिवली तरंग, मुख तेंच सरोज, अणि चक्रवाकयुग जाण उरोज, ।
वनिता नदी कुटिल हे निजसंगें भवसागरीं बुडविते; सर मागें. ॥ ७६

गातें मनोहर, सुगंध इचे मुखाचा, तो कायसा रस वदों अधरामृताचा? ।
आलिंगितां निरखितां सुख फार वाटे, येणें रिती विषयलंपट मूढ बेटे! ॥ ७७

---

१. लहान दन्या. २. मुळांतील पद्याचा अर्थ निराळा दिसतो. ३. प्रियकरिणी. ४. जो. ५. विकसित झालेलें अंबुज (पाण्यांत उत्पन्न होणारें कमळ) त्याची तुलना (उपमा). ६. वेडे. गाणें, गोडगाणें. मुळापासून हें भाषांतर भिन्न आहे. ७. लाटा. पोटाच्या आवळी ह्या लाटा. ८. उरोज हेंच चक्रवाकपक्ष्याचें जोडपें. ९. बिचारा. बेटणें=ठसा उमटणें यापासून तर 'बेटा' नव्हेना?

स्त्रीदेह वन त्यामाजीं कुच पर्वत, ते स्थलीं ।
न फिरें; रे मना! तेथें स्मरचोर वसे बली. ॥ ७८

शृंगारद्रुम त्यास होय घन, जें क्रीडारसाची नदी,
जें काय प्रिय यौक्तिकवचोमुक्ता तया अंबुधी, ।
कांतानेत्रचकोर त्यास विधु जें, सौभाग्यभांडार जें,
ऐसें यौवन पावल्या न विचले तो धन्य हो! बोलिजे. ॥ ७९

गृह विषयरतीचें, हेतु जें दुर्गतीचें,
घनपटल असे जें ज्ञानताराधिपाचें, ।
मदनसुहृद, बीज भ्रांत्यनर्थादिकांचें,
अघजनक जनीं या यौवनावीण कैंचें? ॥ ८०

जात्यंधाप्रति, दुर्मुखाप्रति, तथा वार्धक्ययुक्ताप्रती,
कीं मूर्खाप्रति, दुष्कुलाप्रति, गलत्कुष्ठें खैतें त्याप्रती, ।
द्रव्याशेस्तव ओपिती निजतनू वेश्या अशा बोंगळा,
त्यांशीं कोण रतेल नश्वरसुखज्ञाता विवेकीं भला? ॥ ८१

जासूद, भाट, भैंट, भांड, विटादिकांनीं केलें असे मुख जिचें जरि पीकदानी; ।
शोभा तिच्या यदपि अद्भुत ओष्ठबिंबीं, कोणी कुलीन नर उत्तम त्यासि चुंबी? ॥ ८२

वेश्या हे मदनज्वाला माजली यौवनेन्धनें, ।
कामातुर सदा तेथें होमिती यौवनें, धनें. ॥ ८३

चिंती एकास, एकातें पाहे, बोले दुज्यासवें, ।
स्त्रियांला प्रिय हो कोण? हें कदापि न जाणवे. ॥ ८४

न मंत्रा आटोपे, किमपि न जया औषध दिसे,
व्रतें, दानें, होमें, उपशम न ज्याचा घटतसे; ।
स्मरापस्माराख्य प्रबलतर हा रोग भुलवी,
पिसें लावी त्यानें नर विकल तो नेत्र फिरवी. ॥ ८५

---

१. यौवन. २. 'कामप्रियबांधवोक्तिकवचोमुक्ता' असा पाठ असेल काय? ३. ज्ञानरूपी चंद्राचें जें आच्छादन करणारें मेघपटल. ४. अघ=पाप. काय यौवनाची निंदा ही? ५. 'खुते' तर नव्हे? कुष्ठापासून त्रास पावणारा असा अर्थ इष्ट आहे. ६. 'अमंगळा'पासून 'ओंगळ', 'बोंगळ', 'बंगाळ' झाले. ७. भिक्षुक. याचेंही नांव यांत यावेना? ८. खुषमस्करे. ९. पिकदाणी ही तंबाकु खाणारांच्या ओळखीचीच आहे! १०. होतो. ११. मदनरूपी अपस्माररोग. १२. ह्या रोगानें पछाडलेला.

तेजस्वी, अतिदीर्घ, वक्र, चपल, श्यामांग, [1]भोगी अही,
[2]कतिचा तरि या समस्तहि गुणी संयुक्त जे सर्वही (?) ।
तो झोंबे जरि सर्प त्याप्रति असे मंत्रौषधादिक्रिया,
कांहीं मंत्र, उपाय, भेषज, नसे [3]स्त्रीदृष्टिदष्टास या. ॥ ८६
विलास ते तांडव रे! फणेचे, कटाक्ष हालाहल ते जयाचे, ।
स्त्रीसर्प तो, टाकुनि त्यास जाई, तद्दष्ट जे त्यांस उपाय नाहीं. ॥ ८७

---

## वैराग्यशतक.

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें, धनाढ्य प्रभू व्यापिलें दुर्मदानें; ।
शिरीं थोरें मूर्खांस अज्ञान ओझें, जिरालें निजांगींच पांडित्य माझें. ॥ १
शिणोनि फिरलों [6]महाविषमदुर्गदेशांतरीं,
[7]तथा [8]प्रभुहि सेविले न फल लाधलें कीं तरी, ।
सशंक तरि जेविलों परगृहीं जसा कावळा,
परंतु न दिसे, मला कठिण [9]आस हे [10]दुर्बळा. ॥ २
कांहीं द्रव्य असेल [11]कीं उकरिली म्यां या श्रमें ही मही;
राजेही बहु सेविलेचि; गिरिचे म्यां जाळिले धातुही; ।
रात्रीं [12]मंत्रजपें श्मशान धरिलें; [13]पाथोधि उल्लंघिला;
झाली प्राप्त [14]कपर्दिका न मज, [15]तों सोडीं दुराशे! मला. ॥ ३
म्यां साहिली खलजनोक्ति कठोर पां ही; पोटांत दुःख, [16]वरिच्यावरि हांसलोंही; ।
कीं प्रार्थिलें [17]स्वजठरार्थ मदांध लोकां; आशे! अशीच मज नाचविसी किती, कां? ४
दिसे ज्या प्राणांची स्थिति [18]जलजपत्रोदक जसें,
तयांसाठीं केलें विविध बहु म्यां पातक असें; ।

---

१. फणा आहे ज्यास असा. २. येथें अपपाठ दिसतो. नेत्र अशा अर्थाचा शब्द पाहिजे आहे. ३. स्त्रीदृष्टिरूपी सर्पानें चावलेल्यास. ४. मोठें. 'ओझें' याकडे संबंध. मूर्ख अज्ञानाच्या ओझ्याखालीं दडपून गेले आहेत. ५. माझें पांडित्य जिरूनच गेलें! कारणें (मत्सर, दुर्मद, अज्ञान) वर दिलींच आहेत. ६. प्रवेश करण्यास कठीण अशा अन्यदेशीं. ७. तसेंच. ८. धनिक. ९. आशा. १०. 'दुर्बळा' हे 'मला'कडे न्यावें. ११. म्हणून. १२. स्मशानांत मंत्रसाधन केलें. १३. समुद्र; द्रव्य मिळेल म्हणून समुद्रांतून व्यापार केला. १४. कवडी. १५. यासाठीं. १६. वरवर; दिसेल असें मात्र. १७. पोटाकरितां. १८. कमलपत्रावरील बिंदूप्रमाणें चंचल ज्यांची स्थिति.

पुढें धनाढ्यांच्या[1] प्रचुरधनलोभास्तव वृथा
विलज्जें[2] त्यां केली बहुतर मृषात्मस्तुतिकथा. ॥ ५

क्षमा केली शाकें, त्यजुनि गृहसौख्यासि फिरलों,
हिमोष्णादि क्लेशां अनुभवुनि अंगें न तपलों[4], ।
विना शंभुध्यानें अनवरत[5] वित्तास जपलों,
मुनीच्या कर्मातें करुनि मुनिभाग्यासि मुकलों[6] ! ॥ ६

न भोगिले भोगहि मीच भोगिलों, न साधिलेंही तप मीच तापलों, ।
न काल गेला तरि मीच चालिलों, न खुंटली आसहि मीच खुंटलों ! ॥ ७

वदना रदनावलिनें[7] त्यजिलें, शिर सर्वहि शुभ्रपणें पिकलें, ।
उठतां बसतां अणु शक्ति नसे, परि आस निरंतर भाजतसे[8]. ॥ ८

मी हा अहंकार संभोग[9] गेला, तुल्यायुषी[10] स्वर्ग समीप केला, ।
काठीविणें ज्या फिरणेंच नाहीं, तथापि धाके[11] मरणास देही[12] ! ॥ ९

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय[13], वीची[14] तृषा,
[15]स्त्रीपुत्राद्यनुराग हीं जलचरें जे पूर्ण कूलंकषा[16], ।
संसारभ्रमभोंवरा गरगरी, चिंताच जीचीं तटें,
तीतें जे तरले मुनीश, न कधीं ते पावती संकटें. ॥ १०

न संसाराची हीं दिसत चरितें जाण कुशलें[17],
विपाकें पुण्याच्या मज विवरितां ज्ञान घडलें; ।
व्ययें पुण्याच्या हे विषय विषयी जे जन तयां
सुखें देती, जाती व्यसन[18] मग देऊनि विलया. ॥ ११

अवश्य जाणारचि भोग शेखीं[19], कां होतसे यास्तव लोक दुःखी ? ।
मुक्त्यर्थ आसक्तपणें श्रमावें, सुखें अनासक्तपणें[20] असावें. ॥ १२

---

१. धनाढ्यांच्या. २. निर्लज्जपणें. ३. खोटी आत्मस्तुति. ४. तपश्चर्या केली. ५. एकसारखा. ६. वांचवलों. मुळांतील श्लोकामध्यें अर्थ विशेष खुलून निघतो. 'क्षमा केली परंतु शाकानें' असें समजलें म्हणजे येथील अर्थही स्पष्ट होईल. ७. दंतपंक्ति. ८. वाढत आहे. ९. भोगेच्छा व अहंकार बरोबरच गेले. १०. बरोबरीचे लोकांनी स्वर्गास जवळ केलें. ११. भितो. १२. प्राणी. १३. जळ. १४. लाटा. १५. स्त्रीपुत्रादिकांविषयीं लोभ. १६. तटांस फोडून जाणारी नदी. मूळ भिन्न आहे. १७. दृढ सुख देणारीं. १८. हे विषय विषयी जनांस व्यसन दुःख देऊन मग विलयास जातात. १९. शेवटीं. २०. फळाची इच्छा न धरितां.

जीं कां पूर्वीं भोगिलीं आणि भोग्यें, ज्ञानी ऐसीं टाकिती सर्व योग्यें; ।
द्रव्याचें तों तोंड[1] कल्पीं दिसेना, वांछा मात्र त्याग आम्हां घडेना. ॥ १३

ध्याती ब्रह्म सदैव धन्य नर ते राहूनियां कंदरीं,
ज्यांचीं बाष्पजलें विहंगम पिती बैसूनि मांडीवरी; ।
एकांतीं स्वमनोरथेंचि रचितां उद्यानवापीगृहें,
स्त्रीसौख्यादिक आमुचें सरतसे हा हंत! आयुष्य हें! ॥ १४

भिक्षाटणें अशन तें क्षण एकवार, शय्या महीवरि, जयास न रांड पोर, ।
कंथा जया वसन कीं शतखंड तेही, टाकीच ना तदपि तो विषयास देही! १५

सोन्याचे कुंभ हे कीं म्हणउनि वदती गोठलें[2](गांठलें) मांस त्याला,
थुंका शेंबूड यांचें सदन वदन त्या चंद्र दृष्टांत केला, ।
दुर्गंधिस्थान सूत्रस्थळ जघन तया तुल्य सोंडेस[3] बोले,
वर्णी या निंद्यरूपा कविवर[4] न कळे यास ही काय झालें? ॥ १६

भोगी विरागी जन जे तयांचा धनी गमे शंकर एक साचा; ।
देहार्थ ही दे तिजवीण थोर, त्यागी न भोगी जन हा पुरार. ॥ १७

न जाणतां टोळ पडे हुताशीं,[5] नेणोनियां मीन[6] गिळी गळासी, ।
अभिज्ञ आम्ही विषयासि जेव्हां सांडूंच ना! मोह बलिष्ठ तेव्हां. ॥ १८

तृषा बाधतां स्वीकरी तोय पानें, क्षुधासंभवीं भक्षितो षड्रसान्नें ।
अनंगानलें तप्त कांतेसि भोगी, भ्रमें औषधी मानितो सौख्य रोगी. ॥ १९

मोठें मंदिर, पुत्र पंडित बरे, संपत्तिही फारसी,
भार्या हे गुणशालिनी, वय नवें, मूढासि माया अशी; ।
मानी शाश्वत विश्व हें, पडतसे संसारकारागृहीं,
ज्ञानी[7] नश्वर दृश्य मानुनि मनीं संन्यास घे सत्वरीं. ॥ २०

पोरें सदैव रडती, क्षुधितें कृशांगें स्त्री वस्त्र जर्जरित नेसुनि दीन वागे, ।
पाहोनि दुःख घरिंचें, जठरार्थ कैसें देहीति[8] गद्गदरवें[9] वदिजे प्रयासें? ॥ २१

---

१. मुख. द्रव्यदर्शन होईना. २. स्तनाच्या मांसग्रंथीस सुवर्णाचे कळशाची उपमा देतात. ३. हत्तीच्या सोंडेस. ४. उत्तम कविही या अशा निंद्यरूपास असल्या उपमा देतो. ५. अग्नीत. ६. मासा. ७. ज्ञानी हा सर्वदृश्य वस्तु नश्वर आहेत असें जाणून संसारांत पडत नाहीं तर संन्यास घेतो म्ह० त्यांचा त्याग करतो. ८. 'पोटास दे' असे शब्द कष्टानें बोलावे लागतात. ९. दुःखानें कंठ भरून.

अभिमतजनमानग्रंथिकेतें हरीतें,
गुण कमल तयाला कौमुदीप्राय होतें; ।
अतिविपुल सुलज्जा वल्लिकेची कुठारी,
जैठरपिठरिका हे दुर्दशेतें न भारी. ॥ २२

जेथें श्रोत्रियें पुण्यशील वसती सद्विप्र गंगातटीं,
त्या ग्रामीं अथवा वनीं निजसुखें राहोनि निःसंकटीं, ।
हातीं खर्पर घेउनी मधुकरी मागोनि जो भक्षितो,
लोकीं तोच सुखी, तदानन जळो जो दीनता भोगितो. ॥ २३

गंगेनें स्वतरंगसुंदरकणीं जीं भोंवतीं शिंपिलीं,
जीं का चारुशिलातलीं वसुनियां विद्याधरीं सेविलीं, ।
स्थानें काय हिमाद्रिचीं क्षयदशा तीं सर्वही पावलीं ?
कीं पोटें अपमानपूर्वक नरीं अन्यालयीं पोशिलीं ? ॥ २४

ते [6]कंद काय अवघेचि गळोनि गेले ? किंवा प्रवाह नदिचे अति शुष्क झाले ? ।
कीं वैणि आजि विपिनीं तरुवल्कलांची ? कां पाहताति वदनें न कळे खळांचीं ? ॥

नेसूं तृणें कंदफळेंचि खाऊं, शय्यामही, चाल वनासि जाऊं; ।
तेथें पहा क्षुद्र धनेश्वरांची, वार्ता न कानीं पडणार साची. ॥ २६

फळें श्रमावांचुनि भूरुहांचीं, पदोपदीं शीत जलें नदीचीं, ।
असोनियां कोमलपत्रशय्या, द्वारीं प्रभूच्या श्रमताति वांया. ॥ २७

होती वासर[11] दीर्घ जे धनपतिद्वारीं तयां प्रार्थितां,
नाना सौख्यभरें क्षणोपम मला जे लोटले नेणतां, ।
निःसंगत्वपणें धरूनि बसलों हे पर्वताची गुहा,
आतां त्यौ दिवसांसि हांसत असें ध्यानावसानीं पहा. ॥ २८

दैन्याला घसरी, सुखास पसरी, भ्रांतीस जे संहरी,
मात्सर्यास करी पराङ्मुख, बरी दे लात चिंता[13]शिरीं, ।

---

१. कुलीन पुरुषाच्या मानभंग करणारी. २. कुऱ्हाड. ३. उदर हाच खळगा. ४. वेदवेत्ते ब्राह्मण. ५. खापर; मातीचें भांडें. ६. रानांत कंदमूळें मिळत नाहींत काय ? ७. तोटा. ८. मग चरितार्थासाठीं लोक खळांच्या तोंडाकडे कां पाहतात न कळे. ९. वल्कलें. १०. झाडांचीं. ११. जे दिवस धनवानांची हांजी हांजी करितांना कंटाळवाण्यासारखे अतिदीर्घ झाले. १२. धनपतींपुढें आर्जव करीत होतों ते दिवस. १३. चिंतेच्या डोक्यावर लात (लाथ) देते.

झोळी शीघ्र भरी, सुपावन करी, तोषास दे अंतरीं,
शंभूची निज सोइरी [1]मधुकरी ते सेव्य योगीश्वरीं. ॥ २९

मृत्यूनें [2]जननास, वार्धकपणें कीं यौवना रोखिलें,
लोभें आक्रमिली स्वतुष्टि, [3]वनितामोहें क्षमा व्यापिलें, ।
मात्सर्यें सुगुणा, वना [4]फणिकुलें, पृथ्वीपतीला खळें,
[5]अस्थैर्यें विभवास, सांग कवणें कोणास न ग्रासिलें? ॥ ३०

आरोग्यातें ग्रासिलें सर्व रोगें, लक्ष्मीतें ते धांवती क्लेश वेगें, ।
[6]होतां प्राणी पाठिशीं मृत्यु लागे, देवें केलें कोणतें स्वस्थ सांगें? ॥ ३१

[7]सौदामिनीस्फुरणचंचल भोग सारे, आयुष्य [8]वायुविहताभ्रजलापरी रे! ।
ऐशी जनस्थिति मनीं समजूनि वेगीं हे बुद्धि निश्चल करीं शुभ योगमार्गीं. ॥ ३२

हें आयुष्य [9]तरंगतुल्य, [10]युवता कीं दों दिसांची असे,
हे तों अर्थ अनर्थ, वीज चमके जे भोग तेही तसे, ।
कांतेचें [11]परिरंभण स्थिर नसे, टाका क्षणीं हें [12]पिसें,
ब्रह्मीं चित्त धरा, भवांबुधि तरा, हें आयका [13]सौरसें. ॥ ३३

कष्टें विष्ठेंत पोटीं करुनि वसतसे सर्वही आंग [14]गोळी,
तारुण्यीं हेचि चिंता [15]अनवरत मरे कीं दुरावे न [16]बाला, ।
काठी घेऊनि जातां [17]चरमवयपणीं हांसती [18]नीरजाक्षी,
संसारीं रे! सुखाचा लव मज न दिसे, तूंच चित्तीं [19]निरीक्षीं. ॥ ३४

व्याघ्रीपरी भय करीत उभी [20]जरा रे! देहासि रोग करिती रिपुतुल्य सारे, ।
आयुष्य [21]भिन्नघटनीर, सरे तसें हें, पापें तथापि जन आचरताति पाहें. ॥ ३५

हे नानाविध भोग भंगुर वृथा तन्मूल संसार रे!
कां मूढा! भ्रमसी तदर्थ सहसा? हें सर्व आतां पुरे. ।

---

१. भिक्षा. २. जन्माच्या पाठीस मृत्यु लागलाच आहे. 'रोंखगें' हा शब्द समर्पक आहे. ३. स्त्रीमोह. ४. सर्पांनीं. ५. अस्थिरता; अशाश्वतता. ६. प्राणी जन्म पावल्याबरोबर. ७. विजेच्या चमकण्याप्रमाणें अस्थिर. ८. वाऱ्यानें उडविलेल्या मेघजलाप्रमाणें. ९. लाटांप्रमाणें चंचल. १०. यौवन. ११. आलिंगन. १२. वेड. १३. सौरस्यानें, चांगल्या बुद्धीनें. १४. सर्व अंग गोळा करून—असा अन्वय. १५. सदोदित. १६. स्त्री. १७. म्हातारपणीं. पंडितांनीं या शब्दास थेट मराठी पोषाख दिला आहे. १८. कमळाप्रमाणें नेत्र ज्यांचे अशा तरुण स्त्रिया. १९. नीट पहा. २०. म्हातारपण. २१. फुटलेल्या घड्यांतील पाण्यासारखें.

आशापाशशतासि टाकि परतें कामासही, हो मला,
हा असमद्वचनार्थ रे! जरि तुला आहे खरा मानला. ॥ ३६
ब्रह्मादि सौख्यें तृणरूप भासती, हे अन्य राज्यादिक भोग ते किती? ।
कोणी महाभोग असा असे, रतें तेथेंच तूं टाकुनि हें अशाश्वतें. ॥ ३७
गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा,
गेली ते नगरी, तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा, ।
गेला तो नृपपुत्र, त्या शुभकथा, म्यां देखिले सर्व जे,
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें, कालासि त्या वंदिजे. ॥ ३८
जेथें ऐक अनेक तेथ मिळती स्वान्या, तयांच्या तुटी
होतां एक उरे, सर्वेचि मरती तेंही तुरे शेवटीं, ।
फांसे रात्रिदिनाख्य झेलित पहा तो काळ खेळे असें,
प्राण्यांचीच करूनियां भवगृहीं ते सोंकटीं चौरसें. ॥ ३९
गतीनें सूर्याच्या पळपळपणें माप भरतें,
नसे व्यासंगानें दिवसरजनीज्ञान पुरतें; ।
जगीं पाहे दुःखें विविध, नुपजे त्रासहि जरा,
कशी या लोकाला बहुत चढली मोहमदिरा? ॥ ४०
येतो वासर तोच, तेज रजनी, व्यापार नानापरी
प्राणी हे करिताति, आयु सरतें हें नेणवे अंतरीं. ।
तुच्छें चर्वितचर्वणोपम सुखें जीं, तींच तीं भोगितां,
संसारीं विकृतिप्रसंग नुपजे, हे कोण निर्लज्जता? ॥ ४१
संसाराब्धि तरावया हरपदा चित्तीं न म्यां चिंतिलें,
स्वर्गद्वारकपाटभेदक न तें सत्कर्म संपादिलें, ।

---

१. आशेचे जे शंभर पाश त्यांना. २. तप्तसुवर्णाप्रमाणें ज्यांची कांति अशा शशिमुखी ललना. ३. ज्यानें स्मरणशेष केले. मारून टाकून स्मरणाचा मात्र विषय करून ठेविले. ४. ज्या घरांत एक मनुष्य होता तेथें अनेक झाले. ५. तोडातोड. ६. दिवस व रात्र हे दोन फांसे घेऊन व प्राणी ह्याच सोंकट्या संसाराच्या पटांतील घरांत लावून काळ खेळत बसतो. ७. रात्र किंवा दिवस हें ज्ञान कामधंद्यामुळें नाहीसें होतें. ८. तींच तींच सुखें पुनःपुनः भोगिलीं असतीं. ९. वीट, कंटाळा. 'न तिरस्कृति उपजते' असाही पाठ आहे. १०. जेणेंकरून मला स्वर्गाचें द्वार खुलें होईल असें सत्कर्म.

स्वप्नीं ही [1]कुचभारभंगुरकटी नालिंगिली सुंदरी,
झालों कीं निजमातृयौवनवनच्छेदीं [2]कुठारापरी. ॥ ४२
विद्या जे [3]मतवादिवृंददमनी तेही न संपादिली,
स्वर्गातें [4]गजकुंभ भेदुनि न कीं सत्कीर्तिही धाडिली, ।
कांताकोमलपल्लवाधर न तो चंद्रोदयीं सेविला,
गेलें हें वय, दीप निष्फल जसा शून्यालयीं लाविला. ॥ ४३
नाहीं वित्त उपार्जिलें, प्रखरशी विद्या न संपादिली,
अंबातातपदद्वयें दृढमनें तींही न म्यां सेविलीं, ।
स्वप्नींही मृगलोचना, शशिमुखी, नालिंगिली सुंदरी,
नेला काळ [5]पैराम्नलोलुपपणें म्यां वायसाचे परी. ॥ ४४
झालों जयांपासुनि ते [6]निमाले, ते आमुचे [8]तुल्यवयस्क गेले, ।
आम्ही असों सांप्रत जाण तैसे, नदीतटीं [9]जेर्जर वृक्ष जैसे ! ॥ ४५
आयुष्य वर्षशत त्यांत निमें [10]निजेलें; त्याही निमेंतहि निमे दिन [11]बाँद जाले; ।
वार्धक्य, शैशवपणें; उरलें वियोगें, [12]दुःखोमयेंचि, सरलें; सुख काय सांगें ? ॥ ४६
एकदां तरुण, बाल एकदां, भाग्यवंतहि अभाग्य एकदां, ।
एकदा [13]जरठ जाय सत्वरी, [14]धर्मराजसदना नटापरी. ॥ ४७
तूं राजा जरि, मी श्रुतिस्मृतिमहाविद्याभिमानी असें,
भाग्यें [15]विश्रुत तूं, मदीय कवितासत्कीर्ति लोकीं वसे, ।
आहे अंतर फार तूज मज रे ! तूं गर्व जैं दाविशी,
मीही निस्पृह, भाग्यवंतगणना नाहीं मला फारशी. ॥ ४८
[16]अशन तृण पशूला, भक्ष्य वायू फणीला,
अतिसुलभ विधीनें जीवनोपाय केला; ।
[17]ईहपरगतिवेत्ते त्यांस हे [18]वृत्ति केली !
उदरभरणदुःखें [19]सर्वविद्या बुडाली. ॥ ४९

---

१. कुचभारानें वांकली आहे कटि जीची. २. कुऱ्हाड. ३. मतवादी लोकांस जिंकील अशी. ४. युद्धांत हत्तीची गंडस्थळें भेदून. ५. दुसऱ्याच्या येथील अन्नाच्या आशेनें. ६. मातापितर. ७. मेले. ८. बरोबरीच्या वयाचे सोबती. ९. जुनाट, नीरस. १०. झोपेंत गेलें. ११. बजा. १२. दुःख आणि रोग यांणीं. १३. म्हातारा. १४. यमराजाच्या घरीं. १५. प्रसिद्ध. १६. भक्ष्य. १७. इहलोक व परलोक साधण्याची ज्यांना बुद्धि आहे अशांस. १८. खालीं सांगितलेला जीवनोपाय. १९. सर्व कौशल्य सरलें.

गगनीं रजनीस शशी विलसे, दिवसा रवि त्या स्थलिं नांदतसे, ।
उदयास्त अशांस न हे चुकती, स्थिर मानितसे जन हा कुमती ! ॥ ९०

काणें, रोड, वि[1]पुच्छकर्ण, दुबळें, पोटाविणें लंगडें,
अंगीं वायं, तयांत पू अणि किडे, हेंही असो, थेरडें ! ।
ऐसें श्वान चढे [2]शुनीवरि ! गळा ज्या [3]कांठमोरा असे,
मेल्यातें [4]स्मर मारितो रगडुनी, बेश्यास लज्जा नसे. ॥ ९१

असतां वनीं शुभ फळें अशनाला, जल शीत निर्मळ [5]तृषोपशमाला, ।
तरुवल्कलें असुनियां वसनाला, वद कोण सोशिल [6]मदांधमदाला ? ॥ ९२

विपुल हृदय ज्यांचें निर्मिलें विश्व [7]तीहीं,
निजशिरिं हि [8]धराहीं वाहिलें सर्व पाहीं, ।
तृणसम दिधलें हें विश्व जिंतूनि [9]ऐकीं,
कितिक असति भोक्ते ! गर्व कां क्षुद्रलोकीं ? ॥ ९३

गेले जिला भोगुनि भूप सारे, त्या भूमिलाभें[10] तुज गर्व कां ? रे ! ।
हेंही असो, एक धरूनि खेडें, कां मातले हे बहुसाल वेडे ? ॥ ९४

गोळा[11] असे जो अणु मृत्तिकेचा, जयास वेढा पडला [12]जळाचा, ।
[13]भांडुनियां भोगिति जे तयांतें, धिक्[14] त्यांस कीं मागति जे अशांतें ! ॥ ९५

आम्ही नसों गायक, भाट, भांड, किंवा नसों दुर्जनही प्रचंड, ।
आम्ही नसों कीं प्रमदा बरी तों, भेटाविया कोण नृपास होतों ? ॥ ९६

झाला असाही सुकृती, जयाचें कपाल तें भूषण शंकराचें. ।
लोकीं मला कीं प्रणिपात केला, म्हणूनि कां गर्व नराधमाला ? ॥ ९७

खाऊनि राहूं सुखरूप भिक्षा, करूं दिशींवस्त्र, पहा परीक्षा; ।
निजूं सुखें भूमितळींच सेजे, भूपाल म्यां सेवुनि काय कीजे ? ॥ ९८

---

१. शेपूट व कान तुटला आहे ज्याचा. २. कुत्री. ३. ज्याच्या गळ्यांत खापर अडकलें आहे. ४. Slaying the slain हें इंग्लिशमधील वाक्यखंड व मूळ एकमेकांची भाषांतरेंच आहेत की काय असा भास होतो. ५. तहान भागविण्यास. ६. गर्विष्ठ धनिकांच्या मदाला. ७. ब्रह्मदेवासारख्यांनी. ८. शेषासारख्या दुसऱ्यांनीं. ९. बळीराजासारख्यांनीं. १०. हे एका खेड्याचे जहागीरदार. ११. पृथ्वी म्हणजे विश्वाच्या मानानें एक मातीचा लहानसा गोळा. १२. समुद्राचा. १३. लढाई करून. १४. अशा क्षुद्र राजापासीं जे याचना करितात त्यांस धिक्कार असो. १५. सारांश असल्या लोकांचेंच राजद्वारीं तेज; आम्ही केवळ कःपदार्थ ! १६. आम्ही राहूं.

धनपति जरि तूं रे! मी असें शास्त्रवेत्ता,
भट समरिं जरी तूं, मी महावादि जेता, ।
अनुचर जरि तूतें, सेविती छात्र मातें,
न गणसि मज, जातों तुच्छ मानूनि तूतें. ॥ ५९

जधीं कांहीं कांहीं 'हरि, कवि' असे शब्द शिकलों,
तधीं मी सर्वज्ञ द्विपसममदें यास भरलों; ।
जधीं 'कांहीं नेणें' म्हणुनि वदले पंडित मला,
तदा माझा गर्वज्वर सकलही हा उतरला. ॥ ६०

गेला मान, जनांत भाग्य सरलें, भृत्यादिकीं सोडिलें,
झाले याचकही पराङ्मुख घरीं, तारुण्यही लोटलें, ।
सुज्ञांहीं मग युक्त हेंचि करणें, कीं जन्हुकन्यातटीं
सेवावा बरवा निकुंज गिरिचा किंवा गुहा गोमटी. ॥ ६१

संतुष्ट लोकांस करावयासी, कां रे! मना तूं तरि खिन्न होसी? ।
प्रसन्न चिंतामणि तूंचि जेव्हां होसी, तुला वाण नसेचि तेव्हां. ॥ ६२

भेटावें तरि हा नसे समय हो, अंतःपुरीं तो वसे,
आहे निद्रित, अश्व पाहत असे, स्वारीस गेला असे, ।
आतां क्रुद्ध म्हणूनि भृत्य वदती, टाकीं तयां दुर्जनां,
मुक्तद्वार महेशमंदिर, सुखें जाऊनि सेवीं मना! ॥ ६३

नदीतटाकीं तप आचरावें, कीं सद्वधूभोगभरीं भरावें, ।
कीं शास्त्रकाव्यामृतसार पीजे, आयुष्य थोडें, बहु काय कीजे? ॥ ६४

सर्प, हार; रिपु, बंधुसोइरे; पुष्प, तूल; अणि मृत्तिका, हिरे; ।
साम्यदृष्टि मज हो; पडो तनू, चिंतितां 'शिवशिवेति' हा मनू. ॥ ६५

हिमाचलशिलेवरी सुरनदीतटीं बैसुनी,
त्यजूनि जगसंगती सुदृढबंध पद्मासनीं ।

---

१. योद्धा. २. मोठ्या वादास जिंकणारा. ३. शिष्य. ४. 'हरि, कवि' इत्यादि रूपावळींतील कांहीं शब्द. ५. मी विद्वान् म्हणून हत्तीसारखा मदांध झालों. ६. योग्य. ७. भागीरथीच्या कांठीं. ८. गुंफा. ९. सुंदर. १०. सारांश मन संतुष्ट आहे तर त्याला कशाचा तोटा? ११. शंकराचें मंदिरांत त्या दुर्जन प्रभूंच्या घराप्रमाणें जाण्यास प्रतिबंध कधींच नाहीं. १२. कोणती तरी एक गोष्ट पूर्णपणानें करावी असें सांगण्याचा उद्देश आहे. १३. कापूस. १४. ही इच्छा? १५. एक प्रकारचें आसन आहे.

सुखें करुनि डोलतां प्रचुर योगनिद्राभरें,
कधीं अवचिती मला हरिणपोत शृंगांकुरें ? ॥ ६६

जे [3]चंद्रिकेनें अतिशुभ्र हो तें, भागीरथीचें तट रम्य, तेथें ।
सानंद बैसोनि कधीं शिवातें स्मरेन संसारभयार्तचित्तें ? ॥ ६७

स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं, तेथूनिया भूधरीं,
ग्रीवाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरीं; ।
गेली तेथुनी अर्णवाप्रति मदें, ते वंद्यही कष्टली;
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली. ॥ ६८

या संसारीं फिरत फिरतां फार म्यां शोध केला,
ऐसा नाहीं पुरुष विषय श्रोत्रनेत्रांस झाला; ।
जो कां ज्ञाता, विषयकरिणी भोगितां, घे मदाला,
जेणें अंतःकरणगज तो संयमें [11]रुद्ध केला. ॥ ६९

सर्वस्वदान सुखरूप करुनि हातें, 'हें सौख्य नश्वर' असें समजोनि चित्तें, ।
जे चंद्रिकाधवल, पुण्य, अरण्य ऐसें; तेथें बसोनि 'शिव' चिंतिन कैं विलासें ?॥ ७०

लक्ष्मीनें जरि तुष्ट तूं, बहुसुखी मी वल्कलानें असें;
दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे. ।
आशा ज्यास, दरिद्र तोचि समजे; नैराश्य पैं बाणतां,
भाग्याचा नर कोणता मग बरें ? निर्भाग्य तो कोणता ? ॥ ७१

स्वेच्छाविहार, सहवास महाभल्यांचा, मिष्टान्न[12]भुक्ति अणि निग्रहही मनाचा, ।
लोकोपकारक [13]धुरंधरभाव साचा, हा घो(थो ?)र जाण [14]परिपाक महा तपाचा. ॥ ७२

ज्यांचें पात्र पवित्र [15]पाणियुग हें, भिक्षान्न जे भक्षिती,
ज्यांचें वस्त्र दिशा, जयां [16]मळ नसे, शय्या जयांची क्षिती, ।
ज्यांला दैन्य नसे, विरक्ति वनिता, जे तीसवें नांदती,
ज्यांला [17]कर्मकलाप बाधित नसे, ते धन्य येणें रितीं. ॥ ७३

---

१. हरिणाचीं बाळकें. २. शिंगाच्या टोकांनीं. येथें सहजावस्था पूर्ण झाली. ३. चांदण्यानें. ४. शंकरमस्तकावर. ५. पर्वतावर. ६. ग्रावा (पर्वताच्या) अग्रावरून (शिखरावरून). ७. भागीरथी. ८. समुद्रास. ९. पाहिला नाहीं किंवा ऐकला नाहीं. १०. विषयरूप हत्तीण. ११. बांधला. १२. भोजन. १३. लोकोपकार करण्याविषयीं दृढनिश्चय. १४. फळ. १५. हाताची ओंजुळी हें पाणी पिण्याचें पात्र. १६. पातक. १७. कर्मसमुदाय; अनेक कर्मांचें बंधन.

कोण सेवन करील तयांचें, अश्वतुल्य चळ चित्त जयाचें; ।
देह तो न अजरामर पाहीं, सौख्य वास्तव तपाविण नाहीं. ॥ ७४

'चांडाल कीं? ब्राह्मण, शूद्र, कीं हा? योगीश कीं?' यापरि लोक पाहा ।
वदे, जया हर्षविषाद नाहीं, निःसंग तो धन्य जगांत देही. ॥ ७५

श्रम पावसी विषयरानभरीनें,[2] शुभ मार्ग, दुःखहर, सेवि सुखानें; ।
धरिं शांततेस, चपलत्व न घेईं; न पुनर्भवाप्रति[3] मना! मन देईं. ॥ ७६

त्यांतें तूं भज रे! महापुरुष जे मोहासि संहारिती,
निष्ठा सांबशिवीं धरीं, सुरनदीतीरीं वसें संप्रति; ।
लक्ष्मी सर्व तरंग, बुद्बुद, नदी, सौदामिनी, कामिनी,
हे 'माझी' 'स्थिर राहती;' म्हणुनियां मानूं नये कीं मनीं. ॥ ७७

पुढें गायनें, सत्कवी पार्श्वभागीं, स्त्रिया ढाळिती चामरें सुंदरांगी, ।
असें जैं घडे, तैं वसें तूं भवीं या, सख्या! अन्यथा सोडि संसारमाया.॥७८

क्षणभंगुर संग टाकि कामिनीचा, करिं मैत्री सहवास सज्जनांचा; ।
जघन, स्तनभार, मांज, सुंदरीचा स्मरतां, वास चुके न दुर्गतीचा. ॥ ७९

हिंसात्याग, अलोभता, परधनीं, सत्यत्व संभाषणीं;
तृष्णाच्छेद, परांगनाविमुखता, भूतानुकंपा मनीं, ।
दान, प्रश्रय, भाव सद्गुरुकुलीं, सन्मार्ग सर्वांस हा
संसाराब्धि तरावया स्मृतिशतीं कीं बोलिजेला पहा. ॥ ८०

पद्मे! विलासपुरुषीं सुखरूप राहीं, मी त्यक्तभोग न तुझी मज चाड कांहीं; ।
भक्षूनि भैक्ष्य शुभसक्तु पलाशपात्रीं[11] मी वर्ततों, मज नसे रुचि भोगमात्रीं.॥८१

वनितासुख, मंदिर, गान बरें, धद हें न रुचे कवणास खरें? ।
वसती विपिनींच परंतु मुनी, क्षणभंगुर हें समजोनि मनीं. ॥ ८२

कल्पांताग्निबळें सुमेरु गिरि जो होतो तसाही चुना,
होती सागर शुष्क ते जळचरें ज्याची न संभावना, ।
पृथ्वी जे धरिली महागिरिवरीं तेही बुडे अंतरीं,
वार्ता काय कलेवरीं[12]? चपल जें मत्तेभकर्णापरी[13]. ॥ ८३

---

१. चंचल. २. विषयाटवींत शिरल्यानें. ३. पुनः जन्म घेण्याबद्दल. ४. शंकर आणि अंबा म्ह० पार्वती यांचे ठिकाणीं. ५. बुडबुडे. ६. वीज. लक्ष्मीवर हे सर्व आरोप आहेत. ७. कंवर. ८. विनय. ९. अनेक स्मृतींत; अनेक शास्त्रांत. १०. सातू. ११. पळसाच्या पत्रावळीवर. १२. मग शरीराची काय कथा? १३. मत्त हत्तींच्या कर्णाप्रमाणें चंचळ असें हें कलेवर.

एकलाच करपात्र वागवा, शांत निस्पृह असा कधीं शिवा! ।
सांग होइन खरा जसा पिसा, दक्ष कर्मदहनीं हुताशसा. ॥ ८४
प्राप्त सर्व विभवें तरि काय? तोषिले स्वजनही तरि काय? ।
कल्प आयुहि घडे तरि काय? भोगिलें सुख बहू तरि काय? ॥ ८५

महादेवीं निष्ठा, जननमरणाचें भय सदा
नसे; बंधुस्नेह, स्मरकृतविकारादि न कदा. ।
वनीं राहे संगा त्यजुनि, धन वैराग्य पदरीं,
न भाग्यावी ऐसी मज दिसतसे अद्भुत परी. ॥ ८६

तें ब्रह्म, यास्तव अनश्वरपूर्ण बापा! सेवीं; उगाचि करशील कुतर्क कां पा? ।
तत्सौख्यलेशलवगर्भित भोग पां हे, ज्यांकारणें विषयलोलुप गुंतले हे. ॥ ८७
आकाश, पाताल, दिशा समस्ता कां हिंडसी व्याप धरूनि नस्ता? ।
चिंतीं परब्रह्म, मना न धांवें, जेणें तुला तुष्ट यथेष्ट फावे. ॥ ८८
शय्या मही, भुज उशी, नभ चांदवा रे! शीतांशु दीप, विंजणे अनुकूल वारे, ।
शांत्यंगनेस शयनीं सुखरूप भोगीं, राजापरी निजतसे यति तो विरागी. ॥ ८९
पुरे पुराणें स्मृतिवेदशास्त्रें, आमुष्मिकें वैदिक कर्मतंत्रें; ।
जेणें सरे हा भव, तें विचारीं; यावेगळी सर्व दुकानदारी. ॥ ९०
ब्रह्मांड तों केवळ तुच्छ पाहें, ज्ञानी तया काय करूं शके हें? ।
हाले जळीं फारहि मीनराणा, [11]कीं धाकला अब्धि? मनास आणा. ॥ ९१
जैं व्यापिली कामतमें स्वदृष्टी, तैं देखिली स्त्रीमय सर्व सृष्टी; ।
आतां [12]विवेकांजन अंजितां, हें सर्वत्र मी [13]चिन्मय रूप पाहें. ॥ ९२

चंद्राची द्युति रम्य, जे तृणवती ते रम्य कीं भूमिका,
साधूंचा सहवास रम्य, कविच्या उक्ती मनोवेधका, ।
कांतेचें मुख रम्य जें गर्वशिलें कोपाश्रुबिंदूत्करें;
तेव्हां रम्य वसेचि कीं किमपि रे! हें चित्त जेव्हां मुरे. ॥ ९३

स्वेच्छाविहार, गतसंग, महातपस्वी, भिक्षान्नभक्षक, विरक्त असा, मनस्वी; ।
कंथैक वस्त्र, निरहंकृति, जो सुखी तो टाकूनि भोग शमसौख्य मनीं वरीतो. ९४

---

१. अग्नीसारखा. २. वैराग्य हीच लक्ष्मी. ३. त्या ब्रह्मापासून होणाऱ्या सौख्याचा लव-लेशच नुसता आहे ज्यांत असे भोग हे आहेत. ४. नाहीं तसला व्याप. ५. संतोष? ६. चंद्र हाच दीप. ७. पंखा. ८. शांतिरूप पत्नी. ९. इहलोकचीं. १०. मासा. ११. म्हणून. १२. विवेकरूप अंजन डोळ्यांत घातल्यावरोबर. १३. ब्रह्म भरलेलें. १४. व्याप्त झालें. उत्कर=समुदाय.

माते मेदिनि! मारुता स्वजनका! तेजा सख्या सोदरा!
तोया! आणि नभा! तुम्हां नमितसें जोडूनि माथें करां; ।
जालें ज्ञान भवत्कृपेस्तव मला, आतां पहा सत्वरी,
ब्रह्मीं मी मिळतों, जशीं समरसें बेणोपलांचे परी. ॥ ९५
जों हे स्वस्थ तनू, जरा वसतसे जों दूर, जों इंद्रियें
शैक्तें, कीं सरलें न आयु पुरतें जों, पंडितानें स्वयें ।
आत्मप्राप्तिसुखार्थ यत्न करणें कीं तोंच हो फारसा,
होतां मंदिर दीप्त कूपखननीं उद्योग तो कायसा? ॥ ९६
जाले जीर्ण मनीं मनोरथ, पहा मी वंचलों यौवना,
होते जे गुण सर्वही विफल ते जाले गुणज्ञाविना, ।
युक्तायुक्त विचार काल न करी निःशंक सर्वात्मना,
आतां हें सुचलें दुजी गति नसे गौरीशपायांविना. ॥ ९७

---

## ४. गंगालहरी.

अशेषां भूतींचें विपुलतर सौभाग्य मिरवी,
जगातें लीलेनें करि शिव तया भूतिपद वी, ।

---

१. हे पित्या वायो. २. तारा. ३. जोंपर्यंत इंद्रियें सशक्त आहेत. ४. आग लागल्यावर विहीर खणूं लागलें तर काय उपयोग. ५. सर्वथा. ६. शंकराचे चरणांवांचून. ७. 'गंगालहरी' हें मूळचें संस्कृत काव्य प्रसिद्ध कवि जगन्नाथराय यांनी केलें आहे. काव्यदृष्टीनें हें अति उत्तम असून या काव्यांत भक्तिरस प्रधान आहे. काव्य करण्यास जगन्नाथरायपंडितांस स्फूर्ति झाली तो प्रसंगही अद्भुत (Romantic) असून हाच प्रसंग पंडितांच्या भक्तिभावाचें रससर्वस्व प्रगट होण्यास कारणीभूत झाला आहे. वृत्तही बहारीचें असून पंडितांनीं संस्कृत भाषेस सुद्धां उत्तम रीतीनें नटविली आहे. जगांत एक धर्माची प्रस्थापना करूं पाहणाऱ्या अकबरबादशाहाच्या रामराज्यांत पंडितांचा उदय होऊन त्यांनीं आपल्या काव्यप्रतिभेनें बादशहास आपलेंसें करून टाकिलें होतें. असो; आमच्या वामनपंडितांनीं या संस्कृतवधूस मराठी पोषाख चढवितांना रसहानी किंवा पदहानी बिलकुल होऊं दिली नाही व जगन्नाथरायांचें हृद्गत उत्कृष्ट तऱ्हेनें बाहेर आणलें आहे. एकंदरींत हें उत्कृष्ट भाषांतर सर्व भाविक व रसिक लोकांच्या आदरास पात्र व्हावें असेंच झालें आहे. ८. सकल पृथ्वीचें किंवा सृष्ट पदार्थीचें सौभाग्य मिळविणारें असें तुझें जल. ९. शोभा देणारी वस्तु. १०. जगास लीलेनें उत्पन्न करणाऱ्या शंकरास साधनसंपत्ति देणारें असें.

श्रुतींची[1] तत्त्वोक्ती,[2] सुकृत[3] विबुधांचेंचि[4] अथवा;
    सुधाबंधू तूझें सलिल[5] अमुच्या नासु अशिवा.[6] ॥ १
दरिद्रांच्या[7] दैन्या, मलिनहृदयांच्या[8] अघबला,[9]
    हरी ऐक्यावारीं[10] त्वरित पडतां नेत्रकमला;।
अविद्यावृक्षाचें[11] हनन करि दीक्षागुरुच[12] हा,
    तुझा देवी तोयप्रवह[13] अमिता भूतिनिवहा.[14] ॥ २
उदेला(ल्या ?) मात्सर्यें गजवदनमाता[15] स्वकपटें,
    कटाक्षानें पाहे तरि मति महाक्रोध झगटे,।
अशा आविर्भावें पृथुलल्हरी[16] तूज उठती,
    शिरीं शंभूच्या[17] त्यौं जनकलुष[18] भंगूत निर्गुती.[19] ॥ ३
बळें आलंबाच्या[20] तव जननि! गर्वोद्धतमनें
    अवज्ञेचे[21] पंथीं सकळ सुर मीं पावविं दिनें;।
अगे गंगे! माझेविषयिं जरि चित्तीं उबगसी,[22]
    रडूं तेव्हां कोणाजवळि? मज सांगें गति कशी? ॥ ४
न केलें सत्कर्माचरण जरि ज्यांणींहि स्मरतां,[23]
    तयांच्या जोड्यातें[24] हरिसि तिमिरा[25] जेंवि सविता;।
अशी तूझी ते हे तनु[26] सुरगणां सेव्य सकळां,
    त्रिधा[27] माझ्या पापा, अणिक हरु संताप सकळा. ॥ ५

---

१. वेदांची. २. सर्वस्व, मूळ. श्रुतींनी सांगितलेलें परमार्थतत्व. ३. पुण्य. ४. देवांचें. ५. अमृताशीं बंधुत्वानें वागणारें तुझें सलिल म्ह० पाणी. ६. अकल्याणास. ७. ह्या श्लोकाचा अन्वयः—तुझा तोयप्रवाह नेत्रकमलावर पडतां दरिद्र्यांच्या दैन्या त्वरित हरी. मलिन हृदयांच्या अघबला हरी इ०. ८. पापी. ९. पापसमूहाला. १०. एकवार दृष्टीस पडलें तरी. ११. मायामय संसाररूपी वृक्षाचें. १२. उपदेश देणारा गुरु. १३. पाण्याचा प्रवाह. १४. संपत्तिसमुदाय. १५. पार्वती. १६. मोठ्या लाटा. १७. त्या तुझ्या शंभूच्या शिरीं उठणाऱ्या लाटा जनांचें पातक भंगोत म्ह० त्याचा नाश करोत. १८. लोकांचें पातक. १९. लागलेंच; लौकर. २०. तुझ्या आश्रयाच्या बळानें. २१. सकळ देवांस अवज्ञेच्या पंथीं लाविलें म्ह० त्या सर्वांची मीं अवज्ञा केली. २२. उदासीन होशील; कंटाळा करसील. २३. पापी लोकांनीं तुझें स्मरण केलें असतां. २४. आळस्यादि दोष; पातक. २५. अंधकार. २६. प्रवाहरूप मूर्ति. २७. कायिक, वाचिक, व मानसिक अशा त्रिविध पापाला तुझी प्रवाहरूप मूर्ति दूर करो.

त्यजोनी साम्राज्य [1]तृणसदृश, जे कां [2]शुभमती
तुझ्या तीरीं [3]वेतौवलिललित नीरांत वसती; ।
[4]सुधेहूनि स्वादू सलिल पिउनी तृप्त जन जे,
तयांच्या [5]आनंदें गुणरहित मोक्षासि हसिजे. ॥ ६
[6]नृपस्त्रीवक्षोजीं [7]मृगमद [8]विभूषार्थ असतां,
प्रभातस्नानें [9]तो जननि! तव [10]तोयांत मिळतां ।
क्षणें, [11]देवश्रेणीसह मृग तया [12]नंदनवनीं,
स्वइच्छेनें जाती [13]अतिविमळदेहासि धरुनी. ॥ ७
मना आणी शांति, स्मरण करितां [14]तें, क्षणभरी
गितीं गातां पापा, त्वरित [15]भवतापाप्रति हरी ।
अहो! तें हें [16]कर्णा मधुरतर 'गंगा'पद असे,
असो प्राणत्यागीं मुखकमळिं माझ्या समरसें. ॥ ८
जळामध्यें क्रीडा करुनि बहुतोषेंचि असती,
तया काकांचेही [17]सुरपतिपुरीं [18]काम नसती! ।
[19]निवासें लोकांचें हरि [20]जनिमृतीदुःख मनिंचें,
असें तूझें तीर श्रम परिहरू सर्व अमुचे. ॥ ९
दिसेना जें वेदां [21]गतनिखिलभेदांसि नयनीं,
न जेथें जीवाची पसरत [22]मनोवाक्यसरणी, ।

---

१. तृणाप्रमाणें साम्राज्य टाकून तुझ्या तीरीं वास करितात. २. शहाणे. ३. वेतवृक्षांच्या ओळींनीं चंचल होणाऱ्या तुझ्या उदकांत. 'वेतावली' हा संयोग चमत्कारिक होय. ४. अमृताहून गोड असें उदक. ५. ह्यांचा आनंद निर्गुण मोक्षसुखाहून फारच अधिक. ६. राजस्त्रियांच्या स्तनांवर. ७. कस्तूरी. ८. शोभेकरितां; विलासाकरितां असणारा. ९. तो मृगमद. १०. पाण्यांत मिळाल्याबरोबर. ११. देवगणांसह. १२. इंद्राचें क्रीडावन. १३. पुण्यदेह धरून; परंपरेनें तुझा समागम झालेला असा मृग सुद्धां उत्तम गतीस पावतो. तेव्हां अर्थात् ज्यांस तुझा प्रत्यक्ष समागम आहे, ते मोक्ष पावतील यांत नवल काय? १४. तें गंगापद जें मना शांति आणी इ०. १५. संसारताप. १६. कानाला अत्यंत मधुर असीं 'गंगा' अक्षरें मरणकाळीं माझ्या मुखांत समरसें (अद्वैत भावनेनें) येवोत. १७. इंद्राच्या नगरींत. १८. इच्छा; तुझ्या तीरावर राहणाऱ्या कावळ्यांस स्वर्गांत राहणें आवडत नाहीं—असा अर्थ. १९. राहण्यानें. २०. जन्ममरणाचें. २१. ज्यांच्या ठिकाणीं सर्व भेद गेला आहे म्ह० अद्वैतप्रतिपादक असे वेद त्यांनाही जें दिसेना असें जें तत्त्व म्ह० ब्रह्म. २२. जेथें प्राण्यांच्या मनाचा आणि वाणीचा व्यापार चालत

अकारान्नाशा(मा?)तें त्यजुनि निजरूपींच वसणें,

जया तत्त्वातें तूं; [1]विषय म्हणती मूढमतिनें. ॥ १०

महादानें ध्यानें व्रतनियमयज्ञादिकविधीं,

इहीं जें [2]लोभेना [3]विमलतपकर्त्यांसहि कधीं, ।

असें तें विष्णूचें पद सहज तूं देशि [4]ललिते!

[5]समत्वीं, त्या तूतें कवण [6]तुलिजे? सांग [7]अमुतें. ॥ ११

विलोकीतां जीतें भवभय जनाचें परिहरी,

तया [8]चिन्मूर्तीचा अतुलमहिमा कोण विवरी? ।

अतिक्रोधें खिन्नें करि हट [9]उमा, तो न गणुनी

प्रयत्नें श्रीशंभू तुज निजशिरीं ठेवि जननी! ॥ १२

मदोन्मत्त-[10]व्रात्याधम-पतित[11]पैशून्य-[12]निकरीं,

[13]इहीं ही जीं त्रासें त्यजियलिं सकंपें अतिदुरीं; ।

जनांचीं तीं पापें सतत शमवीतां न शिणली,

अशी तूंची एक [14]प्रौढविभवें नांदशि भली. ॥ १३

अलीसी स्वर्लोकाहुनि [15]अवनिच्या शोकहरणीं,

अशा तूतें बांधी शिव निज[16]कपर्दीं निशिदिनीं; ।

अयी! [17]निर्लोभांला उपजविति लोभा, गुण असे

तुझे, त्यांचा प्रादुर्भव जननि! ऐसा [18]फळतसे. ॥ १४

---

नाहीं म्ह० ज्या तत्त्वाचें वर्णन प्राण्याला वाणीनें किंवा मनानें करवत नाहीं. 'यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह' इति श्रुतेः—असें जें तत्त्व तें तूं आहेस.

१. इंद्रियविषय जडरूप तूं आहेस असें मूर्ख मात्र म्हणतील. २. दान, ध्यान, व्रत, इत्यादिक पुण्याचरणानें जें विष्णूचें पद प्राप्त होत नाहीं. ३. शुद्धतप करणारास. ४. हे सुंदरी. ५. सर्वांवर सारख्या भावानें. ६. तुलना करावी. ७. आम्हांस. ८. तुझ्या मूर्तीचा. ९. रागावलेल्या पार्वतीचाही हट्ट न जुमानून शंकर तुला निरंतर मस्तकीं धरतो. १०. व्रात्य म्ह० संस्कारहीन; धर्मभ्रष्ट. ११. दुष्ट. १२. समुदाय. १३. मदोन्मत्त, संस्कारहीन, अधम, पतित इत्यादि लोकही जीं पापें आचरण करण्यास भितात व त्रासून लांब टाकून देतात, तीं सुद्धां दूर करूनही तूं श्रमली नाहींस. १४. प्रसिद्ध केलेल्या ऐश्वर्यानें. १५. पृथ्वींतील लोकांच्या शोकशमनासाठीं तूं स्वर्गांहून खालीं आलीस. १६. जटेमध्यें. १७. तुझे गुण शिवासारख्या निर्लोभी पुरुषांना सुद्धां लोभ उत्पन्न करितात. १८. फळास येतो. शंकरांनीं तुला बांधिलें हें तुझ्या सद्गुणांचें फळ होय!

जडांधापंगूंतें[1] बहुबधिर[2] वाणीविकल जे,
ग्रहद्वेषी[3], ज्यांचें अघहनन[4] यत्नें न घडिजे। ।
सुरींही[5] सोडीले कुनर नरकाचेचि गमनीं;
अशांतें रक्षाया पटु जननि! तूं औषध गुणी[6]. ॥ १५

स्वभावें जीं स्वच्छें, सहज[7] अतिशीतें, तव जळें,
तयांच्या उत्कर्षें यश सकळ लोकांत उजळे[8]; ।
जयां गाती तोषें सगरसुत[9] रोमांचें[10] धरुनी,
गति स्वर्लोकीं त्यां तव विभवयोगेंचि[11] जननी! ॥ १६

घडे[12] दैवें किंचित् कलुष परि संतापति मनीं,
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं; ।
जयां प्रायश्चित्तें नसति कुनरां, दे गति अशी,
समर्था[13] या लोकीं तुजसम अयी! तूंचि असती. ॥ १७

आगार[14] श्रेयांचें[15], सकळजनसंतोष अवनीं[16],
अशेषां[17] तीर्थांची गुरु, रुचिर[18] जीची(?) त्रिभुवनीं, ।
मतीशीं[19] सौख्या दे मलिन मतिला दुर्लभ रुची,
असें धाम[20] श्रीचें तव वपु[21] हरू आग अमुची. ॥ १८

मदें[22] श्रीच्या अंध 'प्रभु' म्हणविती मद्यपि जसे,
पुढें त्यांच्या धांवे श्रमरहित[23] मी लोभविवशें! ।

---

१. अज्ञानी, अंधळे, लंगडे. २. मुके. ३. नवग्रहांनीं पीडिलेले. ४. पातकाचा नाश. ५. आमच्या हातून पातकांचा प्रतीकार होत नाहीं असें म्हणून देवांनीही सोडलेल्या दुष्ट पातकी लोकांस रक्षण करण्यास तूंच 'रामबाण' औषध आहेस. ६. गुणाकारी. ७. स्वभावतः शीतल अशीं तुझीं उदकें. ८. प्रकाशतें. ९. भगीरथाचे पूर्वज. १०. आनंदानें; रोमांचित तनु होऊन. ११. तुझ्याच महिम्यानें त्यांस स्वर्गलोक प्राप्त झाला. १२. ज्यांना दुर्दैवेंकरून थोडेंसें पातक घडलें, परंतु ज्यांस लागलीच संताप म्ह० पश्चात्ताप झाला अशांस. १३. अशा पापी लोकांस गति देण्यास समर्थ अशी. १४. गृह; ठिकाण. १५. धर्म. १६. पृथ्वीवर सर्व लोकांस आनंदाचें कारण. १७. सर्व तीर्थांत प्रधान असें तुझें प्रवाहरूपी शरीर आमची आग म्ह० संताप दूर करो. १८. 'वक्र' याअर्थी शब्द हवा. १९. बुद्धीला समाधान देणारें. २०. जे संपत्तीचें माहेरघर. २१. प्रवाहरूपी शरीर. २२. संपत्तीच्या मदानें अंध झालेले राजे यांची आज्ञा पाळण्यांत लोभास गुंतून मी त्यांच्यापुढें धांवलों. २३. लोभामुळें कितीही श्रम झाले तरी ते मला नाहीं-तसेच वाटतात.

मतीच्या मंदत्वें त्यजुनि तुज नाशीं हितशता,[1]
अयी! हा माझाची अनय,[2] करुणा तूज उचिता.[3] ॥ १९

स्फुरे[4] वायू तेणें उठति लहरी,[5] तैं कमळिचा
गळे रेणू, तेणें सलिल विलसे[6] कुंकुमरुचा।
जया देवस्त्रींच्या[7] स्तनअगरुचा[8] पंक मिसळे,
बहू धावे ऐसें, तव जळ हरू[9] जन्म सगळे. ॥ २०

वरी उत्पत्ति [10]श्रीरमणचरणांच्या नखिहुनी,
असावें शंभूच्या निशिदिनिं जटाजूटभवनीं, ।
जपावें सर्वस्वें सतत पतितोद्धारकरणीं,
नसावें कां माते! तरि मग तुझें गौरव[11] जनीं? ॥ २१

नद्या शैलांहूनी[12] किति न निघती त्या क्षितितळीं?
वदावें शंभूच्या शिरिं गुरुपणें[13] कोण जडली?।
स्वतोयें[14] कोणें [15]श्रीदयितचरणालागिं धुतलें?
जियेतें योजावें जंव तुज न लेशाप्रति [16]भलें? ॥ २२

अनुष्ठो एकांतीं निरवधि[17] समाधीप्रति विधी,
निजो शेषीं सौख्यें [18]हरि, हर[19] करो [20]तांडवविधी;।
तपें कृच्छ्रें दानें उगलि[21] यजमानासि नैपवे,[22]
[23]प्रदात्री कामाची जरि जगिं तुझी मूर्ति मिरवे. ॥ २३

---

१. तुला सोडून मी आपल्या शतशः हितांचा नाश करून घेतला. २. अन्याय. ३. योग्य. ४. हाले. ५. लाटा. ६. कमळांचे रेणु मिसळल्यामुळें केशरासारखें दिसणारें किंवा शोभणारें. ७. स्वर्गांगना ज्या स्नानास आल्या त्यांच्या. ८. स्तनास लावलेला चंदनपंक. ९. पुनर्जन्म दूर करी. १०. लक्ष्मीपति विष्णु त्याच्या पायाच्या नखापासून तुझी उत्पत्ति, शंकराच्या जटेंत नित्य वास, आणि पतितांच्या उद्धारांत तत्पर, अशी तूं असतां लोकांत तुझें गौरव कां असूं नये? अर्थात् असेलच. ११. महिमा. १२. पर्वतांपासून. १३. आपल्या माहात्म्यानें. १४. आपल्या जलानें. १५. लक्ष्मीपति याच्या चरणास गंगेवांचून कोणत्या नदीनें धुतलें? १६. मुळाशीं ताडून पाहतां हा अपपाठ दिसतो. 'जियेतें योजावें तव तुलनलेशाप्रति भलें' असा कांहीं तरी पाठ पाहिजे. तुझ्या साम्याचा लेश तरी जिला आहे अशी कोणती नदी भलें (कवीनें) शोधून काढावी? असें म्हणावयाचें आहे. १७. पाहिजे तितका वेळ महादेव समाधि लावून असो. १८. विष्णु. १९. शंकर. २०. नृत्य. २१. उगीच राहोत. २२. तपें, दानें, वगैरे न पावोत. २३. इष्टार्थ देणारी. ब्रह्मा, विष्णु, महेश या तिघांचेंही काम तूं एकटी करणारी—असा भावार्थ.

[1]अनाथ, स्नेहाळे! गतिविहिन मी, तूं [2]सुगतिदा,
जगोद्धारा तूं, मी पतित, [3]गद मी, तूं अरि गदा, ।
[4]सुधाब्धी तूं, मी जो तृषित अयि! तूझा शिशु असा,
तशा तूतें आलों शरण, पथ योजीं [5]उचितसा. ॥ २४
[6]विरीले निःशेषें [7]यमनगरिंचे जे गलबले,
पहाया प्रेतांतें अवनि फिरती दूत उगले! ।
विमानाच्या [7]संघें [8]विबुधपथ सोडी स्वनियमा,
जसा आला भूमीं सुखकर तुझा कीर्तिमहिमा. ॥ २५
स्फुरे [9]कामक्रोधज्वर [10]बहुकरालार्चिक वनीं,
जळे तेणें [11]काया जननि! असुची ही प्रतिदिनीं, ।
[12]महोर्मींच्या योगें उसळति तुझे तोय[13]कण ते,
[14]तयां संतापातें शमवुत अहो देव[15]सरिते! ॥ २६
अहो! हे ब्रह्मांडाकृति सकळ लोकांसह [16]बरी
[17]रुळे जेथें [18]ऊर्मिभ्रमण विवशें [19]तिंदुकपरी; ।
असा तो हा [20]मृत्युंजय[21]पृथुकपर्दी जडिनला,
तुझा [22]श्रीतोयौघ प्रशमन करूं पाप वहिला. ॥ २७
जयाच्या उद्धाराविषयिं बहु तीर्थेंहि पळती,
स्वकानीं हस्तातें मग शिवशिवादीक धरिती! ।
असा मी त्या मातें पुनित करिशी तूं जननिये!
जगीं [23]पापघ्नाच्या हरिसि [24]गुरुगर्वास [25]सदये! ॥ २८
[26]श्वपाकांच्या [27]श्रेणीहुनि बहुत नीचांत गणना,
न मर्यादा पापा [28]अवसदन मी एकचि म्हणा! ।

१. मी अनाथ आहें व तूं दयाळू आहेस. २. उत्तम गति देणारी. ३. मी रोगग्रस्त आहें, तूं रोगाची अरी, नाशकर्त्री, आहेस. ४. तूं अमृतसमुद्र आहेस. ५. योग्य दिसेल तसा मला मार्ग दाखीव. ६. बंद झाले. ७. समुदाय. ८. देवांचा मार्ग मोठा झाला. ९. कामक्रोधांपासून उत्पन्न झालेला ज्वर म्ह० अग्नि. १०. अत्यंत तीव्र ज्वाळायुक्त. ११. शरीर. १२. मोठ्या लाटां-मुळें. १३. तुषार. १४. कामक्रोधाच्या ज्वरापासून झालेल्या संतापास. १५. हे गंगे. १६. 'ब्र-ह्मांडाकृती'चें विशेषण. १७. लोळते, गटकळ्या खाते; तिंदुकफळाप्रमाणें ज्या तुझ्या उदकांत सकळ ब्रह्मांड लाटांसरसें गटकळ्या खातें. १८. लाटांसह. १९. टेंभुरणीच्या फळाप्रमाणें. २०. मृत्यूस जिंकणारा. २१. जटांमध्यें. २२. उदकप्रवाह. २३. पापांचा नाश करणारीं जीं शिवादिक दैवतें. २४. मोठा गर्व त्याला. २५. कृपाळू. २६. चांडाळ. २७. समुदाय. २८. पापाचें माहेरघर.

अशाला ताराया [1]कटि कसुनि होती निजसखे!
    कशी तूझी [2]श्लाघा [3]द्विपदपशु जो तो करुं शके? ॥ २९

न कोणीही [4]ऐसा अजिवरि मला प्राप्त जन कीं,
    जयाच्या उद्धारें अखिल [5]अवनी मस्तक [6]तुकी; ।
अशी इच्छा पोटीं बहु दिवस होती, तुज, [7]तिला
    कराया, मी आलों, सफळ, समजो भाव [8]तुजला. ॥ ३०

स्वभाव [9]श्वानाचा, तदुपरि [10]असत्यार्थ वदनीं,
    कुतर्का घोकावें, अवडि [11]परपैशुन्यमननीं, ।
असे माझे दोष [12]प्रचुर, गुण कानीं परिसुनी
    मुखा पाहे कोण क्षणहि तुजवांचूनि जननी! ॥ ३१

वृथा ते मोठेही नयन तुझि ज्यांहीं तनु कधीं
    विलोकीली नाहीं, जरि जननि! [13]लावण्यउदधी; ।
न वर्णावें त्याला [14]अधमनरकर्णाकृति बिळा,
    न ऐकीला जींहीं मधुर तव [15]लीलागलबला. ॥ ३२

घडे ज्यांला पुण्याचरण तिहिं जावें [16]सुरपुरीं,
    पडावें [17]पापिष्ठीं विषम नरकीं घोर विवरीं; ।
व्यवस्था ऐशी हे [18]अशुभमय देशांतचि असे,
    तुझी लीला जेथें सकळ [19]अघहर्त्री न विलसे. ॥ ३३

वधीती विप्रांतें सतत गुरुदारानिरत जे,
    हरावें [20]स्वर्णातें, मलिन [21]मदिरापानहि किजे, ।

---

१. कंबर बांधून. २. स्तुति. ३. दोन पायांचा पशु म्ह० नरपशु. ४. असा पातकी. ५. पृथ्वी. ६. डोलवी. ७. त्या इच्छेला. ८. तिला सफळ कराया मी तुज (तुजपाशीं) आलों- हा अन्वय. ९. कुत्र्याचा. १०. खोटें बोलणें. ११. दुसऱ्याचा उणेपणा काढण्यांत. १२. पुष्कळ. १३. अत्यंत सुंदर अशी तुझी तनु ज्या डोळ्यांनीं पाहिली नाहीं ते मोठे असूनही व्यर्थ. १४. ज्या अधम नरांच्या कानांनीं तुझी लीला ऐकिली नाहीं ते कान नव्हत तर बिळें समजावीं. १५. लीलेचा गजर. १६. अमरपुरींत. १७. पापी लोकांनीं. १८. पापी देशांत म्ह० ज्या ठिकाणीं तुझी पापनाशक लीला नाहीं त्या देशांत अशी व्यवस्था आहे. जेथें तुझी लीला आहे, तेथें सर्वच उत्तम गतीस जातात—असा भाव. १९. पाप हरण करणारी. २०. सोनें. २१. दारूचें सेवन ज्यांनीं करावें असे. पंचमहापातकांत हीं येतात.

महत्पापी ऐसे त्यजिति निजदेहा तव तिरीं,
करीती क्रीडा ते [1]कृतमखनराहूनि उपरी. ॥ १४

[2]सुगंधा पुष्पांचें हरण नियमें संतत किजे,
वियोगाच्या शस्त्रें [3]क्षत हरिति तत्प्राणहर जे, ।
असा वायू तूझा [4]चलितलहरीयोगविभवें
स्वसंचारें माते! करि भुवन हें शुद्ध [5]अवघें. ॥ १५

किती या लोकांच्या स्थितिस सुमती सांग करिती,
पवित्रात्मे कोणी सतत परलोकास जपती, ।
[6]कृपापांगें तूझ्या सुखरुप निजें मी [7]धणिवरी,
समर्पूनी [8]लोकद्वय जननि! चिंता तुजवरी. ॥ १६

जगीं जे कां [9]व्रात्यादिक अधम देह प्रकटले,
तयां रक्षावें, ही [10]अविट करुणा तूज न टळे; ।
सुटेना तैसेंची [11]दुरितविषयीं प्रेम मज कीं,
स्वभावातें कोणी त्यजि [12]जनिं अशी गोष्ट लटकी. ॥ १७

जटा शंभूनृत्यें हलु न हलती वीचिहि मधीं
तुझ्या, ते ची जाणों भुज करिति [13]लास्योचित विधी; ।
महादोलें वाजे [14]जलनिकर जो तोचि डमरू,
असा तूझा नृत्योत्सव जननि! तापाप्रति हरू. ॥ १८

तुझ्या ठायीं ठेवीं निज[15]कलुषचिंता निशिदिनीं,
तया मातें जेव्हां त्यजिसि [16]विषमीं [17]विश्वजननी! ।
अनाथस्नेहाळे! त्रिजगिं तयिं विश्वासचि बुडे,
निराधारी झालें सहज मग [18]कारुण्य उघडें! ॥ १९

---

१. यज्ञ केलेल्या पुरुषापेक्षां उपरी (अधिक). २. फुलांचा सुगंध हरण करणारा. ३. भार्यादिकांचे विरहरूपी शस्त्रांनीं झालेली जखम नाहींशी करितो. ४. तुझ्या चंचल लाटांच्या संपर्कामुळें. ५. पूर्ण. ६. कृपाकटाक्षानें, कृपावलोकनानें. ७. पोटभर, हवा तितका. ८. इहलोकाची व परलोकाची चिंता. ९. संस्कारहीन. १०. जिचा कधीं कंटाळा येत नाहीं अशी करुणा. ११. जसा तुला व्रात्यादिक अधमांचा स्नेह टाकवत नाहीं, तसा मला पातक करण्याविषयींचा प्रेमा सुटत नाहीं. १२. लोकांत. १३. नृत्याला योग्य. १४. जलसंचय. १५. मत्पापहरणाची काळजी. १६. संकटीं. १७. हे जगांतील लोकांचे आई. १८. जनांचा उद्धार करण्याविषयींचा तुझा कळवळा माझा त्याग केलास तर निराधार व उघडा म्ह० आश्रयरहित झाला असें समजावयाचें.

अलिंगी जैं प्रेमें गिरिश शिरिं जैशी न तशि रे !
  शिरीं [1]अंबेच्या तें जंव [2]लहरिचें जाळ उतरे; ।
तयातें [3]हस्ताब्जें [4]असुडि [5]नगभू रक्तनयना,
  अशी [6]सापत्नीची विदित तव लीला त्रिभुवना. ॥ ४०
शरण्ये ! लोकांला शरण तुज येथेंचि करणें
  उपाधि[7]व्यासंगास्तव, [8]परअभीष्टा [9]वितरणें; ।
[10]मदात्मा हा माते ! शपिल तुज निष्पाप वदतों,
  स्वभावें त्वद्रूपीं [11]अतुल [12]अनुरागासि धरितों. ॥ ४१
जि[13]लें एके काळीं जन निजकपाळीं ति[14]लकितां,
  हरे [15]दुर्वर्णाची लिपि, जिस विधी सुज्ञ लिहिता, ।
तमाच्या जे नाशाविषयिं धरि [16]मार्तंड उपमा,
  अशी तूझी माती मम परिहरू शोकं[17]गरिमा. ॥ ४२
सुजन्मा पावूनी नरपशु कुदेशांत मरती,
  तयां [18]पुष्पव्याजें हंसुनि [19]अगतीतें सुचविती. ।
स्वसौगंधें नित्य [20]भ्रमरकुलमालिन्य हरितें,
  घडो ऐशा तूझ्या [21]पुलिनतरुंचें सख्य अमुतें. ॥ ४३

---

१. पार्वतीच्या. २. लाटांचें. ३. हस्तकमलानें. ४. फेंकून देई. ५. नगभू म्ह० पर्वतकन्या पार्वती, रक्तनयना म्ह० आरक्त नेत्र जिचे. नगभू रक्तनयना म्ह० रागावलेली पार्वती. ६. अशा तुम्हा उभय सवतींच्या गोष्टी लोकांस ठाऊक आहेत. ७. हेतूमुळें. ८. दुसऱ्यांचे, लोकांचें मनोरथ. येथेंही अपपाठ असावा. मुळांत श्लोक आहे त्याचा अर्थ असा आहे कीं--इतर लोक तुला शरण येतात ते तूं इष्टमनोरथ पूर्ण करितेस म्हणून येतात; त्यांस इष्टमनोरथ नसते तर तुला ते शरण आले असते किंवा नसते याची वानवाच आहे. ९. देणें. १०. मी शपथ घेऊन निष्पाप बुद्धीनें सांगतों कीं माझा आत्मा तुझ्यावर अत्यंत प्रीति करतो, याला माझा स्वभावच कारण. दुसरें कांहीं कारण नाहीं. ११. तुलना करतां येत नाहीं ज्याची; अत्यंत. १२. प्रीति. १३. ज्या तुझ्या तीरावरच्या मातीला. १४. जिचा टिळा कपाळीं लावला असतां. १५. ब्रह्म-देवानें जन्मतः कपाळी लिहून ठेवलेलीं दुष्ट अक्षरें. लिहिता=लिहिणारा. १६. अज्ञानाच्या नाशाविषयीं जी सूर्याप्रमाणें समर्थ आहे. १७. थोरपणा, मोठा शोक. १८. जे तुझ्या कांठचे वृक्ष आपल्या प्रफुल्लित पुष्पांच्या मिषानें कुदेशांत राहणाऱ्या नरांस हंसतात व ज्यांचें सौरभ्य भ्रमरांस पवित्र करितें अशा त्या वृक्षांचा मला नित्य समागम असो--असा भावार्थ. १९. दुर्गति. २०. भ्रमरसमुदायाचा मलीनपणा. २१. वाळू, तीर. तेथील वृक्ष.

महाकष्टें सेवा करुनि किति देवांसि यजिती,
  दुजे[1] यज्ञीं निष्ठा[2], कितिक मन योगें दमविती[3], ।
परी मी तों तूझ्या स्मरणपरितोषेंचि[4] फुगुनी
  जगातें या लेखीं[5] तृणसम अयो! विश्वजननी! ॥ ४४

सुकर्मे जे जन्मप्रभृति विधिनें[6] नित्य करिती,
  तयां संरक्षाया कितिक सुर हे दक्ष[7] असती; ।
परंतू जो पापी सहजचि अनाधार कुमती,
  अशाला ताराया तुजविण दिसेना परगती[8]. ॥ ४५

पया तूझ्या माते! पिउनि शिशुभावें[9] रतिहिना-
  सवें क्रीडे गेलों! अधिक घडलें दुःखचि मना; ।
निजोत्संगीं[10] आतां निजवि मज वो! स्वस्थ जननी!
  सुखस्पर्शीं तापा हरि पवन[11] जेथें[12] अनुदिनीं[13]. ॥ ४६

कटी बांधी आधीं, वरि अवरिं वेगें परिकरा[14],
  ललाटीं[15] संरक्षी दृढ उरगबंधें[16] शशधरा; ।
न कीजे त्वां हेळौं[17] इतरजनसादृश्य धरुनी,
  जगन्नाथाचा हा गतिसमय[18] सांभाळि जननी! ॥ ४७

शरीरीं चंद्राभा[19] विशद[20]शशिशोभा सुमुकुटीं,
  धरी कुंभा, पद्मा, वर, अभय, चारी[21] करपुटीं; ।
पेटीं[22] पीयूषाची रुचि रुचिर, संस्थान[23] मकरीं,
  अशा तूतें ध्याती नरवर[24] न त्यां दुर्गति करीं. ॥ ४८

---

१. दुसरे कित्येक. २. भक्ति. ३. कित्येक मनाचें योगाभ्यासानें संयमन करितात. ४. तुझ्या स्मरणानेंच संतुष्ट होऊन. ५. मानतों. ६. यथाविधि. ७. तत्पर. ८. अन्यगति, अन्य साधन. ९. बालिशपणानें. रतिहिनासवें ज्यांना तुझी भक्ति नाहीं अशा मित्रांबरोबर. १०. आपल्या मांडीवर. ११. वायु. १२. ज्या तुझ्या उत्संगामध्यें. १३. नित्य, निरंतर. १४. कंबरपट्टा. १५. मस्तकीं. १६. चंद्राला मस्तकी सर्पाच्या वेष्टनानें घट्ट बांध. १७. हेलना, हिलेपणा. १८. वयावरोबर समय. १९. जिचें शरीर चंद्रासारखें धवल. २०. स्वच्छ. २१. जिनें आपल्या चार हातांत कुंभ, कमळ, वरदान आणि अभयप्रदान हीं चार आयुधें धारण केलीं आहेत. २२. जिच्या वक्षाचे ठिकाणीं पीयूषाची शोभा आहे म्ह० जिचें वस्त्र अमृतासारखें शुभ्र आहे. २३. आरोहण, जी मकरावर आरूढ आहे. २४. नरश्रेष्ठ.

सु[1]मंदहसितें स्फुरे वदनदीप्ति पीयूषसी,
तिणें निववि मानवां [2]भवदवाग्नितप्ता कसी; ।
धरी वि[3]शद [4]चित्प्रभामयअपूर्वरूपा तया,
करू मम सुखी तनू त्वरित [5]शंतनूची प्रिया. ॥ ४९

[6]मंत्रां मौन पडे, महौषधिगती संकोचल्या, देवही
त्रस्त, [7]स्रस्त सुधारसाख्य, [8]गरुडग्रावा थके वी(भी?)मही; ।
हे [9]मंदाकिनि! [10]कालियास दमितां धुली पदा त्याचिया,
आतां तूं [11]भवनागदंशजनना तापा हरीं माझिया. ॥ ५०

[12]धूतीं चर्मा द्विपी[13]च्या प्रथम, गण, [14]मणी, नंदि, चंद्रादि सारीं
[15]हारी संपूर्ण [16]अंबा मग पणि अपणा घालुं इच्छी पुरारी; ।
ऐशा संधीस तूतें विहसुनि निरखी पार्वती गूढ [17]भावें,
क्रोधोर्मी नित्य(लोल?)लीला नटविशि तयिं, ते रक्षु आम्हां प्रभावें.॥ ५१

करी अलंकार [18]शिवोत्तमांगीं, स्नानें जगाचे [19]अघशैल भंगी, ।
अपूर्व शोभा जिचिया तरंगा, गंगा अशी पूत करू [20]ममांगा. ॥ ५२

---

१. मंदहास्यामुळें जिच्या वदनीं अमृताची कांति आहे. २. संसाराग्नीनें तापलेल्या नरास. ३. शुद्ध. ४. चैतन्यरूप अपूर्व देहास धारण करणारी. ५. शंतनू राजाची भार्या गंगा. शंतनू राजानें गंगेस वरिलें व तिजपासून त्यास आठवा पुत्र भीष्म झाला ही गोष्ट भारतांत प्रसिद्ध आहे. ६. माझें पाप नाश करण्यास महामंत्रांचें सामर्थ्य चालत नाहीं, महौषधीच्या गतिही खुंटल्या, देव भ्याले, अमृतरस गळाला, गरुत्मान् पद्मरागादि मणी व्यर्थ झाले इत्यादि. ७. खालीं पडलें. ८. गरुडग्रावा=पाचमणी. थके=थकतो. 'वीमही' या ऐवजीं 'भीमही'=बळकट असा पाठ असेल काय? ९. हे स्वर्गांतील गंगे! १०. कालिया सर्पास दमन करणारा. (कृष्ण.) ११. संसार हाच कोणी नाग (सर्प) यापासून झालेला ताप. १२. ह्या श्लोकाचा भावार्थः–शंकर पार्वती द्यूत खेळत असतां पणास लावलेला सर्प इत्यादि सर्व वस्तु जेव्हां पार्वतीनें जिंकल्या तेव्हां शंकरानें स्वतः आपणास लावावें असा विचार केला. हें पाहून गंगेस पणास घालावें अशा अभिप्रायानें पार्वतीनें जेव्हां तुझ्याकडे पाहिलें तेव्हां भयानें व क्रोधानें तुझ्या लाटा चंचळ झाल्या. त्या लाटा आमचें रक्षण करोत!' १३. गजचर्मास. १४. रुद्राक्षमणी. १५. हरण करिती झाली. १६. पार्वती. १७. अभिप्राय. १८. शंकराचे मस्तकीं. १९. पापाचे पर्वत. २०. माझ्या अंगास पवित्र करो.

# भगवद्गीता.

(समश्लोकी.)

## अध्याय पहिला.

### उपोद्घात.

श्रीमान् श्रीभगवान् साक्षात् शेषशायी जगद्गुरू ।
मंगळाचरणीं वंदूं जगन्मंगळ जो हरी. ॥ १
भगवान् भगवद्गीतावक्ता जो भक्तसारथी ।
टीकाकारहि तो साक्षात् वामनात्मा जगद्गुरू. ॥ २
'समश्लोकी' इचें नांव, जितुके श्लोक मूळिंचे ।
टीकेचे तितुके श्लोकी सज्जनानंदकारक. ॥ ३
श्लोकाचसारिखे श्लोक, श्लोकीं श्लोकार्थसंग्रह ।
करितो उत्तमश्लोक 'समश्लोकीं' अशी हरी. ॥ ४
दृष्टीं दिसति हे श्लोक, टीकेचे वामनाकृती, ।
अर्थीं त्रिविक्रमतनू संतदृष्टीस दाविती. ॥ ५
कोठें पदपदाचाही अर्थ भावार्थ युक्तही, ।
कोठें कोठें भावमात्र बोलेल भगवान् स्वयें. ॥ ६
भाषा कैशी तरी हो कां, अर्थी तात्पर्य सज्जना, ।
तथापि भगवद्वाणी हे प्राकृत म्हणों नये. ॥ ७
करी मनुष्यसदनीं अवतार तरी हरी ।
गीता श्रीभगवद्वाणी भाषाटीकेमधें तशी. ॥ ८
वाणी श्रीचक्रपाणीची वेदगुह्यार्थरूपिणी ।
कोण्या मिषें प्रकटली तें वेदव्यास बोलतो. ॥ ९
कीं पुत्र धृतराष्ट्राचे आणखी पुत्र पंडुचे ।
युद्धालागीं कुरुक्षेत्रीं मिळाले राज्यकामुक.[१] ॥ १०
धृतराष्ट्रास तेथील वृत्त सर्व वदावया ।
वेदव्यासेंहि दिधला शिष्य संजय आपुला. ॥ ११
धृतराष्ट्र पुसे त्याला वृत्त तेथिल येथुनी ।
गीता अष्टादशाध्यायी भीष्मपर्वांत भारतीं. ॥ १२

---

१. राज्याची इच्छा आहे ज्यांस ते.

सातशें श्लोक हे गीता टीकाही श्लोक सातशें ।
अध्यायाचे आदिअंतीं थोडेसे श्लोक वेगळे. ॥ १३
टीका अष्टादशाध्यायी शेषशायी जगद्गुरु ।
करी सप्तशतश्लोकी तीचा प्रारंभ येथुनी. ॥ १४

विषयप्रवेश.

धर्मक्षेत्रीं कुरुक्षेत्रीं मिळाले युद्धकामुक ।
माझे आणखि पांडूचे संजया! वर्तले कसे? ॥ १
रचलें पांडवदळ तें दुर्योधन देखुनी ।
राजा वचन हें बोले द्रोणाजवळि येउनी. ॥ २
पाहें हे पांडवी सेना आचार्या! थोर जे बहू ।
तुझ्याच शिष्यें रचिली शाहण्या द्रुपदात्मजें. ॥ ३
तेथें भीष्मार्जुनातुल्य शूर थोर धनुर्धर, ।
युयुधान, विराटाख्य, द्रुपदाख्य महारथी. ॥ ४
धृष्टकेतू, चेकितान, काशीराजा पराक्रमी, ।
पुरुजित्, कुंतिभोजाख्य, शैब्याख्य, पुरुषर्षभ! ॥ ५
महावीर युधामन्यू उत्तमौजा पराक्रमी, ।
अभिमन्यु, द्रौपदीचे पुत्र सर्व महारथी. ॥ ६
आमचे थोर जे त्यांतें आयीक ब्राह्मणोत्तमा! ।
सैन्याचे जे धनी माझ्या यांतें संज्ञार्थ सांगतों. ॥ ७
तूं, भीष्म, आणखी कर्ण, कृप जो विजयी रणीं, ।
अश्वत्थामा, विकर्णाख्य, तोहि भूरिश्रवा तसा. ॥ ८
आणीकही बहू शूर मदर्थ मरणार जे ।
नानाशस्त्रें हाणणारे युद्धीं कुशळ सर्वही. ॥ ९
असमर्थ तयांचें तें समर्थ बळ आमुचें ।
जें सैन्य रक्षिलें भीष्में त्याचें तो भीम रक्षिता. ॥ १०
तथापि सैन्यरक्षेचीं स्थानें जीं ज्यांस दीधलीं ।
भीष्मातेंचि तुम्ही रक्षा सर्व त्या त्या स्थळींहुनी. ॥ ११
तों दुर्योधन संतोषि ऐसा भीष्म पितामह ।
गर्जोनि सिंहनादातें प्रतापें शंख वाजवी. ॥ १२

१. धर्मभूमीवर. २. पुरुषश्रेष्ठ.

तों वाद्यें शंखभेर्यादि पणवानकगोमुखें ।
वाजवीलीं एकसरें, जाला तो ध्वनि तुंबळ. ॥ १३

तों थोर रथ शुभ्रांश्वीं युक्त, एका रथीं तया ।
दिव्य वाजविते झाले शंख-माधव पांडव. ॥ १४

हृषीकेशें पांचजन्य, देवदत्त धनंजयें, ।
पौंड्रनामा महाशंख भीमें वाजविला बळें. ॥ १५

राजा अनंतविजय शंखातें श्रीयुधिष्ठिर, ।
माद्रीपुत्रीं वाजविले सुघोष मणिपुष्पक. ॥ १६

धनुर्धर महाकाश्य, शिखंडीही महारथी, ।
अजिंक्य सात्यकी वीर, धृष्टद्युम्न, विराटही. ॥ १७

द्रुपद, द्रौपदीपुत्र, अभिमन्यु महाभुज, ।
शंख वाजविले यांहीं आपलाले पृथक् पृथक्. ॥ १८

तो घोष धार्तराष्ट्रांच्या हृदयांतें विदारुनी ।
आकाश आणि भूमीतें महा तुंबळ गर्जवी. ॥ १९

तों धार्तराष्ट्र रचले हें देखोनि कपिध्वज ।
आरंभितां शस्त्रघात घेऊनी धनु पांडव. ॥ २०

तेव्हां पार्थ हृषीकेशा बोलिला, 'हे महीपते! ।
करीं माझा रथ उभा या दों सैन्यांत अच्युता! ॥ २१

तों कीं जों यांसि मी पाहें, जे युद्धाकारणें उभे, ।
म्यां येथें कोणकोणासीं झगडावें रणांत या? ॥ २२

पाहेन युद्धकर्त्यांतें जे मिळाले रणांत या ।
दुर्बुद्धि धार्तराष्ट्राचें इच्छिती प्रिय जे रणीं.' ॥ २३

हृषीकेश गुडाकेशें प्रार्थिला जों असा नृपा! ।
तों दों सेनामध्यभागीं तो स्थापूनि रथोत्तम, ॥ २४

समोर भीष्मद्रोणांच्या सर्व भूपाळ संमुख, ।
'पार्था! पाहें' म्हणे 'यांतें, मिळाले जे कुरूंप्रती.' ॥ २५

तों पार्थ पाहे चुलते आजे जे त्यांत त्यांप्रति ।

---

१. महाबाहु; महाबलवान. २. कौरवांच्या. ३. व्यवस्थेनें उभे राहिले. ४. ध्वजावर आहे वानर ज्याच्या असा अर्जुन.

गुरू मामे आणि भाऊ पुत्र पौत्र तयांसही. ॥ २६
सासऱ्यां सोहिऱ्यांतेंही त्यां दोहीं सैन्यसागरीं ।
देखोनि पुत्र कुंतीचा बंधूतें त्या रणांगणीं ।
कृपेंकरुनि आविष्ट विषादें बोलिला असें. ॥ २७
'देखोनि कृष्णा! स्वजन युद्धार्थी सिद्ध जे उभे ।
पिळती सर्वही गात्रें, दुःखें मुखहि वाळतें. ॥ २८
शरीरीं कांप सुटतो, आंगीं रोमांच ऊठती, ।
हातापासूनि गांडीव गळतें, जळते त्वचा. ॥ २९
उभा राहोंहि न शकें, वाटे भोंवतसे मन, ।
देखतों मीं निमित्तेंही विपरीतेंचि केशवा! ॥ ३०
न कल्याणहि मी देखें युद्धीं स्वजन मारुनी ।
न इच्छीं जयही कृष्णा! न राज्य अथवा सुखें. ॥ ३१
राज्यभोगें जीवितेंही गोविंदा! काय आमुतें? ।
राज्यभोग सुखें आम्ही ज्यांनिमित्त अपेक्षितों, ॥ ३२
टाकूनि प्राण धन ते उभे युद्धांत राहिले ।
गुरु द्रोणादि भीष्मादि हे आजे चुलते सुत. ॥ ३३
मामे श्वशुर नातू हे मेहुणे सोयिरे तसे ।
मी यांस मारुं इच्छींना हे जरी मज मारिती. ॥ ३४
त्रैलोक्यराज्याहिलागीं तेथें हे भूमि ते किती? ।
मारूनि धार्तराष्ट्रांसी सिद्धि काय जनार्दना!? ॥ ३५
आम्हां पापचि लागे हे आततायिहि मारितां, ।
यालागिं यांस माराया आम्ही योग्य न हों कधीं. ॥ ३६
होऊं स्वजनहत्येनें सुखीही केंवि माधवा!? ।
ते हें न पाहति जरी लोभेंकरुनि मूढधी ।
कुलहत्येंत जो दोष मित्रद्रोहांत पाप जें. ॥ ३७
पापापासूनि या आम्ही कैसे न परतों हरी!? ।

---

१. भरलेला. २. मनाला भ्रम होतो. ३. चिन्हें. ४. अत्यंत दुष्ट. ५. मूढ, नष्ट झाली आहे बुद्धि ज्यांची.

कुलहत्येंत जो दोष देखतांही जनार्दना! ॥ ३८
कुलक्षयेंच बुडती कुलधर्मपरंपरा, ।
धर्मनाशें सर्व कूळ अधर्मा वश होतसे. ॥ ३९
अधर्माच्या बळें कृष्णा! दुष्ट होती कुलस्त्रिया, ।
त्यांच्या दोषें वृष्णिनाथा! होतसे वर्णसंकर. ॥ ४०
संकरें होति नरक कुलघ्नाच्या कुलासही ।
पिंडोदकक्रियालोपें च्यवती सर्व पूर्वज. ॥ ४१
या दोषीं त्या कुलघ्नाच्या वर्णसंकर होतसे ।
बुडती जातिचे धर्म कुलधर्महि शाश्वत. ॥ ४२
गेले ज्यांचे वंशधर्म मनुष्यांचे जनार्दना! ।
नरकीं निश्चयें वास तयां आइक तों असे. ॥ ४३
महा पापीं कटकटा! आम्हीं निश्चय मांडिला ।
कीं राज्यलोभें स्वजन मारायाला प्रवर्तलों. ॥ ४४
जरी निःशस्त्र उगला त्या मातें शस्त्रहस्त[३] हे ।
मारिती या रणीं सर्व माझें कल्याण त्यामधें.' ॥ ४५
बोलोनि अर्जुन असा रथीं तो बैसला उगा, ।
बाणेसीं धनु टाकूनी शोकें विव्हळमानस. ॥ ४६

### उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया प्रथमावरी ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
श्रीमद्वामनपादपद्मयुगुळीं अर्पू मना षट्पदा,
स्वात्मा तो जगिं सत्पदें स्फुरतसे, दावी स्वयें चित्पदा ।
आनंदात्मक तोचि श्रीहरि गुरू, आत्मा नसे वेगळा,
ऐसा श्रीभगवान् तया नमिन मी प्रेमें जगन्मंगळा. ॥ २
तो श्रीहरी सारथि अर्जुनाचा होऊनियां प्रेरक या मनाचा, ।
अध्यायअंतीं कथि एक श्लोका म्हणोनि दावी स्वरूपावलोका. ॥ ३

---

१. परंपरेनें चालत आलेले धर्म. २. पतन पावती. ३. शस्त्र आहे हातीं ज्यांच्या. ४. कमल. ५. भ्रमरा. ६. 'सत्पद स्मरतसें' असा पाठ आहे. ७. 'नमितसें' पाठ. ८. 'वामनाचा' पाठ. ९. 'जो' पाठ.

अध्याया प्रथमांत पार्थ स्वजनां देखोनियां मोहला,
कीं हे गोत्रज सोयिरे कुलगुरू मारींच ना मी मला ।
'लागे दोषें म्हणोनि युद्ध न करीं' कृष्णा असें बोलिला,
बाणेसीं धनु टाकुनी मग रथीं तो ऊगला बैसला. ॥ ४

---

## अध्याय दुसरा.

### उपोद्घात.

आत्मा न मारी न मरे, याचा कां व्यर्थ शोक हा? ।
हें येथें कृष्ण बोलेल, तेंचि सांगेल संजय. ॥ १

### विषयप्रवेश.

कृपाविष्ट तसा पार्थ, आसूं नेत्रांत दाटलीं. ।
बोले विषादयुक्तानें त्यातें हें मधुसूदन. ॥ १
'कैंचें कैश्मल हें तूज उदेलें विषमांत या, ।
ज्याणें अकीर्ति नरक जें तुच्छां योग्य अर्जुना! ॥ २
पार्था! षंढ नको होऊं तुज योग्यचि हें नव्हे, ।
ऊठ टाकूनियां तुच्छ लेंडीपण परंतपा! ॥ ३
भीष्मासि मी कसा भांडूं? द्रोणासीं मधुसूदना!! ।
ज्यां पूज्यांसी बोलवेना बाणीं हाणों तयां कसा? ॥ ४
न मारितां यां वडिलां गुरूंतें भिक्षा खाणें वाटतें श्रेय मातें ।
धनार्थि हे मारुनि याचि लोकीं भोगूं रक्तें भोग माखूनियां कीं. ॥ ५
आम्ही जिंकों वरवें हेंचि आम्हां, किंवा जाओं मेलिया मोक्षधामा, ।
दोन्ही नेणों यांसि मारूं, तथापी वांचों आम्ही हें न इच्छूंचि पापी. ॥ ६
या धर्माच्या संकटीं मूढ झालों, तूतें कृष्णा! शरणप्राय आलों, ।
जें कल्याण स्वामिनें तें वदावें, या शिष्यातें शासनें वागवावें. ॥ ७
न तें दिसे जें मम शोक नासी, जो शोक हा शोषक इंद्रियांसी, ।
समृद्ध राज्य त्रिदेशेंद्रलक्ष्मी पावेन येथें न तरी सुखी मी.' ॥ ८

---

१. 'अध्यायीं' पाठ. २. 'पाप' पाठ. ३. दयेनें व्याप्त. ४. मोह. ५. कठिणसमयीं. ६. भित्रेपण. ७. शत्रूंला ताप करणाऱ्या. ८. आकेनें. ९. देवांचें राज्य.

[1]परंतप [2]गुडाकेश [3]हृषीकेशासि बोलिला, ।
'न करीं युद्ध गोविंदा!' म्हणोनी राहिला उगा. ॥ ९
त्यातें बोले हृषीकेश करूनी मुख हांसतें ।
विषादयुक्ताप्रति हीं वाक्यें सैन्यद्वयामधें. ॥ १०
'अयोग्य शोक करिसी, आणि पांडित्य बोलसी, ।
शोक मेल्यां जित्यांचाही न करीतीच पंडित. ॥ ११
कधींही नव्हतों मी तूं हे राजे न घडे असें ।
पुढें [4]नासों हें घडेना कीं [5]अनादिहि नित्यही. ॥ १२
जीवासि देहिं या जैसें बाल्य तारुण्य वार्धक, ।
तैसी [6]देहांतरप्राती मोहेना [7]धीर ते स्थळीं. ॥ १३
कौंतेया! सुखदु:खें हीं देती विषय इंद्रियें, ।
[8]यांलाचि नाश उत्पत्ति सोसावीं हींचि भारता! ॥ १४
व्यथा न देती पुरुषा हे जया [9]पुरुषर्षभा! ।
सम दु:खीं सुखीं धीर तो मोक्षा योग्य होतसे. ॥ १५
असत् देह न जो नित्य, जीव सत् न अनित्य तो, ।
दोहींचें तत्त्व यां दोंत तत्त्वज्ञीं ब्रह्म देखिलें. ॥ १६
अविनाशी तेंचि जाण ज्याणें हें व्यापिलें जग, ।
कोणी या अव्ययांशाचा नाशही न करूं शके. ॥ १७
देह [10]नश्वर ज्या जीवा बोलिला अंश [11]नित्य तो, ।
अविनाशी [12]अप्रमेयाचा भांडें यास्तव भारता! ॥ १८
भेदवादी म्हणे मारी, चार्वाक म्हणतो मरे, ।
दोघेही नेणती आत्मा, न हा मारी, न हा मरे. ॥ १९
न हा होतो मरतो वा कधींही, देहासंगें होउनी होत नाहीं, ।
[13]अजा नित्या शाश्वता या पुराणा, देहा [14]ईंया मारितां मारवेना. ॥ २०

१. शत्रूला ताप देणारा. २. निद्रेला ज्यानें जिंकिलें असा अर्जुन. ३. इंद्रियांच्या प्रवर्तका, कृष्णास. ४. आम्ही न असं. ५. आम्ही सर्व अनादि आणि नित्य आहों. ६. दुसरा देह. ७. ज्ञानी पुरुष. ८. विषय व इंद्रियें यांला. ९. पुरुषांत श्रेष्ठ. १०. नाशवंत. ११. अविनाशी. १२. जो पूर्णपणें समजावयाचा नाहीं त्याचा. १३. जन्मरहित. १४. देहाचा नाश केला म्हणून यास मारवत नाहीं.

पूर्वोक्त लक्षणीं यातें जाण तो पुरुष स्वयें ।
प्रकृतीवेगळा कोणा मारी वा मारवी कसा? ॥ २१
वस्त्रें जुनी टाकुनि जेंवि देतो, शरीरधारी नवि अन्य घेतो, ।
कलेवरें टाकुनि जीव जीर्णें, घेतो नवीं आन अनेक वर्णें. ॥ २२
याला न तोडिती शस्त्रें, याला अग्नी न जाळितो, ।
न पाणी भिजवी याला, न करी शुष्क वायुही. ॥ २३
छेद्या दाह्या न हा योग्य शोषाया भिजवावया, ।
नित्य सर्वांत जो स्तब्ध, जो शाश्वत अचंचळ. ॥ २४
न चिंतवे निराकार बोलिला निर्विकार हा ।
त्याकारणें यासि असें जाण शोक नको करूं. ॥ २५
आतां देहासवें होतो मरतो जरि मानिसी, ।
तरी तूज महाबाहो! या शोकासि न योग्यता. ॥ २६
जो जाला त्यासि मरण, मेल्या जन्महि निश्चित, ।
परिहार नसे ज्याला त्या शोकासि न योग्य तूं. ॥ २७
भूतेंचि आदि अव्यक्तीं मध्येंही व्यक्त दीसती ।
अव्यक्तींच लया जाती त्याचा तो शोक कां परी? ॥ २८
आश्चर्यवत् पाहति यास कोणी, आश्चर्यवत् बोलति एक वाणी, ।
आश्चर्यवत् ऐकति एक कानीं, कोणी अहो! नेणति आइकोनी. ॥ २९
देहधारी न हा वध्य सर्व देहांत भारता! ।
भूतें तों नश्वरें, तस्मात् त्याच्या शोका न योग्य तूं. ॥ ३०
स्वधर्म पाहुनी कंपा करायाहि न योग्य तूं, ।
धर्मयुद्धाहुनी श्रेय क्षत्रियास न आणखी. ॥ ३१
प्रार्थिल्याविण जें जालें स्वर्गीचें द्वार उघडें, ।
सुखी निर्भय ते ऐसें युद्ध क्षत्रिय लाधती. ॥ ३२
आतां या धर्मयुद्धातें करीनासचि तूं जरी, ।
तरी स्वधर्म कीर्तीतें टाकुनी पाप पावसी. ॥ ३३
अपकीर्ति तुझी लोक आचंद्रार्कहि वर्णिती, ।
दुष्कीर्ती मान्यपुरुषा मरणाहुनि वाइट. ॥ ३४

१. वधार्ह. २. नाशवंत.

भयें रणांतुनी गेला म्हणतील महारथी, ।<br>
मान्य होऊनिही यांतें पावसी बहु [1]लाघव. ॥ ३५

बोलों नयेति ते बोल बोलती बहु शत्रु हे ।<br>
सामर्थ्य निंदिती तूझें त्याहुनी दुःख कोणतें ? ॥ ३६

मेलिया पावसी स्वर्ग, जिंकिल्या राज्य भोगिसी, ।<br>
यालागीं ऊठ कौंतेया! करूनी युद्धनिश्चय. ॥ ३७

लाभालाभ सुखें दुःखें जयापजय हे सम ।<br>
मानूनि, करिं तूं युद्ध यानें पाप न पावसी. ॥ ३८

[2]सांख्य हे बोलिलों बुद्धी; योगाची बुद्धि आइक, ।<br>
ज्या कर्मयोगबुद्धीनें कर्मबंधासि तोडिसी. ॥ ३९

विघ्नें अपूर्णता येथें नसे न प्रत्यवायही ।<br>
नाशी थोरा भयातें हें स्वल्पही [3]ईश्वरार्पित. ॥ ४०

निश्चयाची बुद्धि एक या मार्गीं कुरुनंदना! ।<br>
बहुशाखा अशा बुद्धी अनंता कामुकांचिया. ॥ ४१

श्रुतींत स्वर्ग जो पुष्प मूर्ख तें फळ मानिती ।<br>
ते वेदवादींच रत नाहीं म्हणति आणखी. ॥ ४२

इच्छिती स्वर्गपर जे जन्मकर्मफळप्रदा ।<br>
बहुकर्मद्रव्यसाध्या भोगभाग्यगती अशा. ॥ ४३

भोगभाग्यांस आसक्त [4]कामनाहृतबुद्धि जे ।<br>
एकाग्रता समाधींत न बुद्धिस तयांचिया. ॥ ४४

काम्याचे वेद [5]विषय, पार्था! निष्काम होइं तूं ।<br>
आणि निश्चित निर्द्वंद्व नित्यसत्त्वस्थ आत्मवित्. ॥ ४५

जें जें कार्य जळीं क्षुद्रीं होतें डोहांत सर्व तें, ।<br>
वेदीं काम्य सुखें तींही ब्रह्मीं ब्रह्मज्ञ जो तया. ॥ ४६

अधिकार तुतें कर्मी तत्फळीं न कदापिही, ।<br>
[6]झणीं तूं टाकिसी कर्म, झणीं तूं फळ इच्छिसी. ॥ ४७

---

१. लघुत्व, लहानपणा. २. सांख्यशास्त्रांत वर्णिलेली. ३. ईश्वरार्पित स्वल्पही कर्म. ४. कामनेनें हरण केलेली आहे बुद्धि ज्यांची असे. ५. काम्यकर्में करावीं हे वेदांचे विषय. ६. नाहीं तर तूं कर्म टाकशील किंवा फळाची इच्छा करशील.

सिद्धीअसिद्धीत सम होउनी टाकुनी फळें ।[1]
[2]योगस्थ करिं कर्में तूं समत्वा योग बोलिजे. ॥ ४८
[3]बुद्धि योगाहुनी नीच कर्म फार धनंजया ! ।
पाहें [4]रक्षक बुद्धींत तुच्छें कर्में [5]फलप्रदें. ॥ ४९
जितांचि पापपुण्यांतें नाशितो बुद्धियुक्त जो ।
म्हणोनि योगीं तूं योज कर्मी कौशल्य योगें[6] तो. ॥ ५०
शास्त्रज्ञ जे बुद्धियुक्त कर्माचें फळ टाकुनी ।
संसारबंध छेदूनी निर्दोषपद पावती. ॥ ५१
अज्ञान मोहमय हे तुझी बुद्धि तरे जर्यी ।
श्रुत अश्रुतभोगाचें तेव्हां वैराग्य पावसी. ॥ ५२
[7]फळांच्या श्रवणें तूझी मळली शुद्ध होय हे ।
बुद्धि थारे समाधींत तेव्हां तूं योग पावसी. ॥ ५३
[8]स्थितप्रज्ञ कसा सांग जो समाधिस्थ सर्वदा ।
केशवा! काय तो बोले ? असे ? वर्ते जगीं कसा ? ॥ ५४
पार्था ! सकळही टाकी जेव्हां काम मनांतिल ।
स्वरूपींच मनें तुष्टे तो स्थितप्रज्ञ बोलिजे. ॥ ५५
न दुःखीं मन उद्विग्न न सुखाची [9]स्पृहा जया ।
कामक्रोधभयातीत स्थितधी मुनि बोलिजे. ॥ ५६
न सर्वत्र जया स्नेह बरें वाइट भोगुनी ।
बरें वाईट न म्हणे त्याची [10]प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥ ५७
जसा कांसव सर्वांगें इंद्रियें विषयांतुनी ।
आवरूनी असे तेव्हां त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥ ५८
रोगी व्रती तयालाही न भोग तरि वासना ।
असे ते हि ज्ञानियाची जाते ब्रह्मात्मदर्शनें. ॥ ५९
ज्ञानी नर प्रयत्नीं जो त्याचींही कुंतिनंदना ! ।

---

१. 'योगस्थ करिं कर्में तूं होउनी टाकुनी फळें । सिद्धीअसिद्धींत सम समत्वा योग बोलिजे ॥' असाही. पाठ आहे. २. योगयुक्त. ३. ज्ञान. ४. आश्रय देणारा. ५. फल देणारीं. ६. ज्ञानाची योजना कर्मांत करणें तो योग. ७. 'लौकिक श्रवणें' असाही पाठ आहे. ८. समाधींत स्थिर बुद्धि असा. ९. इच्छा. १०. बुद्धि.

इंद्रियें बळवंतें हीं बळेंचि हरिती मना. ॥ ६०
तीं आवरूनि असतो युक्त होऊनि तत्पर ।
इंद्रियें वश हीं ज्याला त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥ ६१
चिंती विषय जो त्यातें उपजे भोगवासना ।
ते कामातें उपजवी, काम क्रोधासि निर्मितो. ॥ ६२
क्रोधें देहात्मतामोह, मोहें आत्मस्मृतिभ्रम, ।
स्मृतिभ्रंशें बुद्धिनाश मग तो मूढ पूर्ववत्. ॥ ६३
रागद्वेषाविरहितें इंद्रियें वश जीं तिहीं ।
घेतो विषय शुद्धात्मा तो प्रसादासि पावतो. ॥ ६४
प्रसादीं याचिया सर्वा दुःखाचा नाश होतसे, ।
प्रसन्नचित्तबुद्धीसी प्रतिष्ठा शीघ्र पावते. ॥ ६५
नाहीं बुद्धि अयुक्ताला, अयुक्ता ध्यानही नसे, ।
ध्यानाविणें न ये शांती, अशांता कोठुनी सुख? ॥ ६६
इंद्रियें वर्तता जें कां मोकळें मन सोडिजे ।
तें त्याची हरितें प्रज्ञा, वारा नाव जळीं जसा. ॥ ६७
तस्मात् सर्वेंद्रियें ज्याचीं विषयांपासुनी बरीं ।
आटोपिलीं महाबाहो त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥ ६८
ब्रह्मनिष्ठा निशा लोकां जागे हा तेथ संयमी ।
विषयीं जागती लोक या द्रष्ट्यातें जशी निशा. ॥ ६९
नाना जळांचा जलधींत मेळा, मिळे नुलंघी तरि सिंधु वेळा ।
भोग स्वतःप्राप्त असेचि भोगी, तो पावतो शांति न कामसंगी. ॥ ७०
टाकूनी सर्व कामांतें भोगितो भोग निस्पृह, ।
मी माझें हें नसे ज्याला तो ज्ञानी शांति पावतो. ॥ ७१
हे स्थिती ब्रह्मिंची पार्था! न मोहे ईस पावतां ।
अंतकाळीं इच्यां योगें क्षणेंही मुक्ति पावतो. ॥ ७२

---

१. देह हाच आत्मा असा झालेला समजरूप मोह. २. 'तयाची बुद्धि हरितें' असाही पाठ आहे. ३. बुद्धि. ४. इंद्रियनिग्रही. ५. ब्रह्मज्ञान. ६. समुद्र. ७. मर्यादा. ८. भोगेच्छा धरणारा.

### उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया दुसऱ्यावरी ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
सांख्यें आत्मअनात्मता निं[1]वडि जो योगेंचि स्वात्मैक्यता,
पा[2]हें हा न मरे न मारित असे आत्मा [3]असें तत्त्वता, ।
अध्यायीं वदला परेश दुसऱ्या तें[4] वामनाच्या मुखें,
टीका हे समपद्यरूप रचिली संतीं पहावी [5]सुखें. ॥ २

---

## अध्याय तिसरा.

### उपोद्घात.

बुद्धीहुनी कर्म नीच पूर्वाध्यायीं वदे हरी ।
तरि कां योजिसी युद्धीं म्हणतो येथ अर्जुन. ॥ १

### विषयप्रवेश.

कर्माहूनी बुद्धि थोर तुज वाटे जनार्दना! ।
तरि कां घोर कर्मी या योजिसी मज केशवा! ? ॥ १
[6]व्यामिश्रवाक्यें बुद्धीतें करिसी मोहल्यापरी, ।
एक नेमूनि तें सांग पावें मी श्रेयें[7] ज्यास्तव. ॥ २
लोकीं या दों परी निष्ठा पूर्वी जे म्यां निरूपिली, ।
ज्ञानयोगेंचि सांख्यांला सत्कर्में कर्मयोगियां. ॥ ३
जे कर्मातीत तत्सिद्धी न कर्मे केलियाविणें ।
कर्मसंन्यासमात्रेंचि न त्या सिद्धीस पावतो. ॥ ४
कर्म केल्याविणें कोणी कधींही क्षणही नसे, ।
दाटूनियां करविती कर्में प्रकृतिचे गुण. ॥ ५
कर्मेंद्रियें आवरूनी मनीं विषय चिंतितो, ।
नेत्र लावी बसे मूढ तो दंभाचार बोलिजे. ॥ ६
अर्जुना! इंद्रियांतें जो मनेंकरुनि आवरी ।
कर्मेंद्रियें कर्मयोग करी निष्काम थोर तो. ॥ ७

---

१. 'निवडुनी' पाठ. २. 'पाहे' पाठ. ३. 'असे' पाठ. ४. 'तो श्रीगुरु वामनें' पाठ
५. 'मनें' पाठ. ६. संदिग्ध वाक्यानें. ७. कल्याण.

कर्मत्यागाहुनी कर्म श्रेष्ठ तें नित्य तूं करीं, ।
देहनिर्वाहही तूझा न घडे कर्म त्यागितां. ॥ ८
विष्णुप्रीत्यर्थ जें कर्म त्याविणें सर्व बंधक ।
[1]तत्प्रीत्यर्थहि कौंतेया! [2]संग टाकूनि आचर. ॥ ९
प्रजा [3]यज्ञासवें ब्रह्मा पूर्वी निर्मूनि बोलिला ।
कीं, या यज्ञें वृद्धि पावा, तुमची कामधेनु हा. ॥ १०
भजा देवांस या यज्ञें, देव देती फळें तुम्हां, ।
[4]अन्योन्य भजतां ऐसें पावाल श्रेय उत्तम. ॥ ११
[5]इष्ट भोग तुम्हां देती यज्ञें जे देव पूजिले, ।
देवीं दिलें तें देवांला न देतां खाय चोर तो. ॥ १२
यज्ञाचें शेष खाणारे नाशिती सर्व पातकें, ।
पापी पापचि ते खाती रांधिती स्वनिमित्त जें. ॥ १३
भूतें अन्नरसें होती, अन्न पर्जन्यवृष्टिनें, ।
यज्ञेंकरुनि पर्जन्य, यज्ञ कर्मेंकरूनियां. ॥ १४
वेदांपासूनियां कर्म, वेद [6]अक्षरसंभव, ।
तस्मात् ते [7]सर्वगतही सदा यज्ञीं प्रतिष्ठित. ॥ १५
ऐसें वर्तविलें चक्र लोकीं जो कां न वर्तवी, ।
वृथा तो [8]पापआयुष्य इंद्रियासक्त तो जितां. ॥ १६
आत्मत्वींच जया प्रीति आत्मलाभेंचि तृप्त जो, ।
जो आत्मत्वींच संतुष्ट त्याला कर्तव्य हें नसे. ॥ १७
कर्मी त्याला फळ नसे अकर्मी प्रत्यवायही, ।
न ज्यास सर्वभूतींही कांहीं फळ अपेक्षित. ॥ १८
यालागीं निष्काम सदा करावें कर्म तें करीं, ।
निष्काम करितां कर्म पुरुष ब्रह्म [9]पावतो. ॥ १९
कर्मेंचि करितां सिद्धी पावले जनकादिक, ।
[10]लोकसंग्रहदृष्टीनें तरी कर्मासि योग्य तूं, ॥ २०
कीं जें जें आचरे श्रेष्ठ तें तें इतरही जन, ।

---

१. विष्णुप्रीत्यर्थही. २. कर्मफलेच्छा टाकून. ३. यज्ञ. ४. परस्पर. ५. इच्छिलेले. ६. ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेले. ७. सर्वांस व्यापून असणारे. ८. पापरूप आयुष्य ज्याचें. ९. पावतो. १०. लोकांस चांगला मार्ग लावावा या दृष्टीनें.

तो जों कां निर्णय करी वर्तती लोक ते रिती. ॥ २१
पार्था! मातें तिहीं लोकीं नाहीं कर्तव्य कांहिं ही. ।
अवाप्तकाम[1] निष्काम तरी कर्मींच वर्ततों. ॥ २२
जरी कर्मीं न वर्ते मी कधींही यत्नपूर्वक, ।
मार्गानुरूप माझ्या हे वर्तती सर्व मानव. ॥ २३
भ्रष्ट होतील हे लोक न करीं कर्म मी जरी, ।
तेंही करीं अन्य धर्मे तरी या भ्रष्टती प्रजा. ॥ २४
कर्मे फलार्थ अज्ञानी जसीं करिति भारता! ।
तीं निष्काम करी ज्ञानी जो इच्छी लोकसंग्रह[2]. ॥ २५
काम्यकर्मठ अज्ञांचा बुद्धिभेद करूं नये, ।
करवावीं सर्व कर्में तत्त्वज्ञें युक्त जो स्वयें. ॥ २६
कर्में सर्वें प्रकृतीच्या करिजेताति जीं गुणीं, ।
अहंकारें मूढबुद्धी मी कर्ता मानितो असें. ॥ २७
तत्त्वज्ञ गुणकर्मांच्या दों भागीं स्वअकर्तृता, ।
पाहे कीं स्वस्वविषयीं इंद्रियें हींच वर्तती. ॥ २८
प्रकृतीच्या गुणें मूढ झोंवती विषयेंद्रियीं ।
असर्वज्ञां तयां मूढां सर्वज्ञें स्वळूं नये. ॥ २९
कर्में समर्पूनि मज सर्व अध्यात्मबुद्धिनें ।
टाकूनि आशा ममता सुखें हें करिं युद्ध तूं. ॥ ३०
न दोष ठेवितां माझें हें नित्य मत मानव ।
भावें अनुष्ठिती, तेही कर्मापासूनि सूटती. ॥ ३१
दोष आरोपुनी माझ्या या मता न अनुष्ठिती, ।
जाण सर्वा ज्ञानमार्गी बुद्धिभ्रष्ट विमूढ ते. ॥ ३२
ज्ञानीहीं पूर्वसंस्कारें वर्ते प्रकृतिसारिखा ।
भूतें वश प्रकृतीला करावें काय निग्रहें. ॥ ३३
गोड त्याविषयीं प्रीति वाइटीं द्वेष इंद्रियां ।
रागद्वेषचि हे शत्रू वश होऊं नये तयां. ॥ ३४
बरा स्वधर्म भळता परधर्मा बऱ्याहुनी, ।
स्वधर्मी मृत्युही श्रेय, परधर्म करी भय. ॥ ३५

१. ज्याची इच्छा तृप्त झाली आहे असा. २. लोकशिक्षण. ३. बुद्धिहीन.

आतां कोणें प्रेरिला हा सांग जो पातकें करी ? ।
बळेंचि योजिजे जैसा [1]वार्ष्णेया ! इच्छिल्याविणें. ॥ ३६
काम हा क्रोधही हाची जो [2]रजोगुणसंभव ।
सदा अतृप्त जो पापी या मार्गी शत्रु जाण [3]हा. ॥ ३७
वेष्टिजेतो धुरें अग्नी, आरसा नाशिजे मळें, ।
बांधिजे गर्भही नाळें, कामें हें वेष्टिलें तसें. ॥ ३८
वेष्टिलें ज्ञानही कामें ज्ञात्याचें नित्य शत्रुनें, ।
जो नाना कामनारूपी जो का [4]दुर्भर अग्निवत्. ॥ ३९
इंद्रियें मन बुद्धी हीं [5]कामाधिष्ठान बोलिजे, ।
यांहींकरुनि हा मोही प्राण्यातें ज्ञान वेष्टुनी. ॥ ४०
तस्मात् तूं इंद्रियें आधीं जिंकोनी भरतर्षभा ! ।
मारीं या पापिया कामा ज्ञानविज्ञाननाशका. ॥ ४१
स्थूलापुढें इंद्रियें हीं, मन त्याही पलीकडे, ।
मनापलीकडे बुद्धी, आत्मा तो तीपलीकडे. ॥ ४२
[6]तीणें असा तीपरता जाणोनी थांबवूनि तो ।
मारीं शत्रु महाबाहो ! कामरूपी अजिंक्य जो. ॥ ४३

उपसंहार.

इति टीका समश्लोकी अध्याया तिसऱ्यावरी ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
अध्याय हा तृतियनामक कर्मयोग, कर्मांग ब्रह्ममय जाणुनि स्वात्मयोग ।
नित्यें [7]अनित्य अवघीं हरिच्याचि पायीं, अर्पी असें वदतसे निजसौख्यदायी. ॥ २

---

## अध्याय चवथा.

### उपोद्घात.

पूर्वाध्यायीं कर्मयोग बोलिला भगवान् स्वयें ।
ज्ञानांगत्वें अनादित्व त्याचें बोलतसे हरी. ॥ १

---

१. यादवा. २. रजोगुणापासून झालेला. ३. काम. ४. ज्याची पूर्ति कधीं व्हावयाची नाहीं. ५. कामाचें आश्रयस्थान. ६. बुद्धीकरून, बुद्धीनें. ७. 'नित्य' पाठ.

विषयप्रवेश.

या पुरातन योगातें मी सूर्यालागिं बोलिलों, ।
बोलिला सूर्य मनुला, पुत्रा इक्ष्वाकुला मनू. ॥ १
परंपरागत असा योग राजर्षि जाणती ।
तो योग बहुतां काळें अस्त जाला परंतपा[1]! ॥ २
तोचि हा आजि म्यां तूतें वर्णिला योग पूर्विल; ।
तूं सखा भक्त, यालागीं रहस्याद्भुत[2] बोलिलों. ॥ ३
अलीकडे तुझें जन्म, सूर्यजन्म पलीकडे, ।
तूं बोलिलासि पूर्वी हें जाणावें म्यां कशापरी[3]? ॥ ४
क्रमिलीं बहुतें जन्में माझीं तूझीं हि अर्जुना! ।
मी ईश जाणें तीं सर्व, तूं जीवत्वें न जाणसी. ॥ ५
अज[4] मी, अविनाशी मी, भूतांचा ईशही, परी ।
होतों[5] शुद्धात्ममायेनें स्वप्रकृति अधिष्ठुनी[6]. ॥ ६
जे जे वेळे स्वधर्माची होतसे हानि भारता! ।
अभिवृद्धी अधर्माची, आपणा निर्मितों तयीं. ॥ ७
साधूंच्या रक्षणालागीं माराया पातकी जनां, ।
स्थापावया स्वधर्मातें, होतों[7] युगयुगाप्रती. ॥ ८
अलौकिकें जन्मकर्में माझीं, जाणे असें खरें, ।
देह टाकूनि तो मातें पावे; जन्मा नये पुन्हा. ॥ ९
कामक्रोधभयातीत[8], ध्याननिष्ठ, मदाश्रित, ।
बहुज्ञानतपें शुद्ध, मत्स्वरूपास पावले. ॥ १०
जे जसे भजती मातें, मी तसा फळतों तयां. ।
पार्था! मनुष्य सकळ माझ्या मार्गींच वर्तती. ॥ ११
कर्मसिद्धीच इच्छूनी पूजिती अन्यदेवता, ।
कर्ममूळाच[9] त्या सिद्धी नृलोकीं[10] होति सत्वर. ॥ १२
चारि वर्णाहि म्यां केले गुणकर्में विवंचुनी[11] ।
त्यांचा कर्ता, तरी कर्ता नव्हे मी जाण अव्यय. ॥ १३

---

१. हे शत्रुतापना, अर्जुना. २. गूढ. ३. कसें, कोणत्या रीतीनें. ४. जन्मरहित. ५ जन्म घेतों. ६. आसन करून, व्यापून. ७. जन्म घेतों. ८. काम, क्रोध, भय, यांपासून दूर झालेले. ९. कर्मापासूनच उत्पन्न झालेल्या. १०. मनुष्यलोकीं. ११. निवडून.

कर्में न लिंपती मातें, कीं न कर्मफळीं स्पृहा, ।
मातें जाणे असें, तोही बद्ध कर्मी नव्हे कधीं. ॥ १४

ऐसें जाणोनि मोक्षार्थी केलीं कर्में पुरातनीं; ।
करीं कर्मचि तूं तस्मात् केलें जें पूर्वैपूर्वजीं. ॥ १५

ज्ञानीही [6]मोहले कीं हें कैसें कर्म, अकर्महो, ।
सांगेन तें, जें जाणोनी सुटसी अशुभांतुनी. ॥ १६

तत्त्व वेदोक्त कर्माचें, विकर्माचें निषिद्ध जें, ।
अकर्माचेंहि जाणावें; कर्माच्या गहना गती. ॥ १७

न बांधे तें नव्हे कर्म; कृष्णार्पणि अकर्मता; ।
अकर्मी पाप तें कर्म; देखे सर्वज्ञ सर्वकृत. ॥ १८

टाकूनि [11]कामसंकल्प आरंभी सर्व कर्म जो, ।
ज्ञानाग्निनें कर्म जाळी; म्हणती तोचि पंडित. ॥ १९

फलेच्छा टाकुनी सर्व, सदा तृप्त निराश्रय, ।
प्रवर्तला सर्व कर्मी, तरी कांहीं न तो करी. ॥ २०

शरीर चित्त स्ववश; न आशा न [12]परिग्रह; ।
[13]शरीरमात्रें जो कर्मैं करी, पावे न पाप तो. ॥ २१

लाभें [14]अयाचितें तुष्ट, न जया [15]द्वंद्व मत्सर ।
सिद्धीअसिद्धीत [16]सम, [17]नव्हे बद्ध, [18]करूनि ही. ॥ २२

[19]कर्तृत्वापासुनी मुक्त, स्वरूपीं चित्त थांरलें; ।
यज्ञार्थ आचरे कर्म, सर्व तें जातसे लया. ॥ २३

[21]कर्ता, अग्नि, [22]हविर्द्रव्यें ब्रह्म, ब्रह्मींच्चि अर्पणें, ।
कर्मी [23]ब्रह्मसमाधिस्थ त्याणें ब्रह्मींच पावणें. ॥ २४

१. चिकटत नाहीत, दोष लावीत नाहींत. २. इच्छा. ३. अशा प्रकारें. ४. प्राचीन काळच्या मुमुक्षूंनी. ५. प्राचीन पूर्वजांनी. ६. मोहांत पडले, गोंधळले. ७. शास्त्रविरुद्ध कर्म. ८. कर्म न करणें. ९. कर्म ईश्वरार्पण केलें म्हणजे कर्माचा दोष राहात नाहीं. १०. कांहीं न करणें हें पापकर्म. ११. फलेच्छा. १२. गुंता. १३. शरीरसंबंधी कर्में मात्र करितो. १४. न मागतां मिळालेल्या लाभानें तुष्ट. १५. सुखदुःखाची पीडा. १६. सारखा. १७. [illegible] होय. १८. कर्में करून देखील. १९. कर्तृत्वाचा अभिमान ज्याला, नाहीं तो. २०. [illegible] झालें. २१. यज्ञकर्ता, यजमान. २२. यज्ञद्रव्यें. २३. ब्रह्मीं ज्याची समाधि.

यज्ञ इं[1]द्रादिभावेंचि कर्मयोगी उपासिती. ।
ब्र[2]ह्माग्नींतचि ते ज्ञानी यज्ञरीतींचि होमिती. ॥ २५
श्रोत्रादि इंद्रियें कोणी नि[3]ग्रहाग्नींत होमिती. ।
त्या [4]इंद्रियाग्नींत कोणी अ[5]र्थशब्दादि होमिती ॥ २६
कोणीं सर्वा इंद्रियांचीं कर्में, प्राणादिकांचि ही, ।
चि[6]त्प्रकाशांत वृत्तींच्या निरो[7]धाग्नींत होमिती. ॥ २७
द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञहि, सुव्रत ! ।
वेदार्थज्ञानही यज्ञ, यत्नशील अनुष्ठिती. ॥ २८
अपानीं होमिती प्राण, प्राणीं तोचि अपानही, ।
प्राणापान निरोधूनी प्राणायामासि तत्पर. ॥ २९
कोणी ने[8]मूनि अन्नादि, प्राणीं प्राणासि होमिती. ।
हटयोगी, असे सर्व यज्ञें पावन य[9]ज्ञवित् ॥ ३०
यज्ञशेषसु[10]धा भोक्ते परब्रह्मींच पावती, ।
[11]अयज्ञाला न हा लोक कैंचा स्वर्ग कु[12]रूत्तमा! ॥ ३१
विस्तारले बहु असे यज्ञ ब्रह्मयाचिया मुखें ।
सर्व [13]कर्मज ते जाण ऐसें जाणूनि सु[14]टसी. ॥ ३२
द्रव्ययज्ञाहुनी श्रेष्ठ ज्ञानयज्ञचि; अर्जुना ! ।
लौकिकें, वैदिकें, कर्में सर्व ज्ञानींच [15]संपती. ॥ ३३
तें [16]जाण वंदनें, प्रश्नें, संतसेवेकरूनियां, ।
शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ तुतें तें ज्ञान उपदेशिती. ॥ ३४
जें जाणोनि, पुन्हा ऐसा न मोहसिल, देखसी ।
चराचरें [17]आपणांत मजसीं मग ऐक्य [18]तूं. ॥ ३५
अससी थोरही पापी पापियां सकळांत तूं, ।
तरी या ज्ञाननावेनें तरसी पापसागर, ॥ ३६

---

१. इंद्रादिदेवांसाठीं. २. ब्रह्मरूप जो अग्नि त्यांत. ३. निग्रहरूप अग्नींत. ४. इंद्रियरूप अग्नींत. ५. शब्दादि विषयांचा होम करितात. ६. ज्ञानाच्या प्रकाशानें प्रकाशित अशा वृत्ति निरोधरूप अग्नींत. ७. वृत्तींचा निरोधरूप जो अग्नि त्यांत. ८. नियमित करून. ९. यज्ञकर्ते. १०. यज्ञशेष हेंच अमृत त्याचे भोक्ते. ११. ज्याला यज्ञ नाहीं त्याला. १२. कुरुश्रेष्ठा, अर्जुना. १३. कर्मापासून झालेले. १४. मोक्ष पावसी. १५. ज्ञानामध्यें पर्यवसान पावतात, अंत पावतात. १६. ज्ञान. १७. आपणांत पाहशी. १८. तूं पावशील.

कीं जसा पेटला अग्नी काष्टें जाळी जसीं तसीं, ।
ज्ञानाग्नि करितो भस्म सर्वेही पुण्यपातकें. ॥ ३७
ज्ञानासम नसे शुद्ध कांहीं; तें ज्ञान हा स्वयें ।
ज्ञाताचि; जें योगयत्नें काळें चित्तांत बिंबतें. ॥ ३८
श्रद्धाळु तें ज्ञान पावे, जो तत्पर, जितेंद्रिय; ।
ज्ञान पावोनि, जे शांति थोर ते शीघ्र पावतो. ॥ ३९
बुडे अज्ञ, तसा श्रद्धाहीन संशयबुद्धिही. ।
त्यांत संशयबुद्धीला न दोनी लोक, ना सुख, ॥ ४०
कर्मयोगांत संन्यासी, जो शास्त्रें मुक्तसंशय, ।
जो आत्मज्ञ, तया कर्में न बाधति धनंजया! ॥ ४१
तस्मात् संशय अज्ञानें जो मनीं, छेदुनी तया ।
ज्ञानखड्गें, आणि ऊठ स्वकर्म करिं, भारता! ॥ ४२

उपसंहार.

इति टीका समश्लोकी चतुर्थाध्यायदीपिका ।
श्रीपार्थसारथी कर्ता जो वामनमनोरथी. ॥ १
चतुर्था अध्यायीं गुरुत्रर वदे ज्ञानपथ हा,
तयाची हे टीका करि बहु सुखाचाच[1] पथ हा ।
बरा हा जाणोनी सुजन समजोनी तुम्हि पहा,
समश्लोकीचा हा निशिदिनिं करावाच जप हा. ॥ २

---

## अध्याय पांचवा.

### उपोद्घात.

पूर्वाध्यायीं बोलिला कीं योगे[3]संन्यस्तकर्म जो ।
आत्मज्ञानी, तया कर्में न बाधति धनंजया! ॥ १
दुसऱ्या अंतिच्या श्लोकीं उत्तमश्लोक बोलिला ।
कीं, 'ऊठ; कर्मयोगातें करीं तूं म्हणऊनियां. ॥ २
हे स्थळीं वर्णिला कृष्णें योगसंन्यस्तकर्म जो ।
तो कर्मयोगचि मध्यें [4]कर्मसंन्यास देखतो. ॥ ३

---

१. 'सुखाचा सुपथ' पा०. २. 'हो' पा०. ३. कर्मांच्या फळाची इच्छा न धरितां जो कर्में ईश्वरार्पित करितो तो. ४. कर्मत्याग.